

# महानुभाव सांकेतिक कवीश्वरी लिपी

## (पोथींसह - लिप्यंतर)





लेखक : विनायक त्र्यंबक पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# कवीश्वरी लिपी

-------

विनायक त्र्यंबक पाटील

एच-५८३
१

**पुस्तकाचे नाव :** महानुभाव सांकेतिक कवीश्वरी लिपी (पोथीसह-लिप्यंतर)

**लेखक :** श्री. विनायक त्र्यंबक पाटील

**प्रथमावृत्ती :** २०२२

**आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-३५-३

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन :**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११ ००१.

**किंमत :** ₹- १३२

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महानुभाव महंतांनी मराठीचा आणि स्थानिक बोलीभाषेचा उपयोग करून आपले तत्त्वज्ञान आणि आचार धर्माचा प्रचार केलेला आहे. आपले तत्त्वज्ञान आणि धार्मिक आचार विचार पुढील पिढ्यांना शुद्ध स्वरूपात मिळावे म्हणून महानुभाव मंडळीनी आपले ग्रंथ सांकेतिक (गुप्त) लिप्यांमध्ये लिहिले होते. ही मराठी भाषेच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. मराठीचे स्थळ व काळानुरूप स्वरूप जतन करण्याचे कार्य या गुप्त लिप्यांनी केलेले आहे. महानुभाव मंडळीनी मराठी जनांना दिलेला हा संपन्न वारसा आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महानुभाव सांकेतिक लिप्यांचा अभ्यास' हा प्रकल्प राबविलेला आहे. प्रकल्पात तीन सांकेतिक लिप्यांचा अभ्यास करून या समृद्ध वारश्याचा परिचय मराठीजनांना करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सांकेतिक कवीश्वरी लिपीचा उलगडा करून देण्याचे कार्य श्री. विनायक त्रिंबक पाटील यांनी केलेले आहे. महानुभाव सांकेतिक कवीश्वरी लिपी (पोथीसह लिप्यंतर) या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करीत आहे याचा मंडळाला आनंद होत आहे.

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# अर्पण पत्र

**कै. सौ. ऊर्मिला पाटील यांच्या स्मृतीस.**

**- विनायक त्र्यंबक पाटील**

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मला महानुभाव सांकेतिक लिप्यांच्या अभ्यासासाठी प्रकल्प सादर करायला सांगण्यात आले होते. सांकेतिक लिप्यांचा वापर गेल्या दोनशे वर्षापासून कमी होत गेला आणि सर्व महानुभावीय मंडळीने फक्त सकळ लिपीचा वापर सुरू केलेला आहे. त्यामुळे महानुभाव पंथीयांनी मराठी भाषा समृद्ध करताना २४ पेक्षा जास्त सांकेतिक लिप्यांचा वापर करून भाषा व्यवहारातील एक अमोल देणगी दिलेली आहे. एका लिपींच्या अभ्यासकाने एकूण पंचावन्न सांकेतिक लिप्या होत्या असे सांगितले आहे.

गेल्या दोनशे वर्षात या सांकेतिक लिप्यांचा वापर बंद झाल्यामुळे त्या लिप्यांमधील पोथ्या सांभाळण्याकडे दुर्लक्ष होत गेले असावे आणि प्रत करण्याकडेही पंथीय मंडळीचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे सांकेतिक लिप्यांमधील पोथींची उपलब्धता दुर्मिळ होत गेलेली आहे. संग्रह करणाऱ्या संस्थाकडे असलेल्या पोथ्यांच्या वर्गीकरणातही तफावत दिसून येत आहे. तळेगावकरी लिपीमधील पोथी बऱ्याच ठिकाणी पारमांडल्य लिपीची आढळून आलेली आहे. तळेगावकरी लिपी बऱ्याच प्रमाणात सकळ लिपीच्या अंगानेही गेलेली दिसून येत आहे. माझ्या जवळ असलेल्या तीन तळेगावकरी लिपीच्या पोथ्या प्रत्यक्षात पारीमांडल्य लिपीतील आहेत. या तीन पोथ्या मला बा. आं. म. विद्यापीठ औरंगाबाद, रिद्धपूर गोपीराज ग्रंथ संग्रहालय आणि रणाईचे येथील आश्रमातून मिळालेल्या आहेत. त्याचवेळी तळेगावकर लिपीच्या दोन पोथ्यातील काही पाने मला श्री. सी. जी. महाजन, जळगाव यांच्याकडून आणि औरंगाबाद विद्यापीठातून मिळालेली आहेत. या पानांचा उपयोग करून 'महानुभाव सांकेतिक तळेगावकरी लिपी' पोथीसह लिप्यंतर हे पुस्तक मराठी संशोधन पत्रिकेद्वारा प्रकाशित झाले आहे.

वास्तविक या सांकेतिक लिप्यांच्या वर्गीकरणापासून मी स्वतः दूर ठेवलेले आहे. मी 'महानुभाव' सांकेतिक पारमांडल्य लिपी पोथीसह लिप्यंतर हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. त्यासाठी महानुभाव आश्रम औरंगाबाद येथील पोथीचा उपयोग केलेला आहे. त्या पोथीतील आतील पानावर 'पार मांडल्य लिपी' असा

प्रतकर्त्याने स्पष्ट उल्लेख केलेला आहे. म्हणून मी ती पोथी व लिप्यंतर पार मांडल्य लिपी म्हणूनच पुस्तक प्रकाशित केलेले आहे.

प्रस्ताव सादर करावयासाठी पोथ्यांची उपलब्धता लक्षात घेणे महत्त्वाचे होते म्हणून प्रस्ताव सादर करण्यासाठी मला विलंब होईल, असे म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळाला कळविले होते.

औरंगाबाद विद्यापीठात पोथी शाळेत चर्चा करताना श्री. मोहन बाभूळगावकर यांचेकडून पुण्याजवळील कुरकुटवाडी आश्रमात कवीश्वरी लिपीची पोथी असल्याचे समजले होते. तेव्हा रिद्धपूर येथील महंत गोपीराज बाबांकडून पोथीची मागणी तेथे केली होती. त्या आश्रमातील पोथ्या आगीत भस्मसात झाल्याचे समजले होते.

तद्नंतर महंत गोपीराज बाबांकडून पोथी मिळवण्याचे प्रयत्न चालू होते. त्याचवेळी त्यांनी यवतमाळ येथे पोथी उपलब्ध होऊ शकेन असे समजले. श्री. अनिरुद्ध भावे यांनी मी पोथी असल्यास द्यावी अशी विनंती केली होती. त्यांनीही मला पोथी पी.डी.एफ. फाईल करून ई-मेलवर पाठविली होती. हे नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो.

लिप्यंतर करताना बऱ्याच वेळा सी. जी. महाजन, जळगाव यांची मदत झालेली आहे. हेही येथे सांगणे गरजेचे आहे.

महंत श्री गोपीराज बाबा रिद्धपूर, महंत सुभद्राबाई कपाटे आत्या औरंगाबाद, बा. आं. म. विद्यापीठातील मोहन बाभूळगावकर, श्री. अनिरुद्ध भावे - यवतमाळ, अभियंता श्री. सी. जी. महाजन - जळगाव, डी.टी.पी. करणारे भालेराव, माझे कुटुंबीय तसेच कन्या व जावई यांचे सहकार्य लाभले आहे त्याबद्दल त्या सर्वांचे आभार.

शेवटी महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने प्रकल्प मंजूर केल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड आणि सर्व सभासद कर्मचारी यांचेही आभार व्यक्त करणे क्रमप्राप्त आहे.

**विनायक त्र्यंबक पाटील**

# कवीश्वरी लिपीतील
# पोथी लिखाणाबद्दलचे विवेचन

मला प्राप्त झालेल्या पोथीतील लिखाण करणाऱ्याने पूर्ण पोथीत दोन लिप्यांचा वापर केलेला आहे. सकळ आणि कवीश्वरी लिप्यांचा अवलंब केला आहे. प्रथम सकळ लिपीतील मजकूर **१ ते ५६** पाने असा आहे. **५७ ते ७५** पाने कवीश्वरी लिपीतील आहेत. त्यातही तीन पाने पुनः लेखन झाले आहे. साधारणपणे १५ पृष्ठे कवीश्वरी लिपीतील आहेत. **७६ ते १३६** पृष्ठे पुनः सकळ लिपीतील आहेत. **१३७ ते १९७** ही पृष्ठे कवीश्वरी लिपीतील आहेत. या भागातही पान क्र. १९०/२, १९१ आणि १९२/१ ही पाने पोथीशी संबंधित विषयाची नाहीत आणि सदरची पाने देवनागरी लिपीत लिहिलेली आहेत. **१९८ ते २४३** पृष्ठे पुनः सकळ लिपीतील मजकूर आहे आणि २४४ ते २४९ पुनः कवीश्वरी लिपीतील आहे. हे झाले पोथीतील लिपी संदर्भात.

आतां कवीश्वरी लिपीतील मजकूर.

पोथीतील मजकूर एकाच व्यक्तीने लिहिलेला आहे. मजकूर लिहिताना मजकूर मागे पुढे झालेला आहे.

पृष्ठ २४४ ते २४९ ही सुरुवातीस यायला हवी होती ती सर्वात शेवटी आलेली आहेत.

पृष्ठ क्र. ५७ ते ७५ हा मजकूर शेवटी यावा असे अपेक्षित होते त्याऐवजी तो प्रथम आलेला आहे.

लिप्यंतर व पोथी सादर करताना मजकूर सलग आणि अखंडीत असावा म्हणून मी पृष्ठांची पुर्नमांडणी केलेली आहे. पोथीतील मजकुरात सलगता असावी म्हणून मी पुढीलप्रमाणे आखणी केलेली आहे. म्हणजे २४४ ते २४९ ही पृष्ठे अगोदर घेतलेली आहेत. तद्नंतर १३७ ते १९७ ही पृष्ठे आहेत आणि शेवटी ५७ ते ७५ अशी मांडणी केलेली आहे.

पोथीतील मजकूर आचारा संबंधातील आहे. सुरुवातीची पाने पोथीत कदाचित आणखी पुढे लिहिलेली असावीत पण तो मजकूर आता उपलब्ध नाही. त्यामुळे पोथीची सुरुवात मध्येच झाल्यासारखी वाटते. सुरुवातीचा काही भाग काळाच्या ओघात नष्ट होऊन राहिलेली पोथी अपूर्ण वाटते.

# महानुभाव
# सांकेतिक कवीश्वरी लिपी
# वर्णमाला

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **देवनागरी –** | अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |
| **कवीश्वरी –** | व | वा | [illegible] | [illegible] | उ | ऊ | ठे | ठै | वो | वौ | वं | वः |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **देवनागरी –** | क | ख | ग | घ | | |
| **कवीश्वरी –** | १ | ३ | U | वू | | |
| **देवनागरी –** | च | छ | ज | झ | | |
| **कवीश्वरी –** | ७ | छ | n | A | | |
| **देवनागरी –** | ट | ठ | ड | ढ | ण | |
| **कवीश्वरी –** | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | ग | |
| **देवनागरी –** | त | थ | द | ध | न | |
| **कवीश्वरी –** | [illegible] | ९ | ४ | [illegible] | न | |
| **देवनागरी –** | प | फ | ब | भ | म | |
| **कवीश्वरी –** | प | [illegible] | [illegible] | [illegible] | W | |
| **देवनागरी –** | य | र | ल | व | श | |
| **कवीश्वरी –** | ० | त | ६ | च | श | |
| **देवनागरी –** | ष | स | ह | ळ | क्ष | ज्ञ |
| **कवीश्वरी –** | उ | २ | Q | S | [illegible] | ज्ञ |

# कवीश्वरी लिपी संबंधी थोडक्यात

१) संकेतांचा वापर मर्यादित स्वरूपाचा आहे.

२) संकेत बऱ्याच वेळा इतर लिपीतून घेतलेले आहेत.

उदा. : ब्रा : = ब्राह्मण, सकळ

: टा : = देवता सकळ

: वा : = देवता पारीमांडल्य.

: २ : = मग सकळ

३) कवीश्वरी लिपीत ३ हा संकेत अक्षर ख साठी आहे.

ू३ हा संकेत अक्षर उ साठी आहे.

उ हा संकेत अक्षर ष साठी आहे.

हा संकेत वापरताना बऱ्याच वेळा अदलाबदल झालेली आहे.

४) श, स या अक्षरांसाठी सर्वत्र '२' या अंक संकेताचा उपयोग केला आहे.

५) वेलांटी ि आणि ी साठी अक्षरावर फक्त आडवी रेषा आहे.

६) मात्रा साठी ` अशीच खूण वापरलेली आहे.

७) 'उ' ऊ या अक्षरांसाठी ३ आणि ३ा असा वापर केलेला आहे.


# कवीश्वरी लिपीतील संकेत

| अ.न. | संकेत | संकेतार्थ |
|---|---|---|
| १ | : wl : | माळीका |
| २ | : भे : | म्हणिजे |
| ३ | : ष्टें : | दृष्टांते |
| ४ | : र्चा : | जीवास |
| ५ | : पें : | देवते |
| ६ | : षें : | पुरुषें |
| ७ | : ऊ : | गोसावी |
| ८ | : रु : | ईश्वरू |
| ९ | : री : | ईश्वरी |
| १० | : र : | ईश्वर |
| ११ | : च : | जीव, वचन |
| १२ | : भेंवा : | म्हणितलेंया |
| १३ | : त : | तरी |
| १४ | : w : | मग |
| १५ | : षु : | पुरुष |
| १६ | : ४ : | दर्शन |
| १७ | : ஒ : | चैतन्य |
| १८ | : हा : | लाभा, सकळा |
| १९ | : ξ : | अर्थ |
| २० | : रच : | स्वरूप |
| २१ | : त्रें : | देवों |
| २२ | : टे : | देवतें |
| २३ | : भें : | म्हणितलें |
| २४ | : फें : | परमेश्वरें |
| २५ | : टा : | देवता |

| | | |
|---|---|---|
| २६ | : २ : | मग |
| २७ | : घा : | जीवा |
| २८ | : मौ : किंवा : ३ : | म्हणौन |
| २९ | : स्त्रा : | स्त्री |
| ३० | : प्रं : | प्रपंच |
| ३१ | : [illegible] : | सर्वज्ञ म्हणितले |
| ३२ | : औ : | अवतारौ |
| ३३ | : र्ती : | चक्रवर्ती |
| ३४ | : नें : | देवते |
| ३५ | : मे : | माहादाईसे |
| ३६ | : ना : किंवा : टा : | देवता |
| ३७ | : m̄ : | म्हणितली |
| ३८ | : फ : | परमेश्वर |
| ३९ | : ने : | सन्निधाने |
| ४० | : अी : | अवतारी |
| ४१ | : षें : | बाईसे |
| ४२ | : प : | परमेश्वर |
| ४३ | : प : | पाये |
| ४४ | : मी : | माहादाईसी |
| ४५ | : ४ : | दर्शन |
| ४६ | : ७ : | पक्ष |
| ४७ | : च्रें : | अवतार |
| ४८ | : इ : | |
| ४९ | : ब : | बाई |
| ५० | : बें : | बाईसे |
| ५१ | : बेसे : | हे काई असे |
| ५२ | : ष : | पुरुष |
| ५३ | : हा : | लीळा |
| ५४ | : ब्रा : | ब्राह्मणा |


| | | |
|---|---|---|
| ५५ | : ३ : | गोसावी |
| ५६ | : घ : | जीव |
| ५७ | : भां : | माहादाईसां |
| ५८ | : श्च : | स्वरूप |
| ५९ | : आ : | अवतारा |
| ६० | : ष : | पुरुषी |
| ६१ | : बे : | बाईसी |





(परिवा)र. स्थानें. ना, अंतरि तरि आवघयां सक्ती (शक्ती) युक्त. मग तयाही परौता गाभा. सद्य करणी. मुर्ति संयोगीये पदार्थ, ते दृष्ट. येर आवघे श्रृतचि. आठवण म्हणिजे तोचि अर्थु नीरंतन मनी असे ।।छ।। येके लीळे गोसावी प्रसंन. (प्रसन्न) येकी खंति स्वीकरीली असे. दोहीं तारतम्य बहुत असे. यैसे जाणावें. ।।२७।। नाम म्हणिजे येक नियेत स्वीकार. मग जिये काळीं, जिये देशीं, जिये गावी. जया प्रति, जें तें. लीळा म्हणिजे चेतनेंसीं आणि सहेतुका. मुर्ति म्हणिजे रुप, वये, गुण, वर्ण. जो जैसा अवयेऊ. खति (खूति) खावणि. जिये काळीं जैसा अवसर. वस्त्रें, अळंकार, उदास, प्रसंनं तें आठवीजे. चेष्टा म्हणिजे. जडेंसी आणि नीरहेतुका. यैसें चतुर्विध स्मरण. येकापसि येक सामान्य विसेखु ।।छ।। अमुके नाम धरावें हा स्वरूपींनि स्वीकारू. नाम जाणितलेंयां ईश्वरा वस्य (वश) होये. कां? सर्वदा लेखी, तरि नावेंचि लेखी. नाव ठाऊकें जालेयां मनुस्य आतुडे. भाट नावं घेऊनि जवं जव वाणीति; तवं तवं फुरकटैजे. म्हणौनि नामाचे स्मरण थोंर ।।२८।। असती परी आंतुल येकु अर्थ या दुसरा. विरहो गेलेयाही मुक्ष (मुख्य) स्मरण येथा भट. कोमळाचा गेलेंयां तें लक्ष्मीधर भटा–

चया सारिखें अनुस्मरण, सकृत जैसे हरी भट, निपुण प्रेत्ने. अकरा विस्वयांचीये ठाऊनि वीस पर्यंत उत्तम. पांचां वरुते दाहा पर्यंत मध्य (मध्यम) येर कनीयस ।।छ।। स्मरणें काइ होये पा. तोंडें करीतां भीतरासि ये. त्यागासि ये. ईश्वरी कनव उपजे, तो चिंती तें होये. अभिचारीक अविद्येचें अथवा अविद्यात्मकाचें चिंती तें होये. बोधांतु जीयें घडली कर्मे तीयें नासेति. अ प्राप्तिचेनि न्यायें, संपादकें थोर ओखटें संपादु न सकेति. तयासिचि सौभाग्य ये. मान्यता ये. येकाधा निमिते विधी घडे. कां बोलतया भीक्षुची जवळीक होये. ईश्वरीचें (स्मरणाचें) गोमटें वाचनिक नव्हे तयाही होनि थोर तें सावंयाचि नव्हे. न स्मरे तरि ईश्वरी खंति ये. तेणे ये थोर वोखटें. नामोचारें कथन नव्हे. करावे म्हणितलें म्हणौन येरें अपरोक्ष ज्ञानीये. देवता विद्यावंत. दुरा श्रवणीये, दुरा दर्सनीये खेचर पिसाचक आईकति म्हणौन ।।२९।। सयेनादीक हें विसरते स्थान. हा तवं अनुभऊ नीद्रा करिता लयंगता होआवें. यथा अनुसरलेयाचें मरण अथवा व्याप (व्यापार) हस्ताची (ग्रस्ताची) नीद्रा स्वभा






वओ न भरतां, ईश्वरू सोडिलां तेणें जीतांचि सोडिला. कां जें मृतेंसीं उपमीले कीं मग तेणेसींचि उठावे ते आत्म लब्धि. येथा सृष्टिकाळवत तो माझारि तुटों नेदीचि. हे तेनु केलें. बैसलयांचा ठांईं श्रमला आला. ग्रामातरी भीक्षा करितां, कां जे तयासि तेतुलेंचि बहुत कीं. आपुलीया दृष्टि न पाहावें आणि जेवितां भुका अन्ने दचितु (दौश्चित्य) ।।३०।। मा, यैसें होये म्हणिजे तोखु उचारणाचा. यैसे म्हणिजे हों म्हणीतयां तोचि विधि वीहिला ।।३१।। येक दोनिवेळ आठविलयां आवज्ञा चुके आनि प्रसौ (प्रसव) होये आणि तेतुले तऱ्हे गोमटें जाले. वंध्य हे व्याप्ती. सकळ चर्या. तेथौनि येक म्हणितलें तऱ्हीं जालें आणि मज काई जोडले. यैसें पाहावें. येक दोनि वेळ आठवण ते ईस्वरेंसी सोइरिकेचा सांदा तुटो नें दावा. यऱ्हवी तेणे काई ईश्वरू होईल? ।।३३।। मा, अनंतु सामाये म्हणिजे ईस्वरू जयाचां हृदै (हृदयी) असे. तेथ आणीक म्हणिजे जीवधर्मु मनोधर्म, रजस्तमाचे मनोर्थ न समाति. याचिपरि तद् वैपरीते कां तो अनंत तेथ दुसरेया अपवाडु दुसरेनि तया अपावाडा ।।३३।।

अदृष्ट फळा लागौनि कव्हणे विसेखु उदीम न करी कां दृष्ट तें बळवतर कीं धर्म बुध्या पदार्थाची नावडी तो विरक्त वैराग्य म्हणिजे पदार्थाची चाड नाही. जालयां तोख नाहीं. नव्हता दुख नाही ।।३४।। भटाचें बोलणें. सेवंटु म्हणिजे सीनर, जुनर, कल्याण, खांदार तीन भाग मऱ्हाटे तो सेवट. सरीसी ते गडे. तेथ ओळखती भेटेति विखये संबंऊ सुपरी वसें माणसै नींदा स्तुति. ओखटीया गोमटीया वार्ता संबंधीयांचीया. जरि ममता तरिं वोवांडी येथा सारंग भागवत; जोग नायेक. गडे कानड, तेलंग, आपुला दोखु सांडुनि वर्ते ते गडे. जैसे साक्तये. आमुची सास्त्रींये भीक्षा. मनुसें थोडी बहुतें हें विवक्षीत नव्हे. सीडी मार्ग सांडुनि अवकास रूप ।।३५।। मा, हाळीया तिया सानीयां दांहां पांचा घरांचीया तीनी वर्ण सकृत पाळिया म्हणिजे अनियेत वासु. येथा वणिजारे वाडिया ।।छ।। पाळी येणे करूनि निढाळता सावेयांचि, कां तों तियें मनुसेंचि तवं परवासियें (प्रवासीयें) मग तयासी केचें ।।३६।। जड चेतन पदार्थ येक सगुण येक निर्दोख. येक सदो






ख निर्दोखा सगुणा स्थानाची नांवडि आणि सदोखाची आवडि तरि थोरचि सवे लागली. तरि धर्मा पासौनि जाइल. कां गेला यैसे जाणावें. तैसेंचि झाडाचां ठाईं. स्थानांचां ठाईं. वासनिकाचांठाइ. भीक्षु संगांचां सुश्रृषे जवळिकेचा ठांइ करितेया देतेया दोघांही सवे लागुली. दोंहींचां ठाईं समानु गुणु अथवा समान दोखु असतां येकेचि ठांईं चित राहे. येके ठाईं न ऱ्हायें. तरि सवे लागली जाणावी ।।३७।। भोग ते अष्टवीध. तेथ विकल्पु प्रधानु. दुसरे न लेखणेनि क्षोभे. येथा उपाधी मग चौखट देऊळ आंगण तेथ थुंकणे, मुतणे हे तीन प्रकार. मग देऊळ वांचुनि येरें स्थानें तेथ वीकारू ।।३८।। तीर्थ येकें सर्वदा. येकें काळ वीसेंखु. जैसे सींहस्ते गंगा. तथा क्षेत्र यात्रा काळीं पुरुष म्हणिजे सामग्री उपाधि सामर्थ्य. आपलवीति म्हणिजे मनातें झळबेंति मग म्हणे कैसें नीके? पवित्र तीर्थ? कैसी सत्वस्त देवता. कैसे पुन्य पावन पुरुष म्हणौन वानी विकल्प संचरे ।।३९।। लेपे धडें अथवां मोडकी. दृष्टें अथवा श्रृतें चीत्रा पासुनि लेप थोर. तेथ नसुधीया रेधा. येथ अवयेव सुधि


येहीं दोहीं वचनी निसेधु. जो देसांमध्ये असे तयासि येरां देऊळचि नाही मग तें कैचें ।।४०।। लिंग जाति दोत्यक होऊनि अत्याज. येथा अविद्या लिंग देह तेंचि कोण. सिखा सुत्र टिळा हें ब्राह्मणकत्वाचें दौतकत्व चिन्ह म्हणिजे वेख दोत्यक येथा पव्हयाचे चिन्ह धौ ओडिला जोगवटा येव मादिक .।।. मुद्रा म्हणिजे वीसेख दोत्यकत्व. येंथा नाग मुद्रा, फरस मुद्रा, या आमुकीये मार्गिचा. झोळी, काठी ती व्येदे तैसी उठी, बैसि कौन दोखुं पां? तों भजन, नींदा, स्तुति, हींसा, विकल्प हें पाच दोख ।।४१।। पात्र म्हणिजे पुढील आपणयातें देखोंनि विखो भोगी ते पुष्टि. चोखटीवं वरील चेष्टा. येथा उदक पात्र मग गौसनी ।।छ।। ओळखणयाचें कार्य कीजे तया नाव वोळखनें. जैसा सीध नोळखतीचिं आईकणे, जाणनें, देखणें, ओळखणें हें आवघें कार्यासीचि वाचक तैल्यकार युग्म. सीध दे सीध. साळ वाहन (हट) डोबें ग्रामी मासोपवासिणी. मार्कंडा सिक्षापन म्हणौन ।।४२।। मनुस्य म्हणिजे वये, रूप, गुणु, उपगुण, जाणिव सीहाणीवु, कुसळता, बळ, प्राक्रमु. तें मनु–






स्य येर नव्हे. तयाची मात्रा कैसी? ना, चिन्ह नाहीं. उपाधि नाहीं. सामग्री नाहीं. असौनि लोपी. कां? ते नाहींचि बोलिजे. न सुधें देह, तेहीं मळीन रोडिकें यातें मात्रा बोलिजे, हे मा. ।।छ।। देह सोखण मात्रा तैसे जीव सोखण मात्र. जीवें मनें मात्रा वर्तावें. ईश्वर पासिचि असे. यैसे अध्यासी. तैं अनिष्ट चुके. येर दुरीचि पडे ।।४३।। लीसि म्हणिजे लुंचणें आंगीचा केसु. खतखांडुक फोडुकळी तोड (णें) माती खरवंडणें, दुसरें आपनयातें चीतारणें. ऊजु सुजु नेसणें, पांघुरणें, पुसणें म्हणिजे हात पाओ धुणें. पाढरुणि पुसणें जीगि मीगि आणनें. हें तया प्रकरणा अन रूप हें आवडे. तरि येर नावडे. कां असं वेधें संपूर्णाची प्राप्ती. ।।छ।। जोगि म्हणिजे मळिन रोडिका दुखीस्तु. मसी म्हणिजे धुळी सारकेत. घसी म्हणिजे चीखल सेण. तो येणें लीतला होआवा. हे मा. ।।४४।। मीरवणें तें यथा वर्ते, वरील आपणया आनि सभे येऊतें न पाहे, ।।छ।। मा. वैराग्य मीरवी म्हणिजे अरणिचीया गोष्टी सांघे. आमुकीये ठाई वाघु सापु याला. पुढीला देखता. ऊनें अन (अन्न) घे. आंग उघडी. फाटुके वस्त्र


दावी तें मीरवणें, हा वीकारू. तेणें कर्ती कठीयाची परि होये. ।।४५।। वीकारा वेगळा नव्हे तरि सुन्यता ते कैसी? ते प्रथम उलेखा वाचक ।।छ।। मा. वीकारा वेगळा नव्हे म्हणिजे प्रथम ऊलेख तो स्वभाव रूप. न संडीत वर्ते यातुची वेगळा नव्हे. येर प्रत्ने (प्रयत्ने) नियेमीत असे ।।४६।। वेडें म्हणिजे जेवितां हे साकवती नीकी जाली. ये वाऊर जाली म्हणे आणि वेडा तो वीकारें, कां? जे. वेडेपण ते मुळीचे. तैसा हा मुळीचा कार्य वेडा. कां जें सीहाणियाचां वीकार कार्यासि नये म्हणौन वेडे याचें बाहीरि प्रकटेति. इंद्रियांचीया वाऊगीया चेष्टा. हे. मा. ।।४७।। प्रकृति रूप तें त्याज. प्रेत्ने (प्रयत्ने) दाटी. मागुते उठिति. परि जेणें उपाये जें समे (शमे) तें करावे. विरूधिये नव्हे. येथा आणि लागलेया गवते घर सीइजे. पुळये खांडुकां मृगांकें काई होईल. इंद्रियार्थ वीकरला तया स्वरूपाचा पर्मर्म्स (परामर्श) अप्रयोजक. तेथ पदार्थाचा वस्तु विचारू अनित्य अभेद्यवत्. आपुली अनित्यता यैसे वीचारावें.






।।छ।। येधिचे (शोधिचे) स्वभावो म्हणिजे प्रकृति. वीकार नव्हे. डोळयाचा पाहिर्जे हा स्वभावो. अन्यथा होऊनि पाहिजे हा वीकारू .।।. वीकारू इंद्रियें धर्मु. देखीजे आइकीजे हा इंद्रियाचा धर्म. यातेंचिं स्वभावों. हातें कातें काडी ।।.।। रजस्तमें पातळें प्रकृति पालटे ना. मग जाणनेंहीं नाहीं ।।४८।। काडी कोन्हा इंद्रियाचा विखो नव्हे. परि वायाचि धरू आवडे. येतुल याचि नांवें वीकारू ।।छ।। म्हणौन हातें काडी धरीजे तेथ वीकारू आणि हींसा सुक्ष्मा जंतुंची आणि अवेक्त स्वरूप तादात्म्य होऊनि स्वरूपे रमत असे. तो आश्रमु मोडिला हा दोख आणि व्यक्तिमंता अनंता अवताराची प्रवृति भंगिली. माहादाईसेचेनि न्याये यैसे च्यारि दोख होति. ।।छ।। गवसणी बरवी. वाहाणा, करवती, दुधीया काठी, पायेपुसी, जोगीवटा वोडियेणा. नीतळ थिगळ दांत ऊटी, डोळे चोखट आंगवस्त्र कवतिक पाहों जाणें. बरवी घोडीं पाहे. मांदी पाहे. हाती काडी धरे हा सेवटु वीकाराचा. कवतीक कव्हणीची न पाहावें. कां पां? म

रण पावैल. येथा पर्वे दांईबा. येथा जैदुर्थ (जयद्रथ) अग्नि प्रवेसें (अग्नी प्रवेसें) अर्जुन देवाहां म्हणौन धर्म वेतिरिक्त कांहीचि न पाहावें. दृष्टा दृष्टी दोखु होईल ।।४९।। बहुत सवे धर्म वेतिरिक्त स्नेह उपुणलें न नसे तै प्रथम उलेखाचा दोखु. धर्म कार्य नासलें तरि दुख करावे अल्पचि. येक दुख ईश्वर निमित्यें येक श्रृष्टी वेवस्ता येक पुरुषी अपराधें सेवा सुश्रृषा श्रम निवृत्ति वेक्ताचें. श्रृष्टी वेवस्ता अव्यक्ताचें तयाचि आंत मेलें अकिजताये (आइकिजताये) पुरुषें ज्वरू आणिला पाठी प्रत्नें साहीला, तरि साहावें म्हणितलें. असें ईश्वरू स्वीकरित सृष्टी वेवस्तेचें साहावें, ईश्वरू स्वीकरिति ।।छ।। मा. ये दसे म्हणिजे कोमळ दसे साब्दें कार्य संन्यासु आति म्हणिजे रजस्तमाचें कार्य नियेमले असे. न्यासु म्हणिजे निरसण असे. परि अत्यंतीक कारणाचा नाहीं. चातक न्याये प्रथम उलेखाचेंचि तवं नाहीं. जरठत्वें वाचुनि. दुसरेया उलेखाचा अति तो कार्यरूपु ।।५०।। जें निरसणे तें तैसें देह स्थान, संभावना ये दोन्ही जाली तरि आपसया होये, ना यैसा येकाधा सदैव संबंधीं असौनि तरि ते विपायें मग धर्माचि मिख करूनि जे रसाळता सब्दांची झाडाची उचिता






अन्नाची रकरके पण, तेंहीं, ना. देह इंद्रियांचें दमन. रजस्तमाचि वसतीचि मोडिलि. जैं, निंरसण आणि मनाचा धर्म सत्वतो राहिला. तैं धर्माधिकार जाला. सत्त्व ऊपजावेया देहाची अनित्यता आणि उभयाचें दमन. धर्मु म्हणिजे सास्त्र, चर्या, दुख आर्ति येवंमांदिक तया अधिकारू ।।छ।। पद्मनाभि देवी मनोंर्थ केंला. माझ यासि गोसावीयाचि बुधि होयें. कां तरि मी येथें असों लाहे. येतुलेनिं अपराधें जाडि पोतेहीरतले. मा, रजस्तमाचे आवडिचे मनोर्थ निरर्थ कैसे ऊपसाहाति ते नेणिजे ।।५१।। आचरता म्हणिजे नीसेधा नातळे वीधितें न लंघे. कां निरंतर प्रमाणा अधिन क्रीयेसि उदीत असे. तयाचा धर्मु म्हणिजे सास्त्र, चर्या, स्मरण, दुखु, आर्ति, नित्य वीधि, निमीत्य वीधि, स्थान, प्रसादु आवघे तयाचे. हे. मा. ।।५२।। निरसा म्हणिजे ऊंस पीळीजे मग चोवड उरे. आस म्हणिजे आमुके होआवे. येणें मज द्यावें. या घरा जीओ मग काही सुति वेवस्तीक सुती तयाचि जाईजे तो आश्रो. आश्रो म्हणिजे आलिंबण. धर्म वेतिरीके माणुसाचि ये ठाऊनि सुइ थीगळपर्यंत अनुचिता पदार्थाची आस. अथ


वा संग्रहो हाही विकल्पुचि. येथा सीदेवत. परि उचित धर्मु प्रसादु संगा लागौनि भीक्षुतें प्रार्थणें हें ही तेंचि तरि तयाही लागुनि तोचि प्रार्थावा असनिधानी वीधि क्षाळन, मात्र येकु शब्द तया जे म्हणावे. हें कार्य परि अंतकरणी यैसे वासनाही न करावी. हा मज देईल. मग उचित देसु गावों घर याचा ही आश्रोचि. मी येथें अमुका काळ पाहारू, येक दोनि पर्यंत येथ असैन, यैसे न म्हणावें. यावत् बाधु. हे कंथा, झोळी माझी नव्हे जया देवविली तयाची मग हें देह माझें हाही आश्रो म्हणिजे ईश्वरासी दिधले तें; माझे कैसे? येणे करूनि असतीपरीचे तिन्ही शब्द योजावे ।।५३।। सुख म्हणिजे सुखरूप जे क्रीया. ते न करावी. देऊळाचा उबारा. कंथेचा सुरुवाडु दाट साईली उन्हाळा तोंड पाये धुणें सेआळा (स्थाळा) वोतपळी. श्रये म्हणिजे पुन्य रूप क्रीया ते न करावी. जंतुत्रीयें (तिर्यंच) याचि कनव. तान्हेला भुकेले म्हणणें तया नीके करणें भया मरणा दुखा पासौनि सोडवणें तै केलयां श्रये होये. टेळेनि वरि पडीलेया कीजे. दुषणा भेण, तेथ बाधु नाही. कां जे अपराधें टाकीत आलें; न करिता निदें भाजन होईल. तेणे तया






पापा आपणयां पाप देवतांचिया क्रीयां तोखिजे तेने श्रेय होये. परि आपणेया धर्म हाणि. हे मा. ।।५४।। रसु म्हणिजे उचीते पदार्थाचि गोडी. कालवीलें अन्न, देऊळ, झाड, येवं मादिक क्रिया म्हणिजे वांचि (वायाचि) उठी, बैसे, चाले, बोले, खत खत सुटे ।।छ।। वाया वाया व्यापार कीजे. येथची काडी येथ ठाविलया, तेणे हींसा आणि आज्ञा भंग ये दोंन्हें वाचुनि अव्यक्त ईश्वरू तादात्म्यक जाला असे. तो आश्रामु भगिंलया अव्यक्ती तरि नाही. परि व्यक्तिमंतचि दुखवला. काजें अक्रीया होआवें. तेंया तव ।।५५।। कर्में म्हणिजे बहिर्यागु, पुन्य रूप क्रिया. पाप रूप तें अकर्म. हा चतुर्विधी विकल्प वासनीकु करी. परि अकरणें हे गोंमटें तें नेणे. यैसाही जरि करणें तरि येथचाचि करूं कां? भिक्षु, स्थाने तेथ करावें. मग तें फळ ईश्वरू देईल. कां तो चींतामणि की अनेत्र आर्जीत द्यावे. जे लीळा वसें देईल मग अनुसरला जेतुकी क्रिया करि मज गोमटें होईल याही विकल्पुचि प्रत क्षेणी मी गोसावीयांचें दास्य करीत असे. यैसें निदिध्यासन करावें येथा सोमण ।।छ।। कर्म म्हणिजे वेवसाये रूप जयासि जो उदीमु, जीये


जाती जो वेवसाओ, जीये वर्णी जो उद्येमु, अनेगी काळा चमतकार रूपा वेद, सास्त्र, जोतीक मुक्ष करुनि वैद्यक, जेतुलेही पोट भरायाचे उपाये यातें कर्म सब्दें बोलिजे. धर्म सब्दें देसु धर्मु, ग्रामुधर्मु, जातिधर्मु, वर्णधर्मु, कुळधर्म, आश्रधर्मु, पुराण धर्म, आगम धर्म, प्रवृत धर्म, निवृत्ती धर्म, युग धर्म, राज्यधर्म, हे धर्म शब्दें बोलिजे .।।. वीधि म्हणिजे विहिला तो. जयाचा अकरणी प्रत्यवाओ, नित्य निमित्यक संध्या, स्नान, षड कर्मादिक. मग श्राद्ध तीथि पर्वणि इत्यादि वीधित विखो पांचा इंद्रियाचां अष्ट भोगादिक. जेयातें जेतुला असे तें संडुनि ईश्वरा अनुसरावें ।।५६।। वृतिचां ठांई वाक्य लंघण आणि आत्म विसयेणी हींसा आणि स्वतंत्र वीधि येथा ईश्वरू स्तीतीसीं समाणाधिकरण. कां जें भीतरि येक सराचि उभडु ऊठी. रांगवळी कडा हा मात्रेचा सेवटु. या परती ते वृति. वृती आचारू स्वभावे पडे. अथवा अनुतापें अथवा ईश्वरीचिया थोरी या करण साने देखे ।।छ।। मा. सत्वाचेनि भरलेपणें स्वभावी प्रयेत्न लंघतै वृति





स्थिति सत्वाचेंचि समाधान. स्मरणी सास्त्र आठवितां समाधान होये. तेथ रमे ते स्थिती. अधिन म्हणिजे तेथें भर. तेथचि आते. तेणे आणिक वीधि न स्फुरे; ते नव्हवे ।।५७।। मागिली सुन्यते आंत याची जन्मभूमी सांगितली नाही. तें उथान कोनाचें पां? मन इंद्रिये ते येथ सांघितली हें देह ईश्वरा अर्पिले. तया सरेसा इंद्रिये मनोधर्म अर्पिला. आतां लोकांचा पदार्थु कैसा भोगावा. येथा म्हाइंभट म्हणेति. मा, तें येका पाईक याचा दवना नाहीं. आपण पर्वें जे सामग्री तेही अर्पिली आणि हां अभिप्राओ जें सोच्या इंद्रिया. जीवाचा धर्मु परिलाभ धाडिला ।।छ।। मा. नव्हतयाचां ठांई विसेखें कल्पी. आन ईश्वरी ईस्वर बुधि मग पवित्र, अपवित्र मग सुच्य, असुच्य विटाळ येवं मादिक मनीं कल्पे म्हणौन विकल्प. मनोधर्म .।।. पदार्थ संबंधें इंयें अनारिसी होती; म्हणौन वीकार इंद्रिये धर्म. विकरे मन पर इंद्रियादि भावे. या तव इंद्रिये धर्म म्हणतलां देखणें, आईकणि, संवादु घेणें, परिमळ घेणें. स्पर्स हें इंद्रियांचें ।।५८।। कास्ट निर्विकल्प

आणि अभिचारका उपयोगा जाये. पर आपण काईसयाही न वचावे. येणे करूनि साह्य सांघितलें. वाट पुसणया आपुला पदार्थ राखणें हेंसानें ही न करावे ।।छ।। मा, हें तै होये जै तैसें तुटकें देहा जवळी काहीचि परिग्रहो नाहीं. जो पुढीलाचेया उपयोगा जाये. जीतु न वचें. काई पां? परि सरलेयांहीं, न वचे. जे जंतु न लगेति ।।५९।। तुमचेनि म्हणिजे जें अनुसरौंनि साधनी प्रवर्तेणें. तेतुले लाभेति. मुंगी रांड म्हणिजे तिये परतें साणें नाहीं. परि हा ठाववेऱ्हीं नित्राण बळें सामर्थ्य हारवींलें जें पांयांखालि मुंगी पडीलयां सरे ना. यैसे करविलें हे, मा. ।।छ।। मुंगीचि कां? सोच्य नव्हे, आनि तेनेसी साहावासु. येणे करूनि देहाची निबळता आणि मनाचें आळस्य, उद्वेगु. कडेयां परौती सीमा नाहीं. हा मात्रेचा सेवटु. मुंगी हें बळ सामर्थ्य ।।६०।। पडेला म्हणिजे पदार्थ विखइ वासणा नियेंमिलें होती. तिये वरौनि लोटला आपजवने यां टेंकला .।।. धुळी म्हणिजे सर्वत्र संभओ विदेसीं पदार्थु बीदी सांडेति पर सुतीयां सुआवें यैसें परागत्नचि (प्राक्तनचि) नाहीं. वरि देह






चि. तैसें जें आपजविलयाहीं न लभे. तरि आणिकें भनगें, लाहाति कीं तियें कृपा पात्रें आणि जियैजियै सब्दें प्रार्थेति आणि तो उदासीनु ।।६१।। मा. पुरुषे म्हणिजे स्वतंत्रु वीधि अळंक्रीला. आपले म्हणिजे ईश्वर दास्य करणीये म्हणिजे हा माझा वीधि म्हणौन करी. सतें म्हणिजे पाइकयाचीयें ठाऊनिं सतेंव्हेऱ्ही वीधि कारणें मीळेति. दैवाचेनि कडे. निमित्य वीधि तरि येसणी पात्रता आणि स्वनीष्टीं तरि यैसा अपात्र. जें आपजवीलयां न मीळे ।।६२।। यैसे अपात्रता जाली तरि तमासि काइ करावें. तेथ डोइ वोडवावी. डोइये हाणतलयां थोर दुख आणि दैन्य. येक डोइ वोडवनें. येक सहाणे. येक लपवणें. उत्तम, मध्यमु, कनीयेस. ईश्वरू भीक्षु वेव्हारकेव्हेऱ्हीं हें तुझे अनुचीत म्हणितले तरि पोळोनि आपुले वोखटें देखावें. तेणे जेया सविया दिआविया तिया काक पुर्वक आपण यां आपण देआवे याहें तयाचीये खंती उपमर्दक तो उत्तमु. साहाणेन तयाची खंति न वचे तो मध्यमु. मग आंबतोंडा डोळें करूनि येके परिचा परीहारू दे तों कनीयेस. मग तयासरिसें आद्यतरे तो अधमु हे कां होववे त्रसु आ–

णि चाड दोन्ही होआवी ना नसुधा त्रसु तरि जाये. मग न व्हवे. ना (चा) डचि तरि करणी भवीस्यता देखे. येथा वासनीक अनुसरैन यैसे म्हणे. परि जेने त्रसें सांडी तो नाही ।। पुढीलाचें साहावे डोई वोडवावी हा थोर निमित्यवीधि. येर सारीर व्यापारू होववे .।।. येकु सेवटु डोइ वोडवावी येकु सेवटु सेवाळैलयाच बिढार. तैसेचि पात्रां न व्हावे. कुपात्रा होआवे ।।६३।। मा. मारिता म्हणिजे वोखटें अनुहीत करी. पुजिता म्हणिजे गोमटें हितकरी मारिता म्हणिजे अपमानु दैन्य करी. पुजिता म्हणिजे मान्यता स्तुति करी. समानु म्हणिजे निकेनि तोखे ना. वाऊरें क्षेभेना. उपकारें हे तुस्टेना. अपकारें विरोखेना. अपकारें क्षोभ पां न व्हावा. पर उपकारें तोखु कां न व्हावा. ना, तोखत्वे निके चींतील. का करील. तेने अन्य भजनें पुन्य होईल. प्रसौनि धर्म हाणि तें करील म्हणौन सम होआवे ।।छ।। विरोधिया क्रियांचा ठांई विचारें बुधि नीरसावी. जेयाचें प्राक्तन यैसें जे मियां अनंता सृष्टी केलें. म्हणौन हा ठावो वेऱ्हीं पातला. तें पा नव्होवे तरि कार्य संवरावे वाच्य, केलयां थोर दोखु येथा डावोवत भटी डोंबेग्रामी म्हणितलें गोमटे जेणे केलें त





यासी आपणयातें कांही संभौ. तरि वेंव्हारिचें गोमटें करावें परिधर्म ना. तो संभऊ नाहीं तरि आभारैलेपन न व्हावें. तैसाचि भीक्षु अनचीत आभार न स्वीकरावा. अथवा उचीतही न स्वीकारावा. ईश्वरी का भीक्षुचां ठांइं कांहीं अनुचीत बोले ते ये खंति जीवा सक्ये नव्हे पर रोखु न करावा ।।६४।। मुंगी ये विरूं म्हणजे हा ठावो वेऱ्ही अहिंसकत्व सोच्य अज्ञान कोने दोखु अवीधिचा प्रसौ, आणि ईश्वरी खंति वेखा अनुरूप आणि मुक्ति म्हणिजे मोक्षे तया विघातक कपाट. कां जें बंध कीं ।।६५।। मुक्ति म्हणिजे मोक्षु. चाड म्हणिजे असंसा होवावयाची आणि तेनिचि म्हणीजे मुक्तीची चाड आणि आणिक पोटीं भरणे तें, निराकरिलें. खुंट म्हणिजे स्त्री दावे म्हणिजे संबंधीये दावे नि मोकळेपण असे आणि खुंटे भळों चळो नये. तैसे स्त्रीयेचेंनि स्नेहें गतिचि नाहीं. संबंधियाचेनि असे. म्हणौन मुक्तिचिया चाडा खुंटा दावयांचा सांभाळ तो. ना. तेने मुक्ति अंतरे. हेमा ।।छ।। अनुसरणें विण दाइंबासि अज्ञा केली, गोसावी खुंटाचें दर्शण कां दिधलें? ना, जेतुके केलें तेतुलें गौराइसासि क करो, दी


धले. व्रत नियेमु यासीचि येओं आवडले. म्हणेति. पाठी बोके तोडीति हा अपराधु. खुंट म्हणिजे देसु, गावु झाड निमित्य. संगु व्याप्ति दावे हें वासना ।।६६।। येंद्यपि पुढील अधिनु जाला तरि आंगे कसकसी, व्यापारू करावा. परि जीवें ना, अधिन म्हणिजे अनुसरण तात्पर्य जें, चीरकाळ न लभे. तें पुढीली वचने सांगिजैल. देह पर्यन्त पतिव्रतेचा ।।छ।। अधिन न करावें. कां जें यैस्वर्य आरोपेलया तवं. करितेया दोखु नव्हा वै जै वासनेसि. जयाचेनि धर्म प्रतिबंधे जालया धर्मु अंतरे. ईश्वरा खंति. कां जें आवघी बंधने तोडिली मग अपुर्व लाविलें यातव. हे मा ।।छ।। वासना वाढवी. आणि अन्याओ करि त्येजावा. कां पां? मरण येईल म्हणौन तेजावा जैसे लुई पाईतें रावो हासिला. हाति घोडें परिवारू हांसे ।।६७।। मा. जन्म म्हणिजे बाह्य. जीवीत त्यें अंतर येथा दासिपतिव्रतावत कोरडा वीधि आचरे तो पहिला. अंतर सहित तो दुसरा ।।छ।। जन्म बोधाचया लागौनि जें जीणें. दैवसवा तो भोगु तें देणें कर्मसवा भोगु तेतुला ने देणे ।।छ।। अहेतुक चर्या करी कैसेनि पा? ईश्वर वासना करी तो अहेतुक. ईश्वर वासना हा हेत न–






व्हे. तया आंतु सनिधान देति. अपरोक्ष देति. हे हेत न व्हावि. अज्ञाननासि अहेतुक घडे. ईश्वर वासना. मा ज्ञानियां ज्ञानें करितु असे तें थोर ज्ञानांतुल म्हणौनि याही प्रेम लाहे आग्रह्याचिही लागे ।।६८।। वटो केरडा (कोरडा) ईश्वरा लावितु असे. मीख पांत असे. जैसा चातुक प्रेत्नेया ही कोरडा तो लावीतही ना निरहेतुक च्यारि दीस म्हणिजे आर्तासि बहुतर काळ न लगे ।।छ।। सिवो, अैसा असें म्हणिजे देहसेख उरौनि. वटोवटो म्हणिजे निढाळ. रात्री दिसु सोचित असे. कैसा जीन, कैसा निस्तरैन यैसा पुढीला जीन यांचें सोचिसी येथा माया सांडिली अपत्य वटो वटो करीं. आपुले म्हणिजे जेथोनि अनुसरला तीये दिसौनि अरौते दिसते. आपुले येर कर्मराहाटी आंतु गेले ते नव्हेति .।।. च्यारि दिसु म्हणिजे हे बोलती परिभाखा, येथा तुझे च्यान्ही दिस जाले दुसरें आर्त तो लवकरिचि नेति म्हणौन च्यान्हे दिसु. पर च्यारि दिस लागति ना. कां पां? जें दों घडियाचा पावे म्हणिजे कठै घाली म्हणिजे दिसु वाया न वचे. लेखीं लावें. दुखेसी घाली, येकु दिसु म्हणितलेया सेवटीलु दिसु जिये दिसी ईश्वर प्रसन्न ईश्वरा तोखु ईश्वरा न्या –


वयाचि प्रवृत्ती. ईश्वरू उतवेळ जीवा प्रपंचांचा विभागु तो दिसु जैसा भांडणत हटि पडिलया म्हणेति राहे. माझा येकु दिसु आहेचि की. मग तिये दिसीं आवघें उमचवी. नव्हते म्हणिजे जींकलि मीरवीं. यथा सौरा पार कयांतें जिंकोनि अरुनि भेदुनि निगे. मग म्हणे हा नव्हे रे मी आमुका तमुका म्हणौन नाव सारी, तैसें देहातें, इंद्रियाते, दोखातें, कर्माते, प्रतिकुळाते जींकीलें. मग नव्हे रे म्हणे जांऊं लागो म्हणिजे आर्त तो येणेचि देहें ईश्वर दर्सणसि जाये. येर तो पुन संबंधासि जायें ।।६९।। मागा सुरी पाटी जों ज्ञानीयां तो उत्तमु, तळमळ तो मध्यम का जें अवस्था उपजौनि धाडितु असे. जेणे जाये, मोकळी सुकवी तो कनियेस. जैसे या भक्ताचीया तीन्ही अवस्था आपुले प्रेम कां जें विखयें प्रेम निराकुलें. दुसरे तिये मुर्तिचां संभवी तेंचि, ना तरि आपुले निज तें कां तळमळीतो जरठु विन्हया अथावा कोमळु येरा उपजेचि ना. ईश्वरू होआवा तोंचि भेटावा यैसी जो (चा) ड केंली, ते ईश्वरें पुरविली आणि अनुसरला यातें चाड नाही. ।।७०।।






मा .।।. अप्राप्तिते सातांचि पदार्थाची, स्थान, प्रसाद, वासनिक भीक्षु, सास्त्र, ईश्वरू प्रेम. अमुके नव्हे तें मज कैसें होईल अपराधीया पापीयासि, जें मज मी करित असें तया तवं. अमुके तें होआवेंचि. यातें आर्ति. अमुकेन नुस्तेचि चर्येचा अपरिथोंखु (अपरितोखु) अप्राप्ति नाही. कां जे. पदार्थ नव्हे. रासि म्हणिजे कर्माचे डोंगर संतें अेकतौ नानाविधें वीचित्रें नासेति. हें वीधि पसि थोर ।।छ।। अप्राप्ति हें सामान्य वाक्य. ईश्वरीचि यैसा विसेखु नाही. तरि तेणे विसेखु ईश्वरूचि लाभे आणि सामान्य तरि तयाचे भीक्षु, धर्म, प्रसादु आवघें चि लाभे. तरि नासु तो कैसा? या तवं आवघेंया निमित्य वीधिचा बाप सर्वोत्तमु आधि अदक्षता मग अयोग्यता, मग कर्मे रासी म्हणिजेति डोंगर, पर्वत, नाना वीधें असते संतही ।।छ।। निमित्य वीधि न व्हावयाचा पुर्व पक्ष कृमें नासु हें येक. दुसरे ईश्वरा विसेखु प्रवृति होआवे. तिसरे सनिधानी धडलें. सिधांते अयोग्यता नासौनि योग्य करिति ।।७१।। येव पर्यंत ज्ञानी संपुर्ण. येवं पर्यंत प्रेत्ने या म्हणिजे अयोग्यतेचा नास. दर्शन.


कोरडा निढाळ आणि साध्य करणीं पाळीयां काहीचि आश्रो नाही छर्दोबा तो सनिधानीचा तयासी तोचि आधार आणि येक दोघं कांटियेचा तळमळी यातेही सनिधानीचे आर्त प्रेमळु भावाळु. तयासि तोचि आधार. .।।. आपुले म्हणिजे जिये काळी, जिये स्थानी, जया पुरुषा, जेणेसि जेसां मनुस्य प्रति अनारिसा विधि मग प्रतक्षणी मज काई करणीये यैसे विचारावे. देसाचा सेवटु जेथ उभयेता जाणीव नाही. झाडु म्हणिजे नपुसक, पुलिंग नव्हे. आनि स्त्री लिंग नव्हे. वडु, पिंपळ, आंबा, उंबरे, कविठ, निंब, हे वृक्ष, झाड नव्हेति. बोरिं, जांब, चींच, निंबोणी, माहुंळिगी, डाळींबी झा (ड) नव्हेति. काटी पुरस्करिलें असे. कां तें झाड होये. जैसे कुवारि बाईल नव्हे. बटीकु दादला नव्हे. फळते फुलते नव्हे, ते झाड. तरि कांटीये फळ फुल होये कीं? तें मनातें आपलवी यैसे नव्हे. स्मरणातें भंगी यैसे नव्हे रजस्तमें झाडी ते झाड. सुख दुख रहीत ते झाड तैसा






चि वासनिकु. तैसाचि भीक्षु, तैसाचि असक्त, तैसाचि सश्रृसी, तैसेचि निमित्य रजस्तमें नीरसति तेंनें आश्रावे .।।. सा तै सया झाडातळी म्हणिजे तयाचि खाली. येणें करूनि तेथचि नीत्य वासु करवीला. जन्म म्हणिजे अनुसरणा नंतरे जें जीणें. सार्थ म्हणिजे कृमेंचि प्रेत्ने धाडी ।।७२।। कांटी म्हणिजे दुख साधन. येकी तळी म्हणिजे सेवटु पर्यन्त तेचि. म्हणौन येकी दुसरे गति कुंठलया सेवटीली दीं येकीचि तळी घातलें म्हणौन येकि. सुकवणें म्हणिजे अस्ती, चर्म येक जालें. मास आटोंनि गेलें. न सुधीया सीरा डिळडिळती पासुळीया तें सुकवणें. सुकविणें ते काइ उपावासुचि केले? म्हणे ना, हळुहळु सयेमें सुंकविले. मात्रा न लंघति पांडि म्हणिजे आपुलेनि उंत् कर्षे पुरुषाद्य केंलें, म्हणौन पांडि. यैसाही म्हणिजे वीस्मयो अतिसया रूप. येक आति म्हणिजे बाहुल्यें नाही. यैसाहीं आति तो मनुस्यानां सहश्रेषु म्हणौन येक. हेमा ।।छ।। सुकऊनि जरठु प्रेमळ विन्हया ईश्वरा भेण सकळ चर्या वीधि क्षाळन करी कांटी मात्र

।।छ।। पुरुष प्रेत्ने साह्य, हा पहिला थोडा कर्म नासु. येवं पर्यन्त हा उत्तमु अप्राप्ति नैमीत्यके दुखे हा याहीपासौनि उतमु आर्तु तो तयाही पासौनि उत्तमु. तळमळीत धाडी तोतही (तयाहि) पासौनि उत्तमु. सुकौनि पडितों तयाही पासौनि उत्तमु. ।।७३।। मृताचे धर्म मानापमान, अहंता, ममता जीवतु रजस्तमी. मृत नेत्राणु. मृताचे धर्म म्हणिजे जो तामसा गुणाचा नीयेमु. येने मारें नेणता म्हणिजे मज मान नाहीं अवज्ञा केली. मी आमुकयाचा, मज पासौनि अमुक्यातें मानि. मग कहीं रजें आपलवे. बळां जाणिवे अनुरुप ।।छ।। जितेनि मृताचां धर्मे वर्तावें. जीता म्हणिजे सर्वावेव संपूर्ण. जैसा उधरणी मनुस्य देह युक्त आणि बरवा बतीस लक्षणु, अवलक्षण नव्हे. तो जीता म्हणिजे करूप अववेय हीण; अवलक्षण तो जितुयांतु नव्हे. तो मृतांतु केवि? जैसा जीयेचा येकु अवयऊ देखौनि अलंगाचीयां मुणैवरि घाली. पाठी सरणावरि तियेचीं सर्वांगे देखे परि आड पालौ वोडौनि जाये. तैसें करूप अवेव हीण कस्मळ देखोनि वीकृति ये थुंकी, खंती ये, जैसा कुष्टियाचा दृष्टांतु तो पुरुष जीता






नव्हे. यैसें या होआवें. आपुलें बरवेपण लपवावें, जैसे रिधपुरी गोसावी लपवीलें म्हणौन. यैसेनि पुरुष मृताचां धर्मे वर्तावें. करूपां कस्मळां अवलक्षणा, वेड्यां पीसयां होऊनि वर्तावें. जैसें आऊसें चींच बरवटा तोंडें माखिति. पुढीलासि आपुले विकृति उपजें, जैसें नेसितो, यैसे पांगुरीजे, तैसे चालीजे, तैसे बोलिजे, यैसे बैसीजे, यैसे उठीजे, अैसें जेविजे, यैसे निजीजे. यैसे वेंभळ दृष्टी पाहिजे. यैसे वेंभळ आईकीजे. यैसे जरि बतिस लक्षेणें पुरुषें वर्तावें. जैसें कांतिये कैसा, पिंड, यैसा कां उपक्षिला. तरि ये, करूप. अवलक्षण, कस्मळ तेणे पुरुषें लीसीपुसी कैसे करावे म्हणौन मसी, घसी लीतलेयां होआवें. परि जीता ना. जीता म्हणिजे जैसा जाधवाचां करवी जाऊगी नावें राऊत तो बरवा. हा जीतुयां आंतु आणि जया पुरुषाचे गोसावी पुर उठवीलें ते पुरुष जीतया मधें आणि येथचें सारिखे अनेत्र आति तै पुरुष जीतयामधें आणि ढोरेस्वरी सामान्य स्त्रीयां प्रति अनेत्र जाति ते पुरुष जितयांत आणि रुधिपुरा आले. पुरुष जेने मग या खालुता जो जेतला बरवा. जो जेतला लक्षण वंत. जो जेतुल पुरुष स्याहाणा. जैसेसि तरि कहो रिसावेखु आनिभाखा बोलीजे. मग

तेतुल तेतुला जीतया आंतु. येर मृतांतु आणि संपुर्ण पुरुषार्थाचा संपुर्ण सीहाणा तों जित्या आंतु. येर मृतांतु. असामर्थ्यवंत आणि दैन्यभूत अपयेस रूप जिणे; तो मृताआंतु. येस रूप जेणें तो जीवताआतु. जैसे भट थोरा प्राकृमाचे (पराक्रमाचे) सर्वज्ञ म्हणितले. तीये अवसरें वानरेस यैसे दिसत होते. सृष्टी संहारू करिती. तीयें वानरेस यैसे दिसत होते साहास (सहस्रा) पाठिमोरे करीती. डोंबें ग्रामी जुंझविले. आवघेयांचे घाये चुकौनि भटाचे घाये लागति. खडकुलीये सांडोवा चणयांचा भारा तिसनयां प्राक्रमाचे आणि देऊळ आवघयांचया पसि उपर वाटीं पाहिले. यैसे बुधिवंत यैसे पुरुषार्थाचे ते जीवंत. येर मृता आंतु. जयाचेनि मुंगी रांड नव्हवे. यैसेया निबळा नीत्राणा होआवे. सुकरूपे क्रियेदुखरूप क्रिये मानसीक. अनेथत्व उपजों ने दावें मेलयां चया, असावे. परी यैसा त्रीती पुरुषी तरि नीर्बळी असति. कैसया परि वर्तावे जरि वर्ते जे, तरि दृष्टीचि अपयस पाविजे. शारीर मानसिक दुख पाविजे. देह घात घडे, यैसा अनर्थ पावै. म्हणौन, मेलयां यैसया असिजे. जीणे हें चित अपयेस आणिकां अवतारा प्रति. अनंता अपरोक्ष ज्ञानीया प्रति गोसावीयाचेया उपकारा मीति नाही आणि जीवाचया कृतघ्नत्वा मीति नाही. हें काई म्हणावे असे परि.






अपकारा मीति नाही. यैसे विसेख ज्ञानीये म्हणेति, धिगु धिगु भुइं भार ती जीवित याचें. सर्वज्ञ म्हणितले पारे हो आतां मरा तरि चांग. चक्रवर्तीचां वियोगीं तयां पोरां भीतरि. कोन्हा कांही नव्हवेंचि. येकलीया कुंतिया आईकत क्षेओ देहं तेजिलें आणि उधवदेवीं म्हणितलें चक्रवर्तीया वियोगीं झाडें सुकली ये जीतीयें, काई उधवु. येसें सांगितलें आणि मारा मारा तुम्हा पसि सुणें चांग, जें, येथचा वीयोग साहो न सकेचि. हा, गा, येणे विंन तीये आझुइ जीतें असेति. यैसे आठवा आठवो परि जीवांचे उर्ध (हृदय) न फुटे. यैसें अमंगळ जीणें आपुलें जालें. तें सोंच ना सांडुनि मानाभिमाना काईसे. गोसावीया वीण जीणें हेचिं, तव भुईभार जाले असे. मग अहंकार गर्व मठारा तो कइसा. हें सावयां माहां पाप, कोढावरि दादु ।।७४।। धड हें वासनी काहीं लाभे. विकल्प, हिंसा. .।।. धड तुटले म्हणिजे काळ, दुकाळ, असक्ति हेर, चोर धाडि बीगारी येतुलें धड तुटलें. आधें तुटलें, देह मात्र उरे. सीस तुटले तो समग्र मेला जीवें म्हणिजे काहीं करावया दक्ष नव्हे. येथ उचारणे, का मनें चिंतन, येतुले न संडी. काहीचि सामग्री प्रकाशी ना. सामग्री प्रकासिले; तो देवते सरण गेला. ईश्वरू सोडिला. वेदु, शास्त्र, वैद्यक, सर महुर्त वोळखी काढी तेनें ईश्वरू सोडिला. अविद्ये लागौनि साहे

तरि नरका जाये. म्हेळीये जन्म दिधलें. येणें न्याये ईश्वरा लागौनि साहे तरि तिये जातीचया अनता कर्माची ली पुसीति वासनीकाही आधि करूनि भीक्षुची कनव असे तरि ते व्हेळीसीचि नेति. कणव नाही. तरि तेणे उपजे ओखधा टेंकें तया पसि मंत्रा टेके तो वोखटा ।।७५।। मोकलणें म्हणिजे यौग क्षमु भावीया देहाचा वारें, झाडि, पाखाण, येव मादिक प्रेत्ने करणे ।।छ।। मा. .।।. खळाळ म्हणिजे वाघा सापाचि संभावना. चोरांचा करण. यैसे संभावने सेवी. भयातै न गणी, श्रृत दृष्ट वांचुनि देहावरि उदासु आस्त सांडीली. प्रेत्न करवीला तेतुला करि. सुख नासंसीयाते मोकलणे बालीजे .।।. आनि खळाळी मोकलतें हे ममतेचा वाचक. भीक्षा करू णीघाला आणि च्यारी टके सक्ति असक्ति म्हणौन गाठी बांधले तरि, नाही मोकलीले. अटणा निघाला आणि आगळी झोळी, आगळे वस्त्रे, आगळा कुपिन, पुढा न मीळे म्हणौन पाहिला तरि नाहीं मोकलीले. अनिं वस्त्रे उदकी आत्म संबंध तोडुनि. ईश्वरी लावी देवें स्वभावा मात्रा देववीली म्हणौन दे येतुलेचिं. यातें मोकलणे बोलिजे ।।७६।। रांगवळी सारीरे, मानसिकें दुखें वाटणें, तथा प्रतिबंधु न करावा. काई स्वरें दिधलें तें आपण भंगीजतं असीजे. ।।छ।। रांगवळीयेचा आणि–






कांसि नीबळता तों, ते, ना, तें पुढीला सांघिजत असीजे ।।७७।। मांगां मुंगी रांड तियेचा विणयोगु कटंकटीये ।।छ।। मा. .।।. कटंकटीये म्हणिजे देहे सेख उरोनि असे. जैसा कां वारेंन पडैल. बळ पुष्टि प्राकृमु काहीचि नाही. देह सेख असे. ।।७८।। सुख साधन म्हणिजे सुखचि साधिजे अथवा सुखाचि लागौ साधन अभ्यासिजे. अथवा जीयें सुख साधनें तेहीं देवो न पविजे. हें काई म्हणावे असे पर व्येव्हारीची ही क्रिया दुखें वांचुनि न पविजे ।।छ।। दुख उपजे यैसेचि साधन दिधले. दुखा वेगळा करावया दुखें दुख नासविया हेतु. सुख जीवों आतिचिना दुखचि बहुत असे. मग चर्ये तवं दुख होये ते आनिका सांगो बैसे. यैसे तिमलो, यैसे कष्टलों जाले, भीक्षा न मिळे ।।७९।। उठणे म्हणिजे देही काई इंद्रियांचा व्यापार स्वभावादिक. दुखता हातु पाये पठि पसरणें जाडी परिहारणें निमिखोनिमिख. अथवा नसुधें उठणें बैसणे सानिये क्रियेचा उपक्रमु म्हणिजे मी या अझुइ कराविसे आणि विहित तरि नव्हे. वाया जाइल कां? तरि योग्यताचि होईल. जव अनुसरण तवं निष्पत्ति नाही येऱ्हवी केले क्रिया काई वायां जाति असे. तैं वाया न वचे. जै स्वभाविक खते खते लेखी लागे. येथा दास्यवत हें जरि वायां न

वचे. तरि येसनी भीक्षा हा सनहीत संबंधु ।।८०।। मा. .।।. चातुर्वर्ण म्हणिजे चौवर्णी. चेरत भीक्षा म्हणिजे आचरेत भीक्षा तें करणावाचक. येंवं चातुर्वर्णी भीक्षा करावी. या सास्त्रा म्हणिजे इतर सास्त्रे हीं चऊवर्णि भीक्षा असे. तयासी ना, या ईस्वर सास्त्रासिं अनुसरावे ।।छ।। जोगिया पाणीवथा न वर्ते. कां? तें दर्सन मान्य. आणि तों दर्सन नव्हे. ।।८१।। मा. .।।. यें घर साने, हें थोर हें संभवाचें यैसें दिसत असे. तरि जाओं येरा, न, वचों, यैसें निवडावे ना. निवडेलया अज्ञा भंगु. प्रतिकुळ मीख होये. ईश्वरू हेतु ठाके. आपुला होये पचना या दोख होये. मुंगीया येरि आस आश्रो येतुले दोख येति, हें अदृष्ट. ना दृष्ट तरि सदनचि तेणे गोडी संचरे. कां कदनचिये. तेणे त्रसैं कृपा निवडावे नाहीं. हें थोर, हें सानें, संभवासंभवु गावांतु रिगाला. आणि मागोंचि आदरावे येऱ्हवि न निवडी. हे गावात जाऊनि करील. ।।८२।। ओळखीचां ठाई सोपस्कर अन्न ये. जरि संभवाचें तरि, ना, निष्कंचने तरि नीरोध पडें. आपण उपवास करिति. परि तया असें तें घालीति. ना हें तरि सांकडी पडे लाज मानिति म्हणौन उदासीनता होआवे ।।८३।। तोरण म्हणिजे जेतुले सुभ कार्ये वेवो, मुंजी, आठांगुंळें, बारसें, उष्टावण, इत्यादि तेथे गेले त्याज्य करूनि विदेसें असावें तैसेया सर्वज्ञ म्हणितले.





यां पदार्थाये आणि लेइलेया नेसलया स्त्रीयांचें दर्शण होये. मंडळ म्हणिजे स्राध. तेथ गेलयां विकल्प जनीत अन ये म्हणौन तोरणांचां ठांइ विकारू. मंडळा ठाइ विकल्प. स्वनिष्टी नित्यकी निषेधु. निमित कीं विधि. कांजे? ते व्हेळी पदार्थेसि अन्वयो, आणि दोख तो विधि आंतु मोडतु असे. बहुते हे निमित्य सामाये. हे. मा. ।।८४।। मागोते त्याचि बीडी आलयां ओळखि, परचयो आमुकीयें मार्गीचा सांडिलयां पदार्थाचें मागतें दर्शण श्रवण होये ।।८५।। आधी नगरांतुका म्हणितलें नगरेविण पात्रांतु कैसे :१: दुसरें सानें गावं हाळया, पाडिया जें भीक्षा येईल तयाचि गमावै म्हणौन आधी नगरांतुका म्हणितलें. न गमे तरि पात्रांतु. तिसरे आवघा गावु मागावा दों दिसां अथवा दिसां मागो सरे. तवं असावें. सत्व साधि धावडी हुडि न करावे. दोख सवै त्याज्य. तै पात्रातु आप सैया पाठी जालें. म्हणौन आधीं नगरांतु म्हणितलें. चौथे निमित्य विधि नगरांतु असक्त, सुश्रृषा, भेटकाळ नित्य विधि तरि पात्रांतु. पाचवे हाडिया पाडिया गडैच गाव. दों दों च्यारि च्यारि घरै, यैसीये ठाइ बाहुले नगरांतें विण पात्रांतु होयेचिना म्हणौन आधी नगरांतु. साहावे नीच गावो गावीं नगरांतेचि भीक्षा होये. येकाधा दि


सीं अवचटें पहिलाचि घरि आहार पर्याप्त भीक्षा होये म्हणौन कां? पात्रातु म्हणिजे वेवस्ता नगराताचेची भीक्षेची म्हणौन आधीं नगरांतु म्हणितलें. नगर म्हणितलेंया सोक्ति संचार, तर्क संचारू. जैसा सब्दु तैसा अर्थ नव्हे. नगर सानयां गावातें म्हणितलें. हे येकी महात्म भाख. दुसरें गोसावी गौरऊनि बोलावीति भले तयातें हिरण्यपुरि बळहे ग्रामातें. सांनया, गांवातें. नगर म्हणितलें माहात्माये परि असीजे. कपटिचयातें म्हणितलें. ते काई नगर नगरें पुरे पाटणें वर्तेली असती ।।छ।। म्हणौन अवघा गावु मपितला. नगरांतु जालें. पात्रांतु म्हणिजे मात्रेचें नव्हेचि. तरि आपजवी जे सेवटीला. कां? संभवाचा घरीं सब्दु घालिजे. लागते मागावे. येथार्थ उमटवावा. येतुलेनि होईल. हेमा ।।८६।। तरि म्हणिजे यैसे जें आपजविलयां न मिळेचि तरि. खुंट म्हणिजे आस तोडावी. उगलयांची मौन्यें असावे. जैसा बहुरूपी फण गीळी. तेणे ढळो चळो नये. तथा वासनाचि न करावी. हें निर्वाळलयां चर्यावंतासि. येरा नवया अनधिकार्या न लभे. तेंणें मीळे तवं अपजवावें येकोंवेळ म्हणौन उदासां न व्हावें. उपद्रोनुठी, यैसे टोकिलें असे. तै होआवेचि. न गमे तरि गावु, त्येजावा ।।८७।। तयां असे म्हणिजे तयाचेनि संभवे या संभवु काजे तेथ पाठवीला असे. तै तयांचया प्रागत्ना (प्राक्तना) अनुरू–






प याही मिळे ।।८८।। येक दोनि दी न मिळे हे वेवस्था नव्हे. दु:काळा तीसरां दीन मीळोची नये म्हणिजे ईश्वरा सांकडि पडे. हात वसणें लागे. अगति न मिळें नयेचि ।।छ।। हां, जी, दुकाळी भीक्षा न मिळे तरि काई. तयासि तीसरादी आम्ही मेळऊनि म्हणिजे तयां करवी. सुवऊनि. परि अकृतृमि न मेळऊं तें जें हे देह माझे यैसे वासना ही कांढिलि. तेणेचि निमितयें. ना, तयातेंही नाही तरि आपणया पासि बोलावीति. अनं तिसरां दीसिं तैसे वस्त्र नव्हे निरुपण तें काळ कारीत ।।छ।। तिसरा दीं मिळे हें सर्वोत्तमाचें कानु पिळीति. हें व्याप्ति. येथ उत्तम, मध्यमु म्हणो नये कानु पिळुनि सुति – उपवासुचि न पडे. हें कनवेचें कार्य. सास्त्रा भितरील नव्हे. हें नेणौ. काई येक कैसा गुण तें नेणिजे. येकु सयेमेंचे येकु वस्त्रें. येकु इंद्रिया अर्थे. यैसा येकु येकु गुणे येकु सर्वोत्तम. तैसाचि स्वीकारू. तैसेचिं उपसा हाणैं. उपसाणेनवीन संबंधु आति यैसा जें जीवचि नाही. कृतयुगी आधिकरूनि का, पां? विकारू सेवि ।।८९।। मा. पारधि म्हणिजे मीळे, न मीळे, दोन्हीं आति. कांजे तेथ पाठवीला तया, चेनि प्रागत्ने (प्राक्तने) सी सांदा घातला तयां असेतु ग्रहा असे या तव आणि खंटु तो न मीळता अर्थी की तरि साहें कैसें? ना, अत्यंतिक उपवासचि पडे ना.


हे वचन यैसाया वाचक येकु दीं पदार्थ मिनला. दुसरा दीं मीळेचि यैसे नाही म्हणौन पारधि ।।९०।। राज्य तें स्वातंत्रेयें वांचौनि विखये उपभोगु नव्हे. तों भोजाही आदि करूनि ।।९१।। मा. ।। आनु आनु सांडावें म्हणिजे सांडील यांचि खंति. ते काई तुमचे दाई? म्हणिजे दाई नव्हेति कांजे तियें धर्मे सुति, न्याये बळे दाटगेंपणे घेईजे तें दायेंदाचें. येकु पदार्थे दोंघीचि सता तें दाई तें नाही. लागे, तेंचि मागावे. जें येका, सीता, अनोज्ञा दिधली. तरि गोड गोड तें खाईल येर सांडील ते हींसा, कपाळि पडैल. आणि, धर्मे जे तुकयासि देआवें, तेतुकयां नावे आपणचि. आपुणया लागे म्हणिजे संगिया असक्तु अभयांगत अधिक मागितलयां काई होये. कृपा. अनुकुळता जाये भिक्षा साधनाचिं थोरे जाये सुतया तीचें पुण्य धाडी ।।९२।। मा .।।. वेळो वेळचि टिळया पासि कां जासिजे म्हणजे लुलु न व्हावी. थोडे याचि माजि येसणी लुलु तरि येक दोनि उपवास पडते. तरि काई करितेति? नावेक पाहांतासि म्हणिजे नावेक धीर करिते. तरि ईश्वरूचि साहे करिते ।।९३।। नित्य उपवासी म्हणिजे सयेमु आणि काही





साधन नाही आणि इंद्रियार्थु नव्हे. नित्य उपवासु. म्हणिजे तें मनां इंद्रियां देहा वासने उपवासु ।।९४।। मिनलयाही न सेवे, तें मानसिक. वाचुनि सारिर अनधिकार पुर नव्हे. येथा माहदाईसेवत ।।मा.।। मिनले न सेवावें. म्हणिजे काळ वेतिरिके अटणीं, विजनी, देऊळी कव्हणी पदार्थ संपादि. इतरांचा निराकरावा, येथचया धेयावा. पर वेगळा न सेवावा. तो आपण या पुढें जेववी. तरि घेयावा. तें न सेविलयांचि आंत. कां प्रीति अनुस्टीली म्हणौन हें काई पा? परि भीक्षे उचितही आला. परि वेगळा न खावा. सवे म्हणिजे तेचि अदति पडे ।।९५।। येऱ्हे येऱ्ह म्हणिजे सदनं कदनं दोन्हे कुसकरूनि सेवावी. सामाये तेंचि कुसकरावें. यैसाही गोड होत असे. परि यैसा वृदाचारू (वृद्धाचार) जे कोरका वेगळा न खाति आणि पीडेचा तव अनुभऊ ।।. कुसकरूनि घ्यावे म्हणिजे गुणे दोखु परित्येंजु नये. फाळुकें झाडावे. म्हणिजे दोख झाडावा. कुसकरुणयां झाडणयां भेदु कैसा? ना, येक नैवद्यु येकु स्वीकरणीये दोखु गुण बहुत तरि विखये वेवस्ता करूनि गुण साधावा. दोखु बहुत तरि दोख सांडावा त्येजुये त्यजवें न येती स्वीकारावे ।।९६।।


इंद्रियार्थ रस विरहित. नसुधे अन (न्न) चि तो प्राणा आहार. साधन युक्त तो इंद्रियांचा. इंद्रिये हें बहु वचन जें रसनेचां ठाई आवघे असेति हें येक आणि जयाचा जो आहार ।।९७।। इंद्रियांचा अर्थ नीरोधु, वासना वसें सारीर तादात्म असे. तवं तें निवर्ते तै फीटे .।।. प्रस्तुत गोडी तो इंद्रियार्थ परिनामी तुस्टी पुष्टी तो रस. उतरकाळी आठवे मना अतृप्ति तो विखो. प्रधानत्वे व्यपदेसु. ते ये वचनेचा जो अर्थु तो जाणावा. लोणीचें मपितलें जऱ्ही हींसा थोरी तऱ्ही इंद्रियार्थाचा दोखु पचनी तेतुले हींसा नाही. की इंद्रियार्थ थौर जऱ्ही सर्पाचे देऊळ वरिलेपें ।।९८।। घेईजे यैसे म्हणिजे अवेऊनि मुसंब म्हणिजे येथा महीकीवत. चविने घेत सेईजे मग जाईल म्हणिजे तोकडाचि काळ प्रेत्ने मग उद्यमु करावा न लगे ।।९९।। भदें तेथ काही असक्ति अरुचि विसेखु. कां? जे वेळों वेळा म्हणिजे सेवावे म्हणौन धुळी म्हणिजे. आस तोडीजत असिजे. या परौते तुज मी साधन काही इंद्रियार्थ नसले याचि नावे परिछेदु ।।१००।। सकळही म्हणिजे रस प्रक्रण. मग व्याप्ति प्रेत्ने तो सर्व व्याप्ति पाऊल पाऊला तेथ नीरोध नाही. तें सायासे तयाचेनि होआवे. येर निरोध लेपन .।।. नेणो कोनु म्हणिजे सेवटील हीन वासना तऱ्हे हींसेचाचि दोष






प्रतिकुळहि ते कां? येथा राऊत आईनि पुरवी मग वैरी तेही पायेधुळि वंदिती यै या माझा बापु म्हणेति ।।१।। मा .।।. पुरुष म्हणिजे स्वतंत्र प्रेत्ने म्हणिजे क्रियेचा आळापी आद्य, मद्य, अवसान. विचारूनि केजे तो प्रेत्ने, दैव म्हणिजे मार्गा अभिमानीणि. मग ईश्वरू पदार्थ विखै देवता प्रसाद विखै मायेचें तथा उचीता पुरुषा भेटी ते तियेचेंचि सास्त्र अपुर्व वीधि तेंथ ईश्वर, कां? तें तियेचेनि नव्हेवे. साह्य म्हणिजे आयाच पासवत. येथा मोठे हातु लाविजे ।।छ।। ईश्वरी सकळ ही मीळत असे. कां. पां? आपण भजीनला आणि अभिमानीये ते कवण संबंधी तरि व्यापकचि. हे वेवस्ता ईश्वरू तरि दान देति. गोसावी तरि अनुसरलयाचें साह्य करीति. कव्हणा कहीं उपजोचि नये. आतां जगाचिया बुधी अनारिसया करीति. यैसे पुरअभिमानियें नियमिलें. तें तैसेंचि राहिलें असे. कै, पा नियमिलें? ना, जै गुरुत्व स्वीकरिले. तै नियमिले, तें तैसेचि असे. आतां आणिकें नीरुपेविन सांडूचि नये. जे वेवस्ताचि मोडिली ।।छ।। अखंड रज आठववित अकुसे तरि आपण राजसी यैसेया अनुरूप प्रयेत्न रजें वि

स्थानें उपजत असे. कां? मानुसें उपजत असे. देवती तेंचि राजस एक करतु असे. तरि विखये वेवस्ता करावी. जयाचे अपयेस भीक्षुकांचि लाजत याचे दोख. कपटीये उते, जाउचि नेदी चोंबडें, लटिके, यैसे विखयेवेवस्ता केलयां मन मोडे. जैदर्थाचें (जयरथाचें) शीर खालि घातलें. सापु देआवया तव तयाचेचि शीर खालि पडिले. येतुलाही विलो साहे. तैसे धर्म कार्य ते व्हळीसीचि करावें. येऱ्हवी अविधि तवं फावया न वचे. वेव्यारीचें तरि प्रागत्ने सीधी न वचे. म्हणौन उपस्थित जालयां ते व्हेळीसीचि कार्य कीजे, तें फावें येऱ्हवी राणाइसाचया कापूसाची परि होये ।।१०१।। राया परुता बळीया नाही आणि राणीये परता अभिमानु नाही आणि आकासा पुरते दुर्धर नाही. तें जरि अदुडीचां काई देखिलें. तरि येथ काई म्हणावे असे .।।. धर्म म्हणिजे अनुसरती जो चाड करी, तयाचे भलेतेसने आवघड ईश्वरू चुकवीति. ।।छ।। अडलयाचें साह्य करीति. स्फुरविति. संदेही पडो ने दिती. अनिष्टी न घालीति वासनिकासीही येक वचन प्रतिपाळी तयासि प्रसादु नमस्करे तयासि आसक्ता लागी काढा आणु जातां ब्रह्मन्य धरूं नये. जेणें कृत निश्चयो क्येला तयासि ।।१०३।। वारा म्हणिजे पंच भूत निमित्ये उपद्रवो तोचि त्रीविध






येक आरांचि वाजो नेदितो. दुसरे आजीनला तरि व्यग्रता नाहीं. तिसरे उतर काळिंचा उपद्रव नाहीं. तात्पर्य जें अनुसरलयासि कव्हणी उपसर्ग न पडति. ।।४।। अनधिकारें सीं बीं. वांचौनि विकार असें. जो सारीर मानसिकें त्रसत असे, तेणे बहुत अनीष्ट निफजों नें दावें. मग तोकडेनि अनिष्टे बहुत इष्ट जोडे तरि जोडावें. जें निमित्याचां कांही विकार असें. मनोधर्म पाळिलयां मज कीती इष्ट जोडत असे, हे पुरुषें पाहावें. काळी उरि की सरोबरी. यैसा विचार कांटाळा घालावा. (कंटाळा ये). ।।१०५।। मा .।।. त्रसु म्हणिजे मन कवडासें अनुस्यत आठवे तो त्रसु. नेदीजे, म्हणितलेंया. प्रेत्ने करविला. आठाही स्वभावा मात्रा देवविली. जेतुलेनि जया गमें तेतुलेनि टेनि गमावे. अनुक्रमे साधावें. वृति न करावी. जीव अल्प म्हणिजे सोच्य त्रसेला सांता म्हणिजे त्रसला तरि विखया सरण जाईल जेणें विन त्रसला तें आश्राये. जया इंद्रियाचा जो विकार या टेकें ।।छ।। पुढीलासि घृणा उपजे विकृति उपजे. यैसे क्रीया न कीजे. आणि आपणयासी घृणा उपजे, विकरीति उपजे यैसे क्रिया न कीजे. कां, पां? त्रस उपजैल आणि खंती येईल.


तरि सौजन्य तुटैल. अनिष्ट होईल. रांकया लक्ष्मीधर भटाचेनि न्याये प्रसादु नीराकरण ।।१०६।। मा .।।. त्रसला सांता म्हणिजे यैसा जरि जीव त्रसला होये. देसांचा सेवटु म्हणिजे वोळखी नाही तेथ जाये. काजे लोक निंदे भेण पहिलें अलींग वृत्ती होता. तेथचि येर न सोभे .।।. ब्राह्मण तो मातांगहि पसि अधमु पासुनि भीतरि मुक्त परि प्रेतत्वाचिये जातिचें जाणावे. येथा जोगिसो. तो जैसा दान पात्र, तैसे सून्यसी नव्हेति. मान्यता अप्रयोजक. कर्मे ब्राह्मण देवा धर्माचे ज्ञान. ज्ञान संबधें येकी पात्रता आली. वासना अधमु मी आवघया पासौनि उत्तमु म्हणत असे. म्हणौन हें कां करि. मान्यते विखयां लागी ।।१०७।। अल्पे अनिष्ट म्हणिजे साने अनिष्ट चुकविता, थोर घडतु असे. तरि साने आंगवीजे. हे व्याप्ति भले ते अर्थे लाभे ।।छ।। मागेला प्रकरणाचा यावाका जें पायां परतें निबर नाहीं, आणि कांटे या परते साने नाहीं. तैसे येर अवयव नव्हेति डोळा तो रजेंही दुखणे ।।छ।। कां भट या अधिन म्हणिजे मन तियें दुखीवेचैल काईसयाही पवाडे ना. धर्मा स्मरणा साना दुखीटे येसना वेच. मां, थोरा काई म्हणावे असे ।।१०९।। न गमे म्हणिजे प्रथम काळी कां अनधिकारे. तेणेचि न सरेचिना. तेंने गमणे तिणी






वेळ म्हणिजे अनि दोखु नाही. इंदियार्थे दोंखा ।।११०।। नीरसें म्हणिजे कांईचाचि रसु नाही. आंबील भात. दिवसें मुटकुळे चणा तरि, निरसें म्हणिजे रसु होता मागेला, वीटली खरी सिळे पदार्थ. हे मा. ।।१११।। रेंदा म्हणिजे आसट आंबिली. चेंदा म्हणिजे नासला जतु. खीरि बुरसैलें दिवसें, इंद्रिये ने घे परि प्रत्नें बळाधिकारे घेईजे. येथा दरू ना रिजे. मग खुंट बळी होये. तैसे प्रेत्ने सीणारिजे. हे माळीका. ।।११२।। पिसवी किती वाढे. आहार चौगुणा तथा ओहट. यथा का न वेव्हे. हें अभ्यासाचें कार्य वाढ ।।११३।। साधनें पोट भरणें धालेपण. तथा पाहे तव निद्रा, ये दोन्ही दुखणें साधनवंतासि अनुसरलया यौगीयासी, पस्यातु पाहातु तो उत्तमु काळ, धाये तव जेविलयां अविधि घडला काढियासि येसणें प्रसवले. आसंलगैया वटबीज न्याय जाला. इऊलाया अनिष्ठा माजि कठीयें. लेकरुवें सांडविली होती. म्हणौन स्वभावाचि मात्रा न भंगावी. मात्रा भंगीलया संपूर्ण स्वभावा आणेल. संपूर्ण स्वभावो विकारातें प्रसवैल. विकारू विकल्पाते प्रसवैल आणि आसळगै नामधारकाचि न करावे. सानेया अनीष्ट भियावै. नाथोबा पाहे न करितीचि. दैवते सवीया दिधयलीया साने अनीष्ठ चुकविले. थोर घडले. दृष्टी ज्वर


अदृस्टीं दोखु ते सिधुचि. आणि ईश्वरा गाऱ्हाणें दिधले. येसणें अनीष्ट प्रसवलें निद्रेस्तव म्हणौन स्वभावचि मात्रा होआवे. आधी आपणया सी समावेस नाहीं. परि पुढिलाचि खंत तिये येओ नेदावी. हें अति व्याप्ति जाणावे .।।. सारस्वतु म्हणिजे प्रज्ञा स्फुरे तें काळाचां सामर्थ्य नव्हे. रजस्तमासी स्वभावा सकळा मनोर्था पासुनि मन काढे. निरालंब होये. म्हणिजे असतीपरीची जीव दुसरे आव्हानिलीये. येथा प्रवृति ।।छ।। गोसावीयों देवता म्हणितलें चैतन्य देवता तीयेचेनि संबंधे गोसावी देवता म्हणितली. सचिदानंद स्वरूप म्हणितला, ब्रह्म माया ईश्वरू यैसा संबंध सांगितला आणि केवळीचि नित्य संबंधु सांगितला यैसा संबंधु चैतन्य देवताचा असे म्हणौन चैतन्य मुक्ष (मुख्य) करूनि सकळ देवतांचां संबंधु असे. चैतन्याचा विसेंखें संबंधु म्हणौन ईश्वरों देवता म्हणितलें. नेणतयाचेनि संबंधे नेणता यैसे नाव होये. गोसावी गोपाळां माजी होते तें द्वापारींचें गोसावी गोपाळाचेनि संबंधु होते. तरि तेची नाव जालें. राजसाचेनि संबंधें राजसु म्हणिजे तामसचेनि संबंधें तामसु म्हणितलें. गोसावीयों वऱ्हाडीयांचेनि संबंधें वऱ्हाडी यैसे म्हणितलें. काबाडायाचेनि संबंधें वेठी नेले. एकाइसाचेनि संबंधें देमाईसें धरणें बैसो आली. तैसे म्हणिजे यक जनक ज्ञानियां तयाचेनि संबंधें आवघेचि ज्ञानिये म्हणितले, जैसा संगु कीजे तेसें नावं पाविजे. म्हणौन विरक्ताचा संगु कीजे. देवताचेनि संबंधे गोसावीया देवता म्हणितलें तरि गोसावीया






चेनि संबंधें दवतों परमेश्वरू का न म्हणिजेचि? तरि ब्राह्मणचेनि संबंधें माया तरि ब्राह्मण म्हणिजताये. म्हणौन चैतन्य देवता तियेचेनि संबंधें ईश्वरों देवता म्हणितलें ।।१।। दुसरें अन्यव्यावृति आवघीया देवता होति. पर ईश्वरू नव्हेति. चैतन्या पर श्री चक्रधरू देवता होये आणि परमेश्वर होये. यैसा अर्थ. केवि? हीणे देवतेचे सामर्थ्य उठे. देवतेचा काई असें. उचे देवतेचे सामर्थ्ये णिचे देवतेचा ठाई नसे. म्हणौन देवता परमेश्वर नव्हेति. परमेश्वर देवता होये ।।२।। तिसरें जीवु भजकु देवता भजयाहें प्रमाण तरि परमेश्वर भज्य म्हणिजे कवणासि भज्य? मुख्यंत्वे भक्तासि अनुसरलयां ज्ञानिया, हें ज्यापणाचें देवता जया सारीखे असे म्हणौन देवता ।।३।। चौथे इतराही जीवा परमेश्वर भज्य जालें असेति म्हणिजे कैसे? गोसावीयाचें दर्शन, नमने, अस्पर्सण, संभाषण, संन्निधान, भजन, सेवा, दास्य निरुपणीचें मनण, स्मरण, रमण प्रसादु यैसा परमेश्वरू भज्य होऊनि सकळ फळीं देतु असेति. देवतांचें सारीखु वाटणे हे असे म्हणौन देवता ।।४।। पांचवै अैसे घेऊनि देति. कां, पां? देखौनि हें देवतेचें सारीखें म्हणौन देवता ।।५।। सहावे तीन्ही दाने माता पिता रांधले. जीवा पासौनि जीव पावेति. तेचि देवता पासोनि पावेति. परि नाभी वतें फळे आणि देवतांचे देणे अनित्य हे देवतेचे सारीखे असे. म्हणौन देवता ।।६।।


सातवेचि दिव्य हा धातु प्रकासी वर्ते. प्रकासक चेतन सामर्थ्यवंता म्हणौन देवता ।।७।। आठवे देवतेचें पर स्वीकरीले म्हणौन देवता ।।८।। देवतेचा वेखु स्वीकरिला म्हणौन देवता ।।९।। देवतेचे धर्म स्वीकरीले म्हणौन देवता ।।१०।। देवतेचया सारीखे कार्य करिति. साधनवंतांचा अभिमानु साधन निष्पत्ति करणें म्हणौन देवता ।।११।। जैसे देवतेचि क्रिया संपूर्ण होये तवं उरलेचि असे. संपूर्ण होये मग फळ भोगि तवं असे. तैसें साधनांतुल योग्यता. प्रमादिया जालेयां सृष्ट्यांतरीं उरलेंचि असे. जव फळाये हें देवतेचे सारीखे म्हणौन देवता ।।१२।। प्रमोदियासी परिमेश्वर फळ दाता होये. मागा जे आचरला होता, तया तव फळैचि पावे म्हणौन देवता ।।१३।। दुख भोगित देखती घृणा नुपजे. माळेकराचेनि दृष्टांते. अनंत गुणपर प्रमादिया लागिना आवघेचि नाही. केले जैसे देवतेचा ठांई येकु ही गुण नाही. यैसे देवतेचया सारीख निष्ठुरपण धैरिले. म्हणौन देवता ।।१४।। आणि दातृत्व आति चहुंदानी देता न सरें. दया हा गुण आति. म्हणौन देवता ।।१५।। हृदये म्हणिजे जीवी असे सुखदुख अनुभवु ज्ञान. तेणे द्वारे पुरुषाचया अनुभऊ असे. ये म्हणिजे न आठवनें चिंतना, ध्याना, स्मरणा, तेथ चिंतत लीन होये वेचें यातें येणे बोलीजे. ।।१६।। बोडी गंगा समानु म्हणिजे पवित्र–अपवित्र ये दोन्हे न व्हावे आणि






तृषा लागलायां बोदिचे वोखटे, गंगेचें चोखट हें न म्हणावे. तृषा समयौ जे मिळे, तेंचि घेयावे. विवक्षा न करावी. बरवेनि विकार, वोटे (वोखटे) नि (वि) कल्प दोन्ही होति. हे मा. ।।११५।। मसणीचें वस्त्र घेपे म्हणिजे समसानिचें उत्तम ग्राहे होये. वाट पाहिल म्हणिजे जीव दोखा रूप कीजेत अभिळाखें पडिलाचें मरण चींतिले. हें जने ना विपायें. कांजे जीव दृष्टार्थेया स्वार्थपर म्हणौन निराकरीलें. यैसा सीयें पीडला असे. आणि टेळेनि सांपडलें आणि तो हेत न जणे तरि घेयावें. परि बाहुले समसाने न सोधांवे. तेणे वाटा पाहिले म्हणौन मागिजे. कां? बीधि पडिलें घेईजे. तें उत्तम ।।११६।। तरि म्हणिजे जया कौपिन वोढ न साहे. आनधिकारें हातु दोनि सुडा नेसावा. हें भटांवरि प्रकरणा तव भाविजे. जे नसुधा वोढ कौपिन न साहे, म्हणिजे मग अनुज्ञा दिधली. हेमा. ।।११७।। प्रावर्णाचि सीमा श्वान कुंडली आधांतुरें पुरें. वेगळेनि आंथुरणें आणिकु येक मनोधर्मु आपजैल. सुख होईल. वेगा, चेवों न ये नीद्रा येईल हात पाये पसरेल. हींसा होईल. तेणेचि आंथुरणे नीद्रा नये. मुरुकटा खाईजे, चेवो ये. उघडा भाके. सुरुवाड नाही तयाचि आंतु मुरुकुटी आंग झाके येव्हडी कंथा ।।११८।। कडिसरा गावा समीप, ना दुरि, शब्द नाइकीजे ये -

तुलेया खांड देऊळी म्हणिजे देहीचेनि अनधिकारें कां रितुकाळीं पाऊसाळां, श्वान कुंडली म्हणिजे श्वानवतु. हातुपायांचि मुरुकुंडी. तेचि त्रीविध. येकु पाये पोटेसी लाविजति. परि कुरुंडी सामाये येतला पैस असे. येक नवांचेया अंका सारीखें येकु कानवडया धनुसाकार. तेणें हींसा चुके. हे मा. ।।छ।। खांड देऊळी हा वीधि, झाड अधिक योग्यता आणि वृधाचार. तेथ कोन्ही राहेना, मग यैसा ही तो सकृत मग भेद. येक प्रकृत्या रसाळ तो अधिक वृति करि ।।छ।। खांड देऊळी म्हणिजे देवता नाही. ते खांड देऊळी. देऊळी केली, परि देवता प्रतिष्ठीली नाहीं. अथवा देवता होती मग खोमळी अथवा देवता तरि असे परि पुजा नाही. उपहत असे. उजम, मध्यम, कनियेस. जया झाडातळी देवता मांडिली असे. तेथ न बैसावें. जीये कपाटीं देवता असे तेथ ना, निर्देवति स्थान निर्देवति झाड. निर्देवती देऊळी यैसे विहिलें. असावधा पुरुषा देवतेकडे पाये करी कठियाचिया परि अनीष्ट चुकले. वस्त्र झाडिति देवतेकडे रज जाये ते अनिष्ट चुकले. जैसे नाथ वाणी प्रंससिली निर्देवती आणि निर्विकार कव्हणें देवतेचि स्तुती केली नाहीं. कव्हणे देवतेचे गुणु वाखाणिले नाहीं. कव्हणे देवतेचा अभंग नाहीं. कव्हणे पुरुषाचा पुरुषार्थ वाखाणिला नाहीं. अथवा बरवेंपण वाखाणिलें नाही. अथवा गुणु.






वाखाणले नाहीं, अथवा कव्हणी स्त्रीयेच अवस्था विरहो वाखाणला नाही; अथवा स्त्रीयेचे अवयव, गुण अलंकार. स्त्रीयेचे सबुंद वाखाणिले नाहीं .।।. विकार रूपे मनुसें विकल्प रूपें मनुसें तेजविलीं. आणि तैसेचिं झाडें, स्थानें त्यजविलीं. तैसेचि श्लोकु, गींतु, मांतु आवघें दोहीं दोखी सितलें, तेतुलेंही त्येजविले ।।११९।। तरि म्हणिजे जयासि अरणींची नीद्रा न करवे. तेणे ओडबुरुड न्याओ करावा. गांवांतुलां लिगटलें नीजावें. न्याओ म्हणिजे तयाचेया यैसे करावें. गांवांतु भले तेथ राफाड पाहुंनि नीजावें. तेथ रच मच कीं तें च्यारेचि घडिया. तवं आपण नीद्रा किजे. तेणे काहीचि नाइकीजे कां? तो मृतवतु कीं. हे. मा. ।।छ।। निजैलया मेलया सरि हें कार्य वाचक. तो तयाचा अर्थ मेला. तियें त्याचा अर्थे मेलीं. मेलें हावभाव उपजवी तरि तियें उपजविति. फाळुकें झाडणें अभिप्राओ. दुसरें ना आणि रचमचे आंतु होता. तें काहीं मनीं न लगेचि. झाडी केली ।।छ।। नीद्रा येईल तेव्हढिसीचि नीद्रा स्थाना यावें. तयाचे गुण दोख न पाहावें. भावीं रमो लागैल. पाहाटेचि म्हणिजे तया नुठिता. निजैली न देखावी. तैसाचि भले ते भीक्षु, मनुस्य, फाळुकें झाडुनि नीगावें. तेथचे गुण दोख झाडुनि निगौ. ते झाड म्हणिजे कवणी परि

झाडावें. दोखे, गुणु कुसकरावा. गुणे दोष कुसकरावे. जेणें गुणे धर्म हाणि तेथचें दोख काढावें. सर्व गुणे संपूर्ण ईश्वरू, येरा कव्हणीचि नव्हे. झाड प्राप्त पुरुषासि तें प्रतिबंधलें, तरि (सकळ लिपी) (देऊळी) देवता भोग स्थान. कां? तामस. तरि वाणासि कां पडवी साळ ओसरी ते नाश्रावी ।।१२०।। भील म्हणौन ज्ञानियासि, मनुसे देखति यैसी इछा. तरि सापराधें देखे नावेक. आर्त वाचुनियां जेचि येरे ठाइ; तेंचि ये ठाइ येणें न्याये अनुसरला न देखे तो भील. म्हणौन विग्रहवंत नु देखवी. ब्रह्मांडस्थ जे येचें गोरू. साप, उंदीर, सेळी, घोडे, गाढव चुकले तेंथ येऊ नये. आपुलाली परती घेऊनि जाति, मुर्तिसि स्वरूपी रीगावया ठावो नाही. येवढा धाक .।।. येथा राजकुमरेसी अन्यावो केलेयां घरीचें रिगो न देति ।।१२१।। यैसे म्हणिजे रंकें दीनें सोचें उघडी म्हणिजे वैराग्य नाही नागिवी म्हणिजे भक्ति नाहीं. दुसरें उघडे म्हणिजे मळीन वस्त्रें. नागिवी म्हणिजे सिविली वस्त्रें, हे. मा .।।. उघडें नागिवे म्हणिजे जैसे नेसण, जैसे प्रावर्ण, तें नाहीं धाडस प्रमाण. सपूर चौखलयाचा विपर्याओ. चेंदा जोगी खाये. परगावीचा म्हणौन वास न पाहावें. आतां तोराणी कोन्हाइ भेटलाचि नाही. भले तेणे भले तें म्हणावें. यैसा असळगु, गोवळीं अक्षेपावा. अनओळखीपणें, चा –






टया वणिजार यांते अक्षेपु नये. उघडे म्हणिजे भलतया आसलगें. नागिवी म्हणिजे जवळि कांही नाहीं. मात्रा परिग्रहो, हातियरे देह. वास पाहाणे म्हणिजे जीवाचे उपद्रव. काई पां, होति? परजिया देवता, चेस्तवावे तियेही वास पाहों नये. वास पाहाणे म्हणिजे मनीहीं उलेख करी ना. वोखट्याचा. वासु म्हणिजे वोखटाचा मनोधर्म, निनिर्मिति तरि ईश्वरी येक वोखटें करीत असेति की? तें तयाचें माप भरावया, पाप घडावया. यांहीं येक अभिमानियें म्हणिजे ईश्वरीं तरि अभिमानू नाही. म्हणौन तया खालुते तेचि होये. यांही येक अभिमानियें माया भेटवी. सनिधानी तें स्थाना पती कें रिगिजैल म्हणिजे देवता म्हणेति, आम्हा रीगावया ठावो नाही. काई करिती म्हणिजे सृष्टीपर्यंत निस्तुरा नाही. निरयेचि ।।छ।। देवताचां ठाइ घडलयां देवता करी. ज्ञानियाचां ठांई घडलयां माया करी. कां पां? संहसंबंधी नीक्षेपिली असे. मा, ज्ञानियांसि काई म्हणावे असे. वस्तु म्हणिजे सारभुत म्हणौ यैस्वर्ये राहिली. तरि भेण. आनंदनामे राहिली. तरि गोडीया, अभिमानिये चैतन्य क्षेभले तरि संवरीता उपाओचि नाहीं. येकां चोरी, येकां अन्य वार्ता, येकां तम. येकां रज, येकां लावकै, येका कथन. येकां धर्मुचि अंतरे. येकां संगुचि नाहीं. येकां कखाओ. यैसा अनेक विध क्षोभ

अभिमानिया ।।छ।। वासनिकातें भीक्षुकाते हांसो नये. विपलाओ नये. अभिमानिये क्षोभे. येळापुरि विद्यावंताचेनि न्यायें मागां हांसो नये. विपलाओं नये. तरि पुढे तयासि आपुली खंती ये. आपणयासी तयाचि खंती ये. मग तमें घेऊनि देऊनि बोलणें. येणें काहें होईल. तेणे नोणिजे ।।छ।। आंबे कारा निर्वसें, हें सामर्थ्य फळ. अभिमानियाचेनि क्षोभें तयांचे दुख, तेणे दुखावें. पाठि नरक सिध ।।१२१।। मा. ।। कां, गां, यैसे म्हणाल म्हणिजे मागील अनुचित उधारलें नि तया दंडु कीजेते. येसनें ज्ञान अनुसरण संनिधान आणि पदार्थे अंभुलत्व तें न व्हावे. यैसे न म्हणिजता पुढील सुचीक. जै आधी प्रतिष्टाति येथौनि न म्हणावें ।।१२३।। आहाचपण म्हणिजे कैसे दुख जालें. ताका गेलेया कैसे कष्टचि खलें. कैसें सिणलों व्यापारे. कैसेसी वाजिनले. कैसे सुणेपाती लागले. यैसे म्हणता अदृस्टासि खंती ये. जैसे कव्हणा येका लागि व्यापार कीजे. मग तया लाविजे. कैसे तो व्यापार करितां दुख जाले. तै तो म्हणे येणे व्यापारू का केला. ने दावा करू, यैसे बुद्धि बाधि उपजे. आणि दुखें वाचुनि ईश्वरू पाविजेना. मां ते दुख आणिका सांघिजे ।।१२४।। तुमचया कडुनि हेतु रहित –




एच-५८३
५






ता आणि रुचि वासना असें नां, कांहीं न व्हावे म्हणिजे ज्ञानेयाचियें ठाऊनि थोर वेऱ्हें येथौनि. म्हणिजे ईश्वराद्या भाव. प्रमाण वीहित. प्रीति सोजनें सकळी म्हणिजे साधना चियै ठाऊनि रसुही मुळ षड्रसा येणे. हे मा ।।१२५।। कव्हणाते कांहीं असे म्हणिजे जीव काईपां? परि देवताही नाही की? यकीसि येकि अधिन मा आवघिया ईश्वरा अधिना. हें सकळही म्हणिजे दृष्टत्वे विखये पदार्थ मग जेतुले रचने आले. हे आवघें देवाचें. कां? याचे करतृत्व आणि आवघयांचा गोसावी. येथा लोकांचि संपत्ती खाणे, जेवणें ते रायाचि सता. तैसा रावो ।।छ।। देऔ देते आपलें म्हणिजे ईश्वरू सकळ पदार्थाचि सता (क) रीति तैं आपले होये .।।. देवे दिधले तें अन, वस्त्र आपुले. येर देतया चोरी, घेतया चोरी, देवता हाटि घेतया दोखु. देतया नाही. करणीये म्हणौन दैवे दिधले तरि घे, तयाही गुण ।।१२६।। यैसे कैसे होईल म्हणिजे मागां अनंता सृष्टी गेलीया ते खिती कीजते. आणि पुढारें आसंसासे यथिचें तें आपुले म्हणिजे ईश्वर विखया पदार्थाचि ममता स्थाण, प्रसादु, वासनिक, भीक्षु सास्त्र धर्म ।।२७।। भ्रमतां म्हणिजे हिंडतां अदृष्ट असे. दोघांही हेत नाही. यैसा टेळेनि होये ते उत्तम. का म्हणिजे अवस्तेचि नव्हे. पुरुषा–

द्य अपादूनि घेत असे म्हणौन कांहीं मध्यम हे मा. ।। भेटि आपणावे याचे कारणाचि चारू, संगु तेथचे भेंद, नी भुलता वैराग्य यावया अथवा येकला असोचि न ठाके. कां? चर्याहीं दृष्ट पर भावो आर्ति आहे. योग्यताहीं अदृष्ट पर .।।. गुरू सहृर्दाचि भेटी अनुसरलेया ज्ञानेयाचि भेटी. वासनिका ज्ञानें बधियांचि भेटीं मार्गेचि या परि आर्तियाची भेटी उत्तमु. मध्यम. कनियस चौथा पक्ष अडचणीचा. वरि पुढिलया कां? अवसरिं अर्थे कीं? ।।छ।। स्थानाजातां, प्रसादु नमस्करितां आधि तेथचि लीळास, विसेख आठवावि. म्हणिजे संबंधातु पाठितें स्मराणांतु पुढले, तैसे भीक्षु वासनिका भेटी जातां बोधाचिये ठाऊनि अव्यक्तिचि लीळा. तयासचा त्यागु पोटी भरावा. आठवितचि जावें. मग पुसावें ते गोष्टी तैसेचि होऊनि रमावे. येणे व्हे जें सांघितलें. ते मग घडेचि. यैसे दुख करावे भावाळु वेसे भावाळुवा, चर्चेकेसी चर्चेका. ज्ञानियोंसि ज्ञानिया जो जैसा तैसया होईजे कां. पा.? सांजात्या वेधुके मग गोष्टी मातुकी येऱ्हवीं न घडे. हस्तेचा संकदीं तो दोखु स्पर्शे ना. येराते मोळाने तैसे ब्रह्मविद्या माऊली. अनुसरलया प्रमादीयासि सरिसी. साह्या, लागि उधव देवा उपहृद करू नये. साध्य करण करितु असे. साह्या लागि भुका तळमळी अडला जाणें मग धावेकी ।।छ।। सेख






सायों गोसाविया मांचां बैसविलें. पूजा केली. स्तुती केली. तैसें आपुलया ठाया भीक्षु ये तयासि अव्हान विसर्जिलें पुजा पुरस्कार कीजेति. स्तुती गुणु अन्मोदन कीजे ।।छ।। माहादेवो पात्र. येथचें दर्शन होत खेवीं आपुले सकळहि राज्ये येथ संपादिलें. आपण येथचा सेवक हौऊनि वर्तीले. यैसे सांघितलें. तरि लोणारिं दर्सन जाले. तरि सेवक होयेंचि ना. का? जैसा कर्म लेप आगातुकु आणारब्ध प्रारब्ध. तैसेचि योग्यता. तैसाचि अधिकारू. तैसेचि अयोग्यता तैसाचि अनधिकारू. मेघंकरीं सा मास राज्य केले. मग बाईसा दर्शन दिधलें तैत्रि दोख फिटा वया योगच जाले. माहादाईसा, श्री नेगरें राहावीजतें तरि दोख घेऊनि जाति. दायबातें म्हणितले पोरबहुता दिसां लाधला. येक दर्सण होईल तरि भोजा अनुसरैल. म्हांईभटाचे खते फेडिलया विन बोधु नव्हेचि. तैसेचि खते फेडिलया विण अनुसरणा न ये. येथा दाईंबासि येकें दर्शणे अनुसरणासि येतें. तैसेचि अनुसरलेयाचिया भेटी वासनिकासि अनुसरणासिं ये तैसेचि मैळलयाचिं भेटी धर्मा पासौनि जाये म्हणौन मैळलेनि पुरुषें भीक्षु वासनिका भेटावे. ते व्हेळी अनुसरलयाचिया परि भेटावे तैसेचि अनिष्ट चुके आणि इस्ट होये ।।१२८।। येक गो (मे) का म्हणिजे दोघांहीं सारीखे नि परि न्यु


नाधिकारि ज्ञानातव अधिक पाड. हें म्हणिजे. आपणेनसीं, सरि, घातली म्हणौन उभयांसि सारिखा भावो. जैसा कां देवोचि साजाद्याचि भेटला. पाड दोघांही म्हणौन येकमेक येका नावेक बहुत. येका तोकडा. येका आंतुला, बहिरला उंबरयावरिलाचा. येकमेका, कां जैसा मग उतरत तिर्यंच अ(व)तार पर पाड न चुके. हे. मा. ।।छ।। पाडु म्हणिजे अज्ञान नीवृत्ती सुख योग्यता .।।. भेटि मात्र आपणे नसी तुकीलें चर्चा पालटणे. खाण, पान, श्रम नीवृत्ति, प्रीति, ये याचें गोमटे वेगळेंचि .।।. पाड जाये सरिसें ज्ञान, वैराग्य, प्रकृति, साजात्य, निर्वेधु शिलता. सरि सां गुणी. आर्त मग भीक्षु, वासनिक, परवां भलीयेचे नीदैले पण देखैल तेथ थेर उणा होईल तियेचिं माहेरिचीं पोसित असे. तेणे उणा ।।छ।। भट जरठ शाब्द चरितार्थे अपरोक्षा योग्य सनिधानी असनिधानीचे लक्षीमिधरबा येकमेका भेटलेया पाडु. तरि म्हाईं भटां, माहादाईसा भटा कैसा पाडु जाये. विदुरोध्दव देवा कैसा पाडु होईल ते नेणिजे. सात अहोरात्रे उभया यें गेलीउद्धव देव प्रेमिये अपरोक्ष संचरिलें. आणि विदूर देव कोमळ. अज्ञान तरि आतां जो ज्ञातु, विरक्त, भावाळु, तेणें नाम धारकेंसि कैसे पां, वर्तावे? .।।. बहुते मीळति येकत्र हें थोरा लाभाचें कारण. येके भजकें, येके सेवके, ये-






कें करण स्वरूपे. येके ज्ञानें, येके विरक्ते. येतुलीं येक वेळें दिसति. तेतुला ईश्वरू भेटला. येक वेळें नाठविता. आठऊ न करितां स्मरण. तेसणी योग्यता येक वेळे होताये तेसणि अनीष्टें. येके वेळे नासति ।।१२९।। मा ।।. श्रमु. द्विध. सारीर मानसिक जेणे श्रमला तें फेडिजे. सारिर मानसिके दोन्ही फेडि तो उत्तमु, मानसिक मध्यमु, सारिर कणियेस. थोर ओझे बहुत चालणें, तो सारिर. पैसुन्य निलळ टळ टळ डंडळ येणे राहावा गेला असे. मन विक्षेपलें असे. तरि तें संगे साहावासै निरुपणें फेडिजे. जयाचेनि जेतुला श्रम हरे तो हरिजे. तेणे ईश्वरास तोख खंती परिहरे योग्यता कर्मनासु हेही सुश्रूषाचि. येकी तरि दोहोसि भेद कैसा? ना, असक्ति चर्याचि ठाके. गति नाही. आनि श्रमें करवे ना अदक्षता ।।१३०।। येकत्र खाण, तिनी प्रकार दौहींचें अन (न्न) कालऊनि येकेचि ठांई बैसिजे. दुसरे बाधी तरि कालऊनि वेगळें अथवा आपुलाले अन परपांति बैसीजे ।।छ।। पान म्हणिजे उदक ताक पयादीक. येकु भाजण. येक उदक पात्र तें एकत्र ।।१३१।। फाळुके म्हणिजे वस्त्राचि पालटु तो धडें वस्त्रें फाटकें निसी करावा. जयाचे धड तयाचां आदि भावो. अंग अथवा प्रधान. ना दोन्हे समचि तरि वडीले आदि होआवे. मग झोळी याही पालटु. हे. मा. ।।१३२।। तथा. मा ।।. येथचिया म्हणिजे आमुचिया कथा म्हणिजे कथी

लीया. वार्ता म्हणिजे वर्तनलीया. द्वापरीचीया. अथवा आपुलेया मागिले येकांकिची लीळा सांगितलीया. तिया कथा, भक्त जना वीदीमान जें वर्तनलें. तिया वार्ता :१: दुसरे सब्दें वर्तण करवणें. निराकरणें, बोलावणे, पाठवणे, ते कथा. आंगे करण ते वार्ता :२: तिसरें इतरेसीं वर्तण ते कथा. अनुसरलेन ज्ञानियासीं ते वार्ता :३: चौथे विचार ते कथा. का? जें ज्ञान परिसावें येतुलेचि आचार ते वार्ता. कां? ते प्रस्तुत पुरुषाचें वर्तन अंतज वाडां घातला तो याचि लागि :४: पाचवे सनिधानिचे धर्म ते कथा. कां? तयाचा विणयोग नाही. आठवावे येतुलेचि. असनिधान धर्म ते वार्ता. कां? ते, पुरुषाचया वर्तना रक्षण किजते. म्हणौन सिध याचा संवादु ।।छ।। वेधवंतातें बोधुवंत कैसेनि वोळखे? जाणे तयाचा संवाद जाणे. ईश्वरू उमटवीति. तैं सास्त्र विखयै बोलणें न कीजे. येर विधान कीजे. बोधा काळिचे या गोष्टी पुसिजेति. तै थोर ठाये सांडिले असेति. कर्म जडले पण थोर हींसा. भुकेले यैसे बहुत सांडिले असे. ।।१३३।। सात पाच एवं बारा दिस एकत्र असणे म्हणिजे आंगे जीवें मग कोन्हे कोन्हचा नव्हे. येसा गेला रागु अथवा द्वेखु दोन्ही पोटीं भरो नेदावि. बहुत दीस असतां सवे निलळता पातळता पांतेले पण ये च्यान्ही होति ।।छ।। भेट काळी नीर्वेदु अनुता–






पु अनुसोच आर्तिचे हे उपजे तव असिजे. अथवा अज्ञान नीवृत्ति, अन्यथा ज्ञाननीवृत्ति, संदेहनीवृत्ति, अपूर्व निष्पत्ति होये तवं असिजे. अथवा तेयाचा गुणी आवडि उपजे, तवं असो ये. अथवा पुढिलाचा दोखु देखीला, कां आईकेंला पर हृदयासी नैये. तयाचया दोखाचा गुणचि उपजो. तवं असिजे. आपुलीये क्रियैचा गुण ये. पुढिलाची क्रिया आपुले यांचि सारिखी परतयांचा दोखु ये. हे माहा पापु हेंचि लक्षण पुढिला ठांई पाहावे. यैसे लक्षण येकाकीं दोघै तातले असति. तैचिये. विभागे असतां निलळता ।। तयासि भेटलेया काइ इष्ट होईल? ।।१३४।। कालीचि भेटला होता, पर हा येकु मज भेटैल यैसे आसचि नाही. आणि पाहोंचि भेटे. तरि पडिला देखिला ना प्रीति करूनि कहींचि भेटला नाहीं. कां जैसा. पुर्वोत्तर तेथ येक सरा भुडूकाचि नीगतुं असें. जैसा अंतर्यागु. ते झाक गेलयां. मग प्रेत्ने .।।. क्षेणु दुर्लभ, तो अवसरू जाये. मग अनीष्ट निफजो लागे. निलळता उपजे म्हणौन सावधैया वर्तावें .।।. पहिला क्षण दुर्लभु जेथ न देखिजे. तयाचि भेटी ते व्हेळी घेचि परे असिलयां अनीष्ट निफजैल .।।. पहिला क्षेणु सेवटील क्षण दुर्लभ तैसीचि दुर्लभता जवं भेटे. तवं जावो नेदावी आणि आपण पुढीलाची


दुर्लभता भंगे यैसी क्रिया न करावी. जयासि दुर्लभता नाहीं तयासि उपजवावे. दोघांहीं दुर्लभता नाहीं. तरि विभागु, ये-हेवि निलळता उपजैल. नरक घडति. तैसेचि भंगी, तैसेचि सुश्रृषे, तैसेचि जवळिके. तैसेचि बोलता. तैसेचि धरे. तैसेचि गुणा देणा; दुलर्भता नाहीं. तरि विभागु करावा ये-हवी नित्य नरकाचें बीं निफजैल. दुलर्भता नाहीं. तरि कव्हणेचि क्रिया न स्वीकारावी. ।।छ।। भेटी संवे सुख, निगता दुःख हे क्रिया स्वरूपचि. आणावे न लगे. भेटी उपरि संभ्रम्हतख (संभ्रम) तो विपाये राहे. मग प्रत्न लागे थोरचि पहिले नि पुन्य नासें, दुसरेनि पाप नासे, म्हणौन पुर्वोक्तर क्षण दुर्लभ ।।१३५।। अच्युत हें उचित नावं. तें पाऊनि मातेचां येकु देसुं. तरि तुम्ही हीं तयाचेचि कीं? परस्परे म्हणिजे येकमेकां, येर येति. प्रीति म्हणिते अवसरेचित गोमटें कीजे. परम म्हणिजे विनासकाळे. परहित नीरत केवि? प्रक्रणात्वाचि।। मार्गावरि श्रेष्ठ बुधि भावो. तोही गोत्रेयुचि तेणेंसिं विधान अन्नोदक फाळुकें देणे अपदे पासुनि, सोडवणें येवं मादिक. जरि आपुलेनि अनायेसें होववे विना येकदायेही करणे मग भिक्षु, वस्त्र, देणे. हे दुरि ठेलें.






प्रीति वीण सकळ भिक्षुचा दोखु न लोपे. अयोग्यता पुसीति. कां. पां? तैसि प्रीति ।।१३६।। म्हातारी हें उचित नाव म्हणिजे मागा सकरडी म्हणितली वये तारुन्य असो कां पर इंद्रिये, मनोधर्मु न बधिति. म्हणौन म्हातारी. लागे म्हणिजे कव्हणी वसन लागोनि ठाके. जैसे, तैसेंचि अवंचकपण सेवटु पर्यन्त केलें. हा निरोपु भटां दीधला. पर माहादाईसे तयाचें स्वरूप जाणते असेति म्हणौन, पुढिले वाक्य .।।. भटोंसब्दिचरितार्थ जाले. पाठी झीणि. ते म्हाइंभट माहादासिं, काई होति. चहु परते कांही असे म्हणिजे. पर कांही नेणतीचि मग निरोविलें कीं. म्हाइंभट निरोविले. येके शक्तिचि थोरी सांगतां मेरू आणि पृथ्वी न पुरे. पर सेवटील, सेवटील हेचि. केवि? मां, अनंते ब्रह्मांडें तयांतुल येक हें. तरि सेवटील नव्हे. तरि काई हा ठावो वेऱ्ही ज्ञानाचि थोरी आंतां काई जाणीतलें ।।छ।। येयाते पुसिजे म्हणिजे, येतुले दीस आमुतें आनु म्हणिजे गुढा तरि तोचि. परि तेलें सेंदुरे जें आलें तें, नवसियें पुरवी. तैसा तुमचे मनोरथु पुरवील ।।१३७।। मा .।।. परम प्रीति म्हणिजें जया पुरती नाहीं. दृष्टें काई पां? तेतवं तया चाडाचि नाही. प्रसादें सास्त्रे अदृष्टें किजे. ते परम हे करावें.


पर हेंचि मातें पर यैसे विसिष्ठ बुधि येंवो नेदीजे. तेणें विकल्प संचरे. हे निरुपिलयां त्यां जो भावो आला. तो आंति निराकरीला. विसिष्ठ म्हणिजे मोचक. ते ईश्वर दास्यचि पर भावंडें कां जैसी. ईश्वरा आंतु आणि कै येश्वर्ये आनुंसंगिके. तैसें परम प्रीति आंतु आणिकें अनुखंगिके, अधिनत्वा आंतु सकळ अनुसरण असे हा ईश्वरूया आंतु सकळांचि व्यावृत्ति असे. विसिष्ट बुधी आंतु सकळ, यैस्वर्थ असे. दोसै जाति बुधि हा प्रयेत्न ।।१३८।। प्रीति विखो म्हणिजे आवडी श्रेयसुख. तया येरू पात्र नव्हे तरि तयाचें भंगलें .।।. वाम वेधें पदार्थ संपादिला. ननुसरतां तो न स्वीकारावा. कां पां? तो गोसावीयाचा कुमर तरि जौ जयाचां जांघेजाला तरि तयाच्या सारीखें अंतर बाह्य कांहीचि नाहीं. तरि तयाचां जांघे कैसा जाला म्हणौन गोसावी कांतिये विद्या न स्वीकरीतिची पहिलें पाठि अनुकरौनि विनविले ते व्हेळी स्वीकरिली. तैसे आम वेधे पदार्थ संपादिला तो न द्यावा. जैसे राम दरणेनि विनविला म्हणिजे अळजपुर नगर नीकें जी. तेथ बीजे करावें. सर्वज्ञ म्हणितले. येथ पर्व दृष्ट असे. तैसेचि वायेना ये कांते म्हणिजे रावसगावा येता ।।छ।। चाडे दुखवि ईश्वरूही पदार्थ न स्वी–






करिति. उदास वस्तु श्रीप्रभु टोंकणे या गृहीं मादणें आमुचे गोसावी आबयोचि या पुरिया. राणा इसा क्षेम, मालगंठी भटाचें, परमेश्वर पुरिचे दुख. आबांचे, भटाचे, आऊसाचे दुख म्हणौन नीत्यवीधी निमित्य वीधि दुख होआवें. उपजे ना तरि प्रेत्ने करावें आणि पुढिला करवि प्रेत्ने करवावें. दुख नाही तया भिक्षुचा पदार्थ न स्वीकरावा. तयाचा संसर्ग न करावा. दुख नाही निर्वेदु अनुतापु नाही. तयाचे जवळीक न करवि. संगु न करावा. तयाची भेटी नेघावी. दुख नाही तो जितुचि प्रमादिया जाणावा .।।. पुढिले संपादील मज नावडे, न साहे, तैसे म्हणावें. वांचुनि तुम्हा लां गत असे म्हणे. वर्म स्पर्श तरि नव्हे पर दैन्य माने. जैसे गोपाळेबा आंबिल पाने ।।१३९।। परस्परे म्हणिजे दोसै, येकमेकां, दोन्हे हात सबळ नव्हेति. परि हालवावें. मग लोणी निगे. तैसें तेंचि नुतन होये. अथवा अपुर्व निगे .।।. पक्षांगि कारे साधकी बाधकी अक्षेप परिहार कीजे ते मथन. मथने सास्त्र चेतऊं सके. अक्षेपे स्फुरेति अर्थ


नीधारे लीळा तैसी नव्हे. चर्चा. अर्थ. यथार्थ ये विखयांचें पातळपणे होये. पुढारा करि ना. तयाचें बळ होये. ज्ञानाचे सामर्थ्य कोन्हे ठाई सांगितलें नाही. तें चर्चा सामर्थ्य दाखविले. तेलीयाचां ठांई आणि जयासि चर्चा तया प्रति दोख लपविजेति. दोख प्रकटिलया ते न बोलेति. हें भये तरि धर्म साधे .।।. चर्चेविण मैळे. ब्रह्मविद्या माऊली गो हें माखलया तें धुये. सुखा दें .।।. परस्परें मथना दोन्हीं बोधवंत. दोन्ही अनुसरले. दोन्हे समान श्रृत. दोन्ही श्रृतसास्त्र. दोन्ही चर्चा साजात्य. दोन्ही जन्म क्षेपितां नीढाळ. यैसे याशिचि पाड. तैसयासि सात पाच दीं भेटी. यैस यासिं मथन यथोचित. येरा दीस कटै न पडेति मग मथन कैंसे .।।. येक वेधवंत येकु बोधवंत. यके ज्ञात, येकु अनुसरला. येकु सनिधानीचा दोन्ही साध्य करण. दोन्ही कोरडे. दोन्ही परिछेदिये. दोन्ही प्रेत्नेये. दोन्ही भावाळु .।।. येकु वासनिकु. येकु बोधवंत येकु अवबोधु. येकु सिहाणा. येकु वेडा. येकु स्थितरूप. येकु मंदु. येकु वित्पनु. येकु वासनेचा. येकु सनिधानिचा येकु साधिकरणु, येकु विदेसीचा, येकु जवळीके. सश्रृषे संगीचा, समागमाचा एवं ज्ञानिया गोसावी.





येकु गजांत लक्षमि त्यागिया. येकु दुध कंरट्याचा. येकु उतमें चर्येचा येकु कनीयेस चर्येचा. येकु मात्रेचा. येकु दर्या. येकु परिछेदिया. येकु प्रेत्नेया. येकु भावाळु. येकु कोरडा. येकु करण स्वरूप. येकु अकर्ता. येकु जरठु. येक कोमळ. येकु सांतु. येकु तामसु. येक नीर्वेदु भिक्षु. येकु कठीण. यैसयांसि पाड नाही. मा दोन्हीं रचमचेचे, वाहात वाटोळे. अभिळाखिये. तयासि कैंचा होईल. यैसेयासिं दीस कडै न पडेति मग मथन, चर्चा, कैसेनि नरकचुकेति हाचिं पाड मानावा .।।. ।।१४०।। स्वोक्ति धान्याचा दृष्टांत कर्मा अर्थे यै कें वेगांचि पीकति. येकें बुतरे काळें आचारीं तरि लोकेचें वैराग्य जैसे चांगदेवो भटें केलें वचन न्याओ. उपपति. ते येथचि घडवीजे. यथा पयोव्रति. तेचि पाक .।।. सोक्ती थोर दोखु. या खालुता सास्त्रो करे. या खालुता लोकोक्ति .।।. जगळदेवो, विंझदेवो निबंध काढिले. उदया आंतु बैसवावे यैसे सास्त्र देखीलें. सास्त्रोक्ति येसणें पात्र भेदें अनीष्ट निफजलें. आता येथचेया वित्पति सास्त्रेचेनि लीळा, वचना ज्ञान. म्हणिजे लीळेचां ठांई वित्पित्पतिचेंनि आधिकथा तो स्वरूपी ईश्वरीचें सुख विलक्षण ब्रह्म वि

द्या अनंतां ।।१४१।। येथचि वित्पति म्हणिजे ती विरहित ते ईश्वरीचि. युक्ति. वित्पति म्हणिजे ब्रह्मविद्येची सामग्री, वित्पणा होआवें म्हणिजे वित्पत्तिचि उहीपुही होआवी. येथा नाणें मग तेथचि पारखि तथा वित्पत्ति आणि वित्पन्नता वित्पत्ति मागील प्रस्तुतीचें जाणिजे. वित्पनता पुढीलही जाणिजे. येथा भटां देऊळ पाहें पाठवीलें गोसावी निषेदु पाहावीले ते वित्पत्ति तेहीं आपुलीया ऊहिया पुहीया अपुर्व पाहिलें ते वित्पन्नाता .।।. आचारीचा विचारू देखे ते वित्पति. केवळ देखे तों वित्पन्न तथाचि चारिचि उपलवण प्रमये दाखवी ते वित्पत्ति. तेथचा आचार दाखवी ते वित्पन्न ।।१४१।। हें ध्रीत सास्त्र गा अधीन म्हणिजे धालेपण. दुसरे धरेना. तरि इतर सास्त्र कां धरे. तेये येक, दौनि वेळ औकिलया भले तेचि बोलो ये. तेथ काई पाप भये असे. तैसे हें नव्हे. सारिखे न्याये आपुलीया उक्ती घडऊ नयेति ।।छ।। अध्रीत सास्त्र गा. चौ पदार्था परतें तव सास्त्र नाहीं, तरि का धरे. चारी नु पुरी अनंत. केवि? अनंत ब्रह्मांडे येणे न्यायें. देवता चक्र निरपिता पृथवि येसणें कडीत मेरू येसणे खडी न पुरे, तरि सास्त्र अनंत म्हणौन, न धरे. तरि वाणरेसा ज्ञान झीनि, तरि अनंत कैसें तुम्हा पेंडिया भरू पदार्थ






।।८।। मुद्रिला म्हणिजे पेंडी घेऊनि भरू मुद्रिला तैसें तोकडे या माजि बहुत निरुपिलें जैसें चिंता मणी मध्यें कामधेनू कल्पतरू मुक्ष (मुख्य) सकळ पदार्थ सामावलें असेति. म्हणौन पेंडी. अनंत सृष्टीमध्ये च्यारि पदार्थ चहुं युगीं सारिखेचि. कळी युगीं पेंडिया भरू मुद्रिला. द्वापरें पेंडिया भरू मुद्रिला. पर ते पेंडि थोर तैसाचि त्रेति मुद्रिला. द्वापरीचिये पेंडिये परि त्रेंतिची थोर. तैसाचि कृतयुगी मुद्रिला. तेथचेयाचि पसि थोर पेंडि. उत्तरोत्तर तरि आवघे सास्त्र अनंत. हे काईसे? पर ते पेंडिचि अनंत. ते कैसी? आवघेहीं सास्त्र सामावले असे. वट बीज न्याये. तरि पेडि अनंत नव्हे. सोमकांताचेनि दृष्टांते आवघया पेंडि सम निरुपिले. परि जो जेसणा आईता येकु भलेतया आर्था आयीते. जयाची जेसनि सामग्री. तया तेसनि वित्पनता होये. भटां पसि म्हाइंभट वित्पन्नता आगळे होते. परि सनिधान नव्हेचि म्हणौन राहिले. जेंचि पेंडि भटासि निरुपिली तेचि अर्जुन देवासि निरुपिली. परि वित्पनता थोरी भटां पसि, तयाच्या पसि त्रेतचियां ज्ञानेयासि अधिक वित्पनता. तैसेचि कृतयुगी तयाहीं पसि उत्तरोत्तर वित्पनता युग परत्वे सामग्रीचे अनुरूप. परि सास्त्रचि पेंडि. चहुयुगी समान निरुपिले. तरि

पेंडि अनंत नव्हे. चहुयुगीचयां सामग्रीवतां ज्ञानियांसि सास्त्र सरेचि ना. यैसे अनंत सास्त्र सामावले असे पेंडिये मध्ये. तरि पेंडि अनंत नव्हे. पेंडि म्हणिजे आवघेया निरुपणाचा आवाका. आवघया प्रक्रणाचा समुचो यातें पेंडीं बोलिजे .।।. तरि पेंडीं अनंत हे काई म्हणावे असे परि येकाचि प्रक्रण अनंत, प्रक्रण अनंत हे काई म्हणावें असे परि येकचि वाक्य अनंत. येकचि वाक्य अनंत हे काई म्हणावे असे परि येकचि वचन अनंत .।।. येकी दो सब्दे आचारा विचाराचा निर्वच. ते निर्वचन बोलिजे .।।. येरी लीळा जेथ निर्वचु नाही ते शब्द लीळेचे. येर वचन .।।. दो चौ वचनाचा समचो ते वाक्य बोलिजे. साता पाचा वाक्याचा मेळावा ते प्रक्रण बोलिजे. सातापांचा प्रक्रणाचा बांधा ते महावाक्य बोलिजे. आवघया सास्त्राचा यावाका तें पेंडि बोलिजे. तिये पेंडियेचा सिधांत तें प्रक्ररण बोलिजे. तया प्रक्रणाचा मतीतार्थ ते वाक्य बोलिजे. तया वाक्याचा तत्वतार्थ तें निर्वचन बोलिजे. वचन म्हणिजे निर्वचन .।।. अनंत सास्त्राचा भरू पेंडिया मुद्रिला. यैसे अनंत सास्त्र पेंडिये मध्यें सामावले असे. तरि पेंडि अनंत नव्हे. ते पेंडि सामावले असे. येका प्रक्रणामध्ये तरि ते येकचि प्रक्रण अनंत नव्हे. ते प्रक्रण सामावलें असे येकाचि वाक्यामध्ये तरि तें येकचि वाक्य अनंत नव्हे. तें वाक्य सामावले असे येकाचि वचनामध्यें





तरि तें येकचि वचन अनंत नव्हे .।।. येकचि प्रक्रण अनंत. तेचि कैसे? अनंत सृष्टी. अनंत ब्रह्मांडे, अनंत युगी अनंतीं अवतारी पेंडिया भरू मुद्रिला तरि पेंडि अनंत नव्हे. अनंती देसी अनंती गावे. अनंती विजनी अनंती स्थाने अनंती अवतारी. हंसावतारे ब्रह्मायां प्रति, स्तंभाप्रति. अनंती अवतारीं अनंती भाखी अनंता परि. अनंती प्रकारी, अनंता जीवा, बोधु दिधला. परा गिरास्तित्व साधले तरि येकचि वाक्य अनंत नव्हे. येकचि वाक्य असती परिचें अनुष्टिति तरि अनंता जीवा पुनः संबंध होये. तरि येकचि वाक्य अनंत नव्हे. येकचि वचन अनंत, येकचि वचन अनुष्टिलें. अनंती जीवी तरि अनंता ईश्वराचि अनुभूति अनंता जीवां होये. तरि येकचि वचन अनंत नव्हे. तेचिं कवण तळमळीत जन्मातें सांडि. अग्रहो सरिपाटी विख विखये प्रेमाचें साधन पुर भजन. यैसे येकचि वचन अनंत नव्हे. वचन तरि येकचि. परि काकू अनंता वचन येकचि परि कक्षा अनंता, भावार्थ. अनंत प्रक्रणेवंते म्हणौन येकचि वचन अनंत नव्हे. यैसे अनंत सास्त्र म्हणौन अध्रीत. आणि जीव मनोर्थ दाटला असे. अन्य आर्ते भरला असे. आळींबणे गुंपला असे. तमें व्यापिला असे. येतुला दोखी आठवण नाही म्हणौन न धरे आणि बारा वरुषि ज्ञान दिधलें आणि चाळिसा वरि–


खां अनुसरला. तयासि सास्त्र काई धरैल. जिये अवसरिं श्रवण होआवे. ते, येकु अवसरे श्रवन नाहीं. जिये अवसरे मनण होआवें. जिये काळी मंथन करावे तिये अवसरें मनण मंथन नाही. म्हणौन सास्त्र न धरे .।।. आणि अव्हेरणे अन्य कथन विपरीत बुधि असे कष्टति अवीधि हींसा यैसा यैसा प्रकरीं सास्त्र धरेचिना. काहीं धरें ते वीसरीजे. येकाधा सब्द आठवे. तेथ उक्त त्रये संचार येकाधा येथार्थाचा सब्द आठवे. तोही निर्बीज असे. म्हणौन सास्त्र अध्रीता ।।१४२।। दुसरा अर्थ अध्रीत म्हणिजे धणि नाही. सास्त्राचे धालेपण नाही. म्हणौत अध्रित; सास्त्र धरेना, म्हणौन धणि नाही. जैसे खाजे खाईजै तेये कुरुले अज्ञान निवर्ते. परि आनिक परिसावे. जैसे वासना ऊरलेचि असें. केवि? जव जव जाणता तवं नेणता यातव .।।. अज्ञानाचेनि प्रसादें हा जनु सुखीया होऊनि असे. जेतुल जेतुलें अज्ञान निवर्ते. तेतुल तेतुल पुढिले नेणिवेचे दुख असे. ढळु कैलयाचेनि दृष्टांते येकासि वासना धरे. तयांसि संपूर्ण सास्त्र जाणावे. यैसे वासना उरलीचि असे. संपूर्ण सास्त्र. येथार्थ परिसिला. तयासि वित्पन्नता होआवे. यैसे वासना उरलिचि असे. ये युगीचि वित्पनता कनियस. मध्यमु. ऊत्तम जाली. तरि अर्जुन देवाच्या सारिखे होआवे. यैसे उत्तरोत्तर. त्रेतिचि. कृत युगापर्यन्त वित्पन्नता होआवे. यैसे वासना उरलेचि असे असेख साब्द चेरिता जालें. तरि चिधा साधनां निवृत्ति होये. परि जेवांवे यैसे वासना उरलीचि असे. तैसे येकु अर्थु परिसिजे ।।





भक्ताचया साधनाचें ज्ञान होआवे. यैसी वासना उरलीची असे. येकचि वचन आयकीजे. येकीचि लीळा आईकीजे. परि पुढते पुढते आईकावें. बहुंतां पासुनि आइकावे. यैसी वाना (वासना) उरलीचि असे .।।. येकाचि वचनाचे मनण. येकेंचि लीळाचें मनण. येकचि अर्थावरूनि मन परतें जाये ना. मग दुसरी लीळा, दुसरा अर्थ. दुसरें वचन कोनें घोळावें. येकाचि वचनाचि गोडि घेऊ सरेना. जाति विखों सेविलयां इंद्रिये काठीन्य नीवर्ते. परि अंतःकरणाचे न नीवर्ते. तैसें येकीचि लीळा. येकचि वचन. येकुचि दृष्टांत. येकाचि वचनाचा अर्थ, येकचि प्रमयै, गोडिया आईकों न सरे. मनन करून सरे, मथन चर्चा करूं न सरें. स्मरा आठवुं ठरू न सरे. यैसे गोडी, अचाट. मग दुसरी लीळा, दुसरे वचन, कैसेनि धरैल? यैसे सास्त्र विखो. हां, गा पाहें तुम्हा, विखयेत्वें ।।१।। डोंबें ग्रामी भट, नाथोबा बोलत होते. तेथ गोसावी. म्हणिजे परि गोसावियाचया श्रीचरणा लागावे. यैसेहीं न स्फुरे. मग येर काई स्फुरैल. तियै प्रसंगी हें वचन सास्त्र विखयेत्वे. यैसी सास्त्राची गोडी, म्हणौन अध्रीत ।।१४२।। घर रिगणें. येथा काळी जयाचा कैसाही आदि भावो नव्हता. रिगो आणि सास्त्रजड. आपुलेया आवडी अभ्यासावें .।।. मा. घर रिगणे म्हणिजे ज्या पासि सास्त्र तेथंचे गुण दोख आंगविजेति. सास्त्राचीया चाडा मग ज्ञात यथा


र्थिया पाहावा. तयापासि जावें. जवळीक करावी. अवसरू राखावा. आपुले उत्तमपण पाहावे. मी वडील हा धाकुटा यैसें न म्हणावें. तयाचा आचार न पाहावा विचारा उमटा येथार्था वरि लक्ष घालावें. चाड द्योतवावि. बोले तो उपाओ करावा, जव सास्त्र येते रिगणे. तो उपयोगु मानावा, देह पर्यंत. ।।छ।। म्हणीये, करणे पडिलें तरि भले तो व्यापार पाहारदीसुचि करावा. आपण न करीवीतें दृष्टी दोखु वेपजे. आणिक दृष्ट दोख नाही. येकादो म्हणि यासाठीं पांतु असें तयाचें करण. तरि पैऱ्हा मी, यासाठीं काई लाहीन, पां? यैसे जाणावें. विपरि आपुलें करण थोर देखे. धर्मु साना देखें. आबुलीये लेकरुवांचें करीताचि होतां कीं तरि तेथ नरक जाले. येथ हां बोल असे. इंद्रिये मनोधर्मु न बधीति. येसेणें, येयाचेंनि; हें न मनी आपणपें थोर माने. पाहो आदरी. करणासाठी तो पाहे. ईश्वर हेतु नु पुरवीति. तो न पाहे. ईश्वरू हेतु पुरवीति, निर्हेतुक साधन सेवटपर्यंत जनम धाडितु असे. तेथ येराचा पाड हेतु पांतु असे ।।१४३।। आपण पे देणे जैसे पतिव्रता आंगें जीवें. आंगें अभ्यासितो अवसि पाहाटे उठणे स्वभावा परता ठेवणे मानसिक नीरोधु साहाणे, चिंतनिं, मननी, निधिध्यासनी, चर्चा, संवादें, साधके बाधके पाहिजेति वीसंवादे ते मथन ना.





सीद्धार्थाची बिप्तपति तें मथन. मग सास्त्र वश होये जे म्हणे तैसा अर्थ ।।छ।। आपणपे देणें सकळा पासुनि मन काढणें. म्हणे ना. वासनिकाही होईल. आनि अनुसरलया नव्हे. तरि कैसे देणे, उचिता वीधि पासुनि अंत:करणा काढुनि आईकावे. आपणच पे देईल, जयां साना अर्थ, युगधर्म आठविता महावाक्य आठवे, भले तैसेया अविद्या जायेना. हे मा .।।. वृद्धापीं इंद्रियांचा वाहौ सरलयां विसर न पडे. पुढिली सृष्टीही उपयोगा जाये. प्रमाणु मेरु बुझे अवघडी उभै ठाके. येथा कव्हणा येका आपणपे, न रखिजे. मग तो अखंड चिंते येकाधा समयो मांडे ते व्हेळी तो उभा ठाके. तैसा ठावो ।।१४४।। येक अर्थ तिचे काळि प्रत्यया न ये. तेथ तैसेचि वासना किजे. न सुधी वासनातरि विसरैल म्हणौन घोकीजे. मग अवबोध तो काळ करितु तुष्टी पुष्टी येवं मांदिक. घेईजे. घोकेजे. मग काळें करूनि म्हणिजे येकु अर्थ घोकुं सरे आणि ते व्हेळीचि प्रत्यया ये उमटे. केवि? जे घोकेजे हें वचन अनुष्टेले. म्हणौन प्रेत्ने साहे जाले .।।. दुसरे ते मननी निदिध्यासनी विमर्से, आवांकिजे आणि उमटे. जैसे भटांसि उमटे. केवि? ना, वीधि करिता वीधि स्फुरे. हें अति व्याप्ती .।।. तिसरे आणिका अर्थाचेनि श्रवणे उमटे. जैसे उपाध्यासि गोपाळ मंत्री


भेद निरुपितां गोसावी ते विमर्से. जे गोसावी तेचि श्रीकृष्ण चक्रव्रर्ति यैसे प्रतिति जाली जैसें पीता पुत्रासि पढवितें ते व्हेळी प्रत्या नये. नुमटे. मग काळे करूनि प्रत्याये आणि उमटें यैसे होये. तैसा ठावो. घेणे म्हणिजे अर्थावरि बुधि ठेवणे. घोकणे म्हणिजे जयाचि आवृत्ति ।।१४५।। आताचें तवं यैसे घेपे म्हणिजे विश्वासें पाठी म्हणिजे काळांतरे अनुभवें जाणाल म्हणिजे आचारपराचा तो तेणेचि अनुभौ. विचार पराचा उमटे ते व्हेळीं येक मणनें. येक चर्चा. येकु आणिका बोलता. येक पुन संबंधें. येक अपरोक्षें. येक सामानीं. येक विसेखें उमटे. येकाचा अनुभऊ प्राप्ति हे मा. ।।१४६।। हे वचन हा वचनार्थ म्हणिजे दोन्हे वेगळे दावीली. वचना पासुनि निफजला तो वचनार्थ माता पुरा न वचावें हें वचन तियें साभिमानें स्थानें साधका विघ्न करेति. हा अर्थ वचन जावों, नेदिजे म्हणिजे अर्थ न धरे तरि वचन धरावें. आवृत्ती करावीं. विसरावें ना. वचनांतु अर्थे सांपडे. परि अर्थे वचन न धरे. हे. मा. ।।१४७।। काक म्हणिजे जैसें मढपिंपरिये जातां साधीं जाणितलें. जैसे वैस गृहाअभियोगे भटीं जाणितलें .।।. कक्षा म्हणिजे जैसे दादोसातें सर्वज्ञ म्हणितलें नीजवीता नीजेति ना. जैसे सामान स्त्रीयांते. सर्वज्ञ म्हणितलें माणसे आलीं. भावार्थ म्हणिजे जैसें साधाची रींगणीयेचि फुले. जैसे भाई देवाचि बोरें. प्रक्रण म्हणिजे जैसे उपध्यीं कास्तांबरे, हरि देवो पंडिता निरुपिता आमुचे गोसावी.





श्रीकृष्ण अवतारू बुझले ।।छ।। आपणया पासुनि पुढिले सत्व, रज, तम, सुख, दुख आश्चर्येसि जाये. आणि येणेसींचि ये. तरि दुसरेंनसिं बोलैल का मनी तेचि भावेल. यैसे जाणावे. ते केवि? उठी, बैसी, हेतु, धातु. हेतु म्हणिजे मनोधर्म. धातु म्हणिजे स्वरूपा वरील ।।१४८।। मा .।।. माहार वाडा हुनि काढावा. जया साहासा वाचक. गज स्कंधीं पुसावा जयां म्हणितले या प्रश्न. धर्म म्हणिजे सास्त्र. आचारू असतिपरी. मग विचारू राजसें स्थानें नीषेधिली तों दोखु नाही हे सांगितलें. ना असंभवी तरि काढावा हाचि न्याओ. माहारवाडा संबंध याचेनि योगें माहा या परता अपवीत्र ठावो नाहीं म्हणौन तयाचेनि दर्सण दिधलें .।।. महारवाडा द्विरूप. तया मध्यें स्थान. स्वग्रमादिक. सवयां वोखटे थोर दोखु ममता असे. आणि निमित्याचां ठांई नाही, यैसा हें तेथ जे मनोरर्थ उपजेति. येकाचा दोखुचि नाहीं. येकते सास्त्र श्रवणें परिहरेति. येक सांहे जाति. येक अनुतापें परिहारावें. किती धर्मु काढावा. जे अनुसरण न भंगे तरि आवाघाचि काढावा. ना तरि ईश्वर संबंधा पुरे तेतुला. कणु कणु भंगुनि काढावा. अन्यत्र संभऊ असे परि तेणे मुखा टाळे घातलें. तें उखळत. कां? तरि येराचा मनोधर्मु स्वीकरितु. कां? पुर्वे आराधिला होआ

वा कीं यथा बाईसें .।।. आपुलेनि मुखे कां नेंदिति? निस्तरले कां? ना, तेहीं कनव जोडिली. असे म्हणौन असतीपरी महावाक्य चर्या भंगुनि काढावे. येर प्रसंगो प्राप्त. काढितां पुरुषे दोखु चुकविजे. जवळीक म्हणिजे अवसर राखणें :१: जिज्ञासा :२: येकमेका चर्चा :३: मनन :४: ज्ञान संभऊ पाहाणे :५: चर्या न भंगे :६: निमित्या पासि राहिला. असे करावें करवीले तेंथ थोर म्हणियें. येर अभिळाखे करवीलें असे. येरे ठाई नें लागु म्हणौन येथ योग्यता थोरि. नासु थोरु ढाकलयाचा दोखु नाही ।।१४९।। विखये वेवस्ता करि. हें बोधा वाचक. कां देवता अवतरोनि आपण या वरि प्रतीति आणिली. ना, ईश्वरीचेनि येकें सब्दें जात असे. ते ते देवता नव्हे यैसे येत असे जे जे सक्ती नव्हे म्हणितली तेणे नव्हे म्हणे. यैसें जाणे तयासिचि विखयें वेवस्ता होववे .।।. विखये वेवस्ता करि जाणे तयासि आइको ये पुराण परि भागवत. येरासि विपरित बुधी ये. कां विकल्प संचरे श्रीकृष्ण चक्रवर्ती जरासंदा भेण पाठि वर्ण केले तरि जरासंद ईश्वरू का न व्हावा. यैसे बुधी ये. सोळा सहश्र अंतापुरे. आठ पाट मुहिख्या. येकी की दाहा दाहा कुमर. येकेकी कुमरी यैसा विखो सेविति. तरि गोसावी जीव होति. भांलि स्वीकरिली तरि जीव होती यैसी बुधी ये का, विकल्पु संचरे मग संदिपणि पासौनि चौदा विद्या अभ्यासलीया







तरि गोसावी ज्ञान यैसी बुधी ये. कोमळासि म्हणौन वासनिकासि ही पुराण आइको नये. बळाबळें आइकणें पडिलें. नाइकता नींदा करिति. अथवा दृष्ट अभिलाखें आईको तरि विखय वेवस्ता. अनंत सक्ति परमेश्वर करू जाणेति. तैसेचि परमेश्वरू प्रायेण करूं जाणेति. तैसेचि पुढीं परमेश्वर प्रायेण होति. तेही जाणिति. अथवा आधिली सृष्टी का तीयाचि जन्मी परमेश्वर प्रायेण होते. मग विखो आश्राइला म्हणिजे ज्ञान दिधलें होते. कां पुढां देति. यैसे विखये वेवस्ता करू जाणेति. परमेश्वर प्रायेण .।. कां, पां? सिंदे राणेयाचेंनि दृष्टांते सकळाही सक्ते देऊनि आपणया समान करीति. विसेखु ज्ञानियांसि सकळाहीं सक्ति दान करीति. ते बीज अनुसरणा माजि रुपले असे. अनुसरणाचें बी बोधा मधे असे. बोधाचे बी भुत भजना मधे असे. म्हणौन

अनंत शक्ती परमेश्वर सकळांसिही विखये वेवस्था करीति. तयाते पावेति ते करूं जाणेति. विखये वेवस्था तयासि अनुसरले ते करू जाणोनि  यतें जाणति ते करूं जाणति मग विखये व्यवस्था म्हणौन

पुराण आइको नये. अन्य वार्ता आईको नये. सांगो नये. तयाचि परि काहीं चेतन विखये पदार्थ पाहों नयेति .।. ।।१५०।। अन्य प्रपंच, अन्य जीव, अन्य देवता यांचें जें वर्तन. ते अन्य वार्ता. ते क्येलया ईश्वरू जवळीचि आला असे तो परता जाये. तरि नावडी, खंती, दोखें, द्वेखें, रोखे तें वर्तण न बोलीजे जेणे ईश्वरू अत्यंत दूरि हो–

ये. अन्य वार्तेचां कांइं विकारू. विकल्प, आळिबंण, हींसा, नीद्रा, स्वभावा अतिक्रम. अन्य वार्तेमध्यें कथन घडे. श्री मुखीचा सब्द नव्हे. यैसा येकही नाही. म्हणौन मौनें असावे. मोन्य भंगीलयां तों अनीष्ट दृष्टादृष्टें अर्जुन देवां जयद्रथवधीं असी भक्ताचा ब्राह्मण भांडारेकारा पटिसाळ पतन. येळापुरे पुरुष क्षेभु धांदूले मोक्ष कापुस प्रमाणू अनुभव नाम खंडण गंगा द्वारें डखलयासी क्षापण, सींह नारायणी गणपती आपयो. वनिता अधिकारू, डोबेंग्रामी भटां कांड निवासां नाथोबा ज्वर. अरन्य ग्रामी साधा सिक्षापण. नेऊरगांव मार्गे काकसुकुरु दृष्टांत, कमळ भेर भोजनि. सेंकटां भटां लखु बाइसा भांडण. बेलोपुरी भटां प्रकोपु. जांळांघरे उपदेसे गोविंद चंदा अवज्ञा. लुई पाईतें रावो हांसीनला कान्हासि सिक्षे सबदा तव येतुलयां दोखु दृष्टादृष्ट मिळे .।. अन्य वार्ता आइकीजे. अथवा पुसीजे. तरि लक्ष तुटे मरणिठी होयें. येथा धांदलु लक्ष सुटलया मरण ये प्रतक्ष. म्हणौन मौन्य भंगो नेदावे आपणे मौन्य करवें. आणि पुढिला करवि करवावे. कां धर्म वार्ता करावी. ना, तरि विभागु करावा येऱ्हवि मरणीठी. यैसे भियावे. ।।१५१।। सुख म्हणिजे समाधान. श्रये म्हणिजे परत्रा. धातु म्हणिजे सृष्टीयेस यें तिन्ही संवादे समयोचित प्राप्त काळी उचितेंसी ध–






र्म गोष्टी तवं होति. विसंवादें याचा विपर्याओ. अरन्य रुदनाचि परि होये. सिनला भागला पुरे म्हणे नाही. म्हणौन सुख श्रये सांघात यें तिन्ही नाही म्हणिजे गोष्टी न करावी. ते श्रम निवृत्ति ना. ते भेटी ना. ते धर्म वार्ता ना. ते चर्या, मथन ना. न सुश्रृसाना. तो सगुना, ते जवळीक ना. ते धर्म रूप क्रीया न करावी म्हणौन दुख, दैन्य, पाप जिये क्रिये जे ये सब्दें निफजे तें न करावे ।।१५२।। तो तेतुला म्हणिजे भेटि, धर्म वार्ता पुजावसर निरुपण, तो काळ सुभ इष्टदायेक. म्हणौन मंगळ काळ, पुन्य सब्द मिश्र म्हणौन नुचारीतेंचि. हे. मा.।।. परमेश्वर मंगळ रूप डोळा देखतेंचि असेति. मंगळा चुकले म्हणिजे तेधवाचि आन आन, निरुपिती. ना, भट मंगळ रूप आणिक पसि. येथ ययांसी काई म्हणावै असे. अवसरा न चुकावें. कां, पां,? म्हातारी मंगळा चुकली म्हणौन अवसरें थोर गोमटे, केवि? जें तेव्हळी ईश्वरू शक्तीवंत ईश्वरा ईश्वरपण जियेचेनि म्हणौन तेयेविण ईश्वरू ब्रह्म तुल्य अविक्रिय. ईश्वरू विकरे खेळ करी. पुजा स्वीकरी तेणें थोर गोमटे होये. येऱ्हवी देवो तो सर्वदा परि पुत्रा अवसरीं थोर गोमटे. अपुर्वेलीळे थोर गोमटे. कां पां? जीवास अपुर्व पणे सत्व उपजे. भावो उपजे आणि ईश्वरी चिये प्रवृत्तिचा विसेख म्हणौन दोही कडूनि थोर गोमटे होये. तैसेचि असनिधानी. निमित्य वीधि दोहीं

ते निरूपण ना. ते जिज्ञासा ना. तें क्षेपण ना. ते सिव वचन ना. ते स्नेह ना. गोसावीचया कडुनि थोर गोमटे गुर सिक्षाचया कडुनि असक्ता सुश्रृकराचया कडुनि संगु देतया करितयाचा या कडुनि भेटकाळी ज्ञात अज्ञात, विरक्त, अविरक्त, भिक्षु, वासनिक येऱ्हवी येरा कडुनि थोरे गोमटे होये. मनसा वाचा कर्तवे. तैसेचि थोर वोखटे होये म्हणौन अवसरेंचें थोर गोमटे होये. अनिक


अवसरेचें वोखटे थोर होये म्हणौन अवसर भ्रस्ट न व्हावे. ।।१५३।। तेसा स्थाने काळी न करूनि तद विपरित तें करवितीया. ते थोर गोमटे होईल. तैसो स्थाने ये वासरेये व्याप्ते विक्षेपे स्थाने राजसे तामसे न कराविया, येक झाडाखाली सत्वस्ते स्थाने धर्म वार्ता करावि. तेलीयातें घाणवडी बाहिरि काढिलें आनि बहिर काढिलें. गावा बाहेरी काढीले. मग धर्मवार्ता क्येली. तैसेचि वासनिकातें भिक्षुते गांवा बाहेरी काढावे. मग धर्म वार्ता करावी. घरे गांवामध्यें गुणातें नेदि. सबीजें अक्षरे नव्हेति तैसा स्थानें तैसिया तैसिया गोष्टी न किजेती. येणे न्याये झाडा तळीं धर्मवार्ता कीजे. सगुण सबीज होये ।।१५४।। रहस्य म्हणिजे सबीजा येवं श्री मुखेचें निरुपण सब्दे ते अन्या प्रति न बोलेजेति. तेणे ईश्वरी खंती ये. कथन होये. येकातें येकुचि आति. हे संतोखाचे जरि बीज. येका दूगणि. येकांचें रहस्य हे कां पां? जे कथने जाईल तस्मात लोहें पाणी गिळीले ।।१५५।। यैसे न म्हणिजे ना येकाजे






आश्चर्य रूप न वर्तेतें तें न बोलावें. प्रत्या नये. नव्हे. म्हणौन डाकुली वाति तेने तया पाव. वा आपण या अवीधि ।।१५६।। अन्य म्हणिजे इतरीचें ईश्वर येथचा निचाडु साभिमानिया बाहेर घाली. परि घेना. घोकिना तो त्यातचि. त्या प्रतिधर्मु बोलीलया कथन होयें. आपण आपणयातें प्रकासिति. बळवंदे वास पाहावीति. परि ज्ञान ने दिति. कां पां? पात्रते, वांचुनि. म्हणौन कथुचा थोर दोखु. आपण जो अर्थ न करीति. तो जै करी तै खंती केव्हढी पा? कथने विपरीत बुधि अक्षेरें निर्बीजे विखये सेवा अवीधि ये मादिक. येणे चर्या जावे ।।छ।। कथनें अणिक सृष्टी भानु भट अधिक्रण लाहिजेति. कथने अनंता श्रृष्टी टाकी. ज्ञाण हा धर्मु, येऱ्हवी ईश्वरू ज्ञान भांडार. दुसरा ईश्वरू जीवें कां उरावें? चेतउं, सके. मग खंति रावों राणीवें बैसे. मग मागिलाचे गुण हे काई कव्हणी ठांई असेति. अवताराचेनि साकारा जरि खंति, तरि स्वरूपी डहुळेति धर्म, बोलतां परि तोखु. ।।१५७।। जेथुनि होये जे, जया पासुनि जो गुण, हे मुदल च्यारि गुणु. वेधु, बोधु, अनुसरण चर्या. सास्त्र बोंधात आलें. अथवा वेगळें पाठु यथीचि वीत्पति स्थान, प्रासादु, ओवी, गीत आधि करुनि विपरित म्हणिजे पहिलें बधि होति तियाचा विपर्याओ होये. ज्ञानिया येथार्थेया हीतक्ष तें जाये. मग अज्ञानिया. अ–

न्यर्थीया कैचा लटका, अभिळाखेया द्रेखीया. यैसे खंति करी जाये. म्हणिजे अक्षेराचें रहस्य जाये. जया पासुनि, जो गुण वर्तला असे तो जाये. हे. मा.।।. विपरीत बुधी येकी धर्मे. येथा सारंग भागवत विकारे रजे राभसें येकि माने. येथा जो गुना येकु सास्त्र निर्बीज होउवावयाचे कारण. येक कथन. येक विपरीत बुधि .।।. ईश्वरो देवता म्हणिजे अथवा जीव म्हणिजे यातें विपरीत बुधि जाली. ईश्वरी यैसे म्हणिजे आणि जीव ईश्वरू म्हणिजे यातें विकल्प बोलिजे, विकल्पा आणि विपरित बुधि यैसाभेदु दोखी गुण उमटे. हा विकल्प गुण जयाचा ठांईं असे तयाचा दोखु ये. यातें विपरित बुधि बोलिजे. गुणाचा ओहोटु. याते विपरित बुधि बोलिजे. दोखाचा चढ यातें विकल्पु बोलिजे. ये काळाचा ठांईचाचि दोखु. कर्मजडाचिया परि. येकांवधिचि विपरीत बुधि .।।. सिक्षाचेनि अन्यथात्वें गुरुसि अनिष्ट आति. कां पां? पद न पडिलें असे म्हणौन विभागु करावा. कां? तया नावडे तें न करावे. जयाचि प्रकृति सदोखु तेणे विसिष्ट बुधि किजे. तैसेचि क्रिया किजे. नामाधारकाचियें ठाई आधि करूनि. तैंचि विपरित बुधि नये. दोखु नये. यैसाही विपरित बुधि ये परिहरे. भीक्षु वासनिकाचिया जघन्य क्रीया देखे, आईके दोखरूपा. परि विपरित बुधि येवोने दावि. दोखु येवो नेदावा श्रधा जावो नेदावे. भावो जावो नेदावा. प्रीति जावा नि –






दावि, लेप खोमळें न्याये. परत्रत्व न वचे. मनोर्थ पुरवितें तें असे. अज्ञान निवृत्ति होईल. प्रसादु होईल. आचाराचिया घायेखंडि होति. तयाचेनि भजने पायी धुईजेति. कौपिन झोळी धुईजैल. त्यासि देईजै. तो आपणयासि देईल. आपुली क्रिया करिल. तेणे अनधिकारे जाति. अधिकार येति. दोखुरूप जघन्य क्रिया देखिलेया, आईकिलेया, भावो श्रद्धा प्रीति न वचे. विपरीत बुधि नये. तो माईतया हरीचि जाति. प्रज्ञा सागराचि जाति. घुई नाईकचिये जातिचा .।।. अधिकवृति कान्हे केली परि विपरीत बुधि नयैचि. अणिजाळांधरेसि कान्हाचि खंती नाही. म्हणौन पुढे बहुत दी वाचला. यकेंचि दोखें पिंडु जरि गेला तरि तेन्हे दोखु जयासि घडेति. कथन, विपरीत बुधि अधिक दाति. तयाचें देह वेगांचि जायें. विपरीत बुधि आंत अव्हेरण घडे. अवज्ञा घडे. पुढिलसि खंती ये, मग आपणया नावडि उपजे. क्रोध उपजे. द्वेखं उपजे. मग कखाओ उपजे. तरि अधिकवृत्ति ते कैसी होये? म्हणिजेता विपरीत बुधि आंतु अधिक वृति अनुखंगीक असे. या अनीष्टा तव देहचि जाये. देह जवं जितेतें जव जाये. तव तिन्हीं ताप पावेति. कां, पां? अभिमानेयाचिया क्षोभातव. अधिक वृत्ति अभिमानेणि देवता क्षोभे. आणि विपरीत बुधि तव जीवा दुखु होये. आपुलीया जिवा दुख होये.


आणि अनुचिते क्रिये अभिमानियाचा क्षोभु न चुके. यातव तिन्ही ताप पावेति पाठी देह जाये. पाठीं नित्य नरकासि जाये. तें वेगळे. म्हणौन परिवारा वरि विपरीत बुधि येवो नेदावि .।।१५४।। मा. द्रव्यतें द्रव्यचि कण वस्त्र येवमुदिक येंत्र म्हणिजे वस्त्रे विखो. सेवा म्हणिजे विणयोगु. स्त्रियेपासि द्रव्यें वेगा जाये. कां ये? ना, सत्व समरण, वैराग्य, चर्या, वेध, बोध अनुसरण .।।. द्रव्य येंत्र मायाचि सांघितलें. तें भावार्थे त्याज्य. येथ सेंवाचि सांगितली. येका पुरुषा अधिकारू भेदे ।।१५९।। कखाओ तो तमिचि बोलितो. रजाचा तो रंगु. तो अविद्यात्मकाचा न संचरे. तेथ विपरीता बुधि संचरे. आपुलां ठांईं कांही प्रतिकुळ करी. तयाचा संचरे. कखायांसि पुढति पुढति दोख आठवेंति. तया तेचि गोष्टी. अपक्व म्हणिजे जयातें देखेलयां आईकिलयां दोखु आठविति. कां, खंति करितो. अपक्व अथवा द्वेखा आलंयां अपक्व निरंतर मनी दोखु आठवितुचि असे म्हणिजे पकला .।।. कुयोगिया म्हणिजे कचिंतेंसि योग कां– जी भाजी सेवि. दुसरे अंतरी विखयांचे उलेख करी. हावभाव यैसा सेवे न येतां देह जाये. तरि पावे. तैसा हा न वचे. म्हणिजे कखाया पुर्वावस्ताची जाये, आणि हा सेवना जाये .।।. कुयोगीया सेवने तव धर्मा पासुनि जाये येतुलेंचि आणि तो दोखेसि निरयां जाये ।।१६०।। विकल्प म्हणिजे देवां तीर्था प्रतिमांचा ठाई अदृष्टत्वे अवि –






सैखे विसेख कल्पी. विकल्पु संग्रहें क्रिया करितां संचरे. संचरे म्हणिजे प्रथम उलेखा वाचक .।. मात्र म्हणिजे हांही कां न व्हावा. मात्र ईश्वरों म्हणौन आणि आणिकातेंही म्हणिजे परि तो अल्पचि काळ. येथा प्रेम संचार वत आणि ईश्वरी ईश्वरू बुधि आली तो मेलाचिकी आणि येंर असे म्हणौन बोधु जेणे साधिला. तयाचि कैसे खंती, ते तेचि जाणति. जैसें स्त्रिये आवघे अन्यायें उपसाहिजेति. परि वास अणिकाची पाहे तें नुपसाहेति. जेणें राखिला देहपर्यंत तो जैसा त्यागु जेणे केला ते पदार्थ इश्वरी अर्पिले .।. तैसा विकारें न वचे. म्हणिजे तो मागुति उपरति घे तरिवाचे अथवा अल्प सेवना न वचे. तुरंगमांचेनि दृष्टांते अनुतापे अधिक वृत्ति बळासि ये. कां तो आवृत्ती सेवना जाये. म्हणौन येरा पसि हा नीका ।।१६१।। अपर म्हणिजे चैतन्या परंपरा. कर्मभुमी वेऱ्ही येकीसि येकि अपर धर्म म्हणिजे तयांचि साधनें बाह्य क्रिया. धारण म्हणिजे आचरिजेति. अथवा वा मनें परत्र बुधि धरिजेति .।. भितरी बुधि असोनि बाह्याकार धारण, याचि नावे विकल्प हें लक्षण ।।१६२।। अनीष्ट म्हणिजे विकारु. तो सेविना विकल्प संचरे. कां? जे विकल्पाचें मूळ विकार. येर तो याचे फळं. कांजि भाजी सेविता कव्हणी नसुये तयावरि तमें विपरीत घें. मग मिळेते तै ठाये सेवि तीर्थे क्षेत्र जातुरुवा सां


गातें जाये संग्रहो रूप क्रिया करी. सलिंग वृत्ती आश्राये. गोडी संचरे हें निकें, हें वाऊरें नीवडी, म्हणौन अनीष्ट सेवितां विकल्प संचरे. ये का जे विराम सत्व, जाये. मग संचरे. दुसरें अनीष्ट सेविता विकल्पुं संचरे. ते काई? ना, हा विकल्पु अनीष्ट विखया तो ईश्वरे बळें मी ईश्वर म्हणौन फेडिला. कां कव्हणा येकाचेनि आंगलगें संचरे. जैसा आमुका तमुका येकाधयाचि ये आंगि संचरेला मग तो त्यातें अपुलीया मोहरा करीं. अनीष्ट म्हणिजे आतिले तेतुले अनीष्ट. सेवा म्हणिजे केतुला येकु काळ म्हणौन अनिष्ट सेवितां तो विकल्पु संचरे ।।छ।। विखै गेला सत्व स्मरण जाये. आवडौनि तोचि अर्थु आठवे. गोडीया अवीधि मन रितें होये. गोडी नाही कव्हणा अर्थाचि. आणि ईश्वरीचि गोडी काढे. चाड आर्ति काढे. अनीष्टासि न भियां त्यागु दक्षता काढे. यैसा कव्हणी येकी वेळे धर्मु सुहुर्धासिं सांघे. यैसे अनीष्ट प्रसवता येकाधि वेळे विकल्पु संचरे. यैसे होये ।।१६३।। मा. ।। अवीधि म्हणिजे जीवासी दुख देवतेसी क्षेदु. अवीधि व्याप्ते बहुति परिचा. अनीष्ट सेवा होये. हींसा होये. कथने होये. विपरीते होये. द्रव्य यंत्रा सेवा होये. विकल्पें होये. अधिक वृत्ति होये. देवता क्षोभें निरोधें पदार्थ






विखु मत्वें दत्त पदार्थ ग्रहणें. उसर्गे ला पदार्थ पुढिला चा. तै आपणया अवीधि होये. सारंग पंडित. प्रसवे म्हणिजे काई? ना, साना अवीधि थोरा अवीधितें आणि मग जाये. अवीधि तद जरि या प्रसवे. कथने तोंडचि जाये. पुजा पुरस्कारे देहचि जाये. इंद्रिये लालुपें इंद्रियाचि गोडी जाये. चालता किडीया मुंगीया मारति. पायेचि जावें. धर्मु म्हणिजे वेधु. बोधु, अनुसरण, चर्या, सास्त्र, प्रसादु, स्मरण, मनन या आवघया वरूनि बुधि काढे. काठीन्य ये. प्रंसवत नित्यासिठी होये ।।१६४।। विद्यारूपे म्हणिजे धर्मु मिखे. संगु सांगात दे. गड बडीला देखौनि, काजे गोसावी धर्मा धर द्याविजें .।।. कृपा रूपे म्हणिजे कनवा बापूड यासि कोन्हे नाही. अनाथु म्हणौन दे. अविद्या म्हणिजे ममत्व, लोभु दुख पावलयाहीं न संडे ते अविद्या. धर्मा वेगळें सौजन्य करितां बोळे तें पदन. अति स्नेह तेणें अविद्या संचरे. कनव येथा अहीर देंसु विद्या रूप येथा जळमांडवि ।।१६५।। द्वारें म्हणिजेति जेतुले निसेध वाक्ये. पांत म्हणिजे येथा देऊळ पडों पांत असे. उदित जालि परि मि

ख नाही ।।१६६।। प्रमादु भये उपजे. श्रृत कां द्रष्टार्थ, तरि तै वासनिकासि हींसा विकल्पु उपजे. यैसी संभावना याचि नांवे भये. मागुतें विखये वेवस्ते नये. तरि तो अर्थ न किजे. हें येक देसी भयेचि वांचुनि येरें अनीष्टें. हींसा इंद्रियार्थ नहेति. येथ परिछेदुचि करुणें. सत्वातवं जे अधिकवृत्ति. तोही प्रमादचि, जैसे भस्मकाचि भुक. कां मांद्याचि अभुक अथवा सुजीचें मोठेपण. कां वज्र किटकीचें रोडेकीपण तरि हें मरैल यैसे जाणावें .।।. पुरुषे अपराधें रजस्तम अथवा रोगु आपजविला. तैसें अनुसरण गेलयाहीं परि तेन वचे. येथा पाये मोडलें, डोळे फुटले तैसेया जियावे? यैसे प्राक्तन तवं नाही. कांजें स्वातत्रें आपजविले .।।. मा .।।. प्रमादु तो, द्वेषरूप. येकु देहाचा. येकु जीवाचा, प्रस्तुत घात देहाचा हे होये. जेणें, जेणें प्रकारे तें श्रृत दृष्टु चुकवावें. ईश्वरेसी अंतर जेणें तो जीवाचा चुकवावा ।।१६७।। विल्प (विकल्प) स्फुरे हें स्वभावा आंतु तरि तो जीणावा. त्रिसुधी जीणतां न जीणवें. तरि येकु गोमट या लागी असक्त





भीक्षु भेटे, कां येकाधा विरक्त भेटे, कां निरोपकु भेटे, कां त्यागु करू निगाला यैसा भेटे. सास्त्र, वैराग्य, प्रीति सांधे यैसे भीक्षु भेटेति. कां वोखटें चुकवावया स्फुरे. येकाधें बिढार पडैल, कां विद्यावंताचे नाचणीचे बिढार येईल, कां देवते निरोधु होईल, कां वाघ सापु येईल म्हणौन उभयेता सांडिजे ।। मुनि बास ।। विकल्प स्फुरें म्हणिजे काई? ना, हा स्वाभावा सारिखा न संडीत असे. लिंग देहा सरिसा लागला असे. म्हणौन नाथिली कल्पना करी म्हणौन विकल्प. गोसावी वसविले. तेथ असावे देवतां वास पाहो नये, भुतें सकळे गोसावीयाचा ठांई, सोच्य रूप उपजवित असे. तें मोडावें संगें करूनि, यैसा ही अस्फुरत असे. तरि निगावे ।।१६८।। अधिकवृत्ति म्हणिजे गुरुचयां पसि, आगळें अन उंचे वस्त्र, अधिकेंसीचें. अधिक मान्यता, पुजा पुरस्कारे हें ना. अधिक वृतिचेनि सामर्थे देहीं रोग उपजे. कां? तातकाळीक देहचि जाये. येथा कान्ह हे. मा .।।. कथना पसि अधिक वृतिचि थोरी खंती. कां पां? तो वरिष्ट बुधि आनीत असे. गुरुते वि-


पलावित असे. गुरुकुळीं दोनि मान्यता ज्ञानाचि आणि वैराग्याचि. ज्ञाने मान्यता उपजविलें तेणें विश्‍व भजवीलें. विश्‍व भजतु असे म्हणौन ज्ञान वैराग्य लपवावे. अधिक वृत्ति हें म्हणावे असें परि उपाधि मनाचा ठाई समान हेंचि दोखावह अदृष्ट दोखु तो सीधुचि. अधिकवृत्ति ते गुरुपसि. तरि तेणे अवीधि जाये जैसा जाळांधरीचया कान्हे गेला. तरि समाने काई होये? उणेनि काई होये? ।।१७०।। तैसी सामग्री लोका प्रकासिजे. पुजा पुरसकार तेही ना येथा कां भांडारेकार. यैसेहीं करिता म्हणिजे जातिक, वैद्यक, गावो पुढा बोले जाणणे. जिये आंगिची जे सामग्री ते लोकांप्रति प्रकासिलेया लोकु भजे, म्हणौन सामग्री न प्रकासावी ।।१७१।। कामोभिळाखा पदार्थाचि चाड ते तव न पुरे आपजवितां दुख, दैन्य हींसा ते क्रिया फळ रूप जाली. मग परत्रे हींसाधनंरूप कामा तव क्रोधु स्वतंत्रही स्वरूपदोखु. परश्री संताप मग मिनला तरि वेचितां रक्षिता योगु क्षेम करितां पाप. अवसरी उचिते काळीं पदार्थ वेचु न सके. तो लोभु वेव्हारे तरि, संबंधि यें जळति? ना, येथ तरि भिक्षु वेचिंला. हे ईश्‍वरा थोरी खंति. म्हणौन दारवठा या वाटा तेथ जाईजे ।।१७२।। वर्म जे पुढिलाचा गुपित अर्थ





प्रकट किजे, जो करू नये. दैन्यरूप हे केलयां नरक ।।छ।। वर्म म्हणिजे कल्हारी ये. अळुमाळ ये करी स्पर्श मात्र केलयां जरि सिरापसि तरि सभा साध्य उसंधीजेति. अथवा नव्हतें दोखु बोलिजेति. ते महापाप धड करि जिव्हारी लागे. ते देहपर्यंत न विसरे. येक पोटी सुरी सीरे. सीरें ते येकचि मरण आणि दुख, वर्म जेव्हेळी जेव्हळी आठवे तें तें मरणे आणि दुखें म्हणौन वर्मा पसि सिर नीके ।।१७३।। मा ।। वोखटे गोमटे जाणे. वोखटे म्हणिजे अनीष्ट अवीधि हींसा. गोमटे म्हणिजे इष्ट वीधि, धर्म ये दोन्ही जाणे. येथचा काई पा? पर इतरीहि जाणिजे. जाणौनि करि म्हणिजे अभिळाखे अभिमाने वोखटेचि आंगुवि. येथाचा आदि करुनि. कां? जें प्रमाद नित्य. ते येथचयासिचि कीं. ।।१७४।। मा ।। मात्रा गमन देखे म्हणिजे आपुले थोर अनुचित तें साने करी तयाचा दोख न, मनी आणि पुढिलाचे साने अनीष्ट तें थोर करी सेंदउपवाडे हा स्वरूप धर्मचि म्हणौन आपुले वेश्या गमन थोर करावे पुढिलाचें थोरही तें साने करावें. तै अदृष्ट गोमटे. येक जीव कर्म चांडाळ, येक कृतघ्न. येक प्रतारक. येकु विश्वास घातकी. येक मैत्र द्रोही. येक गु–


रु द्रोही येक मार्ग द्रोही. येक गोत्र द्रोही. येक ईश्वर द्रोही. येक स्वामी द्रोही. ईश्वर द्रोही. येक परिवार द्रोही. यैसे दोख प्रति सृष्टी माझाचि ठाई असेति. मज परता सर्व चांडाळ नाही. कव्हणिचि यैसे आपलया माना अखंड काळे देत असावे. आणि पुढिलाचि दोख देखो नि यैसे देखावें. हा प्रेमासि पात्र असे. यैसा माहादेओ रावो, सेण पुंजे बाईसे, वोरंगलेचे भगत, प्रति कुळ करू आले. परि प्रेम दिधले. यैसे मना गुण आणावे. माहादाईसी म्हणितलें न देखत या देवा लागि झळवैली पळवैली. ये सदैवें म्हणौन पुढिलाचा गुण घेतला. परि दोख ने घेतीचि. गोसावी मुख न पहातीचि. श्री मुखें बोधु ने दितिचि. म्हणौन आपुला दोखु घेयावा. आणि पुढिलाचा गुणु घयावा. तें केवि? ना, सर्वज्ञ म्हणितलें मात्रा गमण न देखे येणे न्याये, पुढिलाचा गुण पाहिजे. आपुला दोखु पाहिजे. तैं गोमटे फावे. अनुसरण सिधी जाये .।।. १७४ ।। मा. ।। क्रिया म्हणिजे मानसिकत्वचि काईक त्रिवीधी परि संत न बोले म्हणिजे असत. अनुतापु म्हणिजे अनुचित देखोंनि पोळे. दुख करी येथा माहादाईसे पोफळाचां प्रसंगी तियेचि प्रक्रणीचें हें वचन. पुरुश्चरण म्हणिजे प्रसावाचि चालि मोडे. क्रिये तव लागले तेन पुसें हें प्रश्ना .।।. लागले तें ही पुसे. हे रामे .।।. ईश्वरे खं.





ती सांडिली. उपसाहिलें. तरि आधा प्रसऊ पारूखला जीवास अनंतापु उपणले. तरि समग्रही पारुखला. कां उभये निस्त की. आपण या अनुतापु उपणला. आणि पुढिलाचे वोखटे न फीटे. तरि वाढतचि असैल .।।. आपुलें अनुचितु देखोनि दुख करी. तरि ईश्वरी कणव उपजे. स्वीकरिति. माहादाईसे वाराणसींहुनि आली. दुख करीतें. साऊमीं, न, रीगेति मग मानिले .।।. ईश्वरीचि अनकुळता असे. अन्य धर्मा गेलयां पुरुषा अनुकुळचि कार्य करीति. माहादाईसा करवि तीर्थ देवते सुवविले ।।१७५।। रागु म्हणिजे आवडि. विकाराचि उत्तरावस्ता. कामु अभिळाखु, आवडिचि उत्तर अवस्था क्रोधु क्रुर भावो. अंतःकरणी संचरोनि वोखटे बोलावें. वर्मे कर्मे तों क्रोधु. द्वेखु क्रोधुचि उत्तरावस्ता देखो न सकने. दरुसणासवे वोखटेंचि ये. कखाओ द्वेखाचि उत्तरावस्था .।।. मदु म्हणिजे उर्मि तमाचि. धनाचि. तारुन्याचि विद्येचि. साने थोर न म्हणे तो मदु. उंचेसि उपजे तो अहंकारू वेडेपण. समानेसि ते माश्चर्य. नीचेसि उपजेचिना. गुणे अ –

साहाणेपण तो मत्सर. याचि नावें संन्यास म्हणिजे पदार्थ सांडि परि हे संवे घेऊनि नीगे. हे सांडि ते होये. येऱ्हवी मागुते घेऊनि जिये जाति तव अनुसरलाचि नाही ।।१७७।। मा ।। अभिळाखु नीवर्ते. तै सुचित्व, स्नाने, दानै, तपे नव्हे तेणे अधिक असुचि होत असे. कर्मातव. अभिळाख नाहीं तो सदा सुचि ।।१७८।। अहंता म्हणिजे तादात्म्य वांचुनि नसुधा अध्यास. अहंकार उपजे, यैसे बुधि. सुखःदुख ग्राहाकत्वें. तादात्म्य करा तें अहंता. मग प्रथम उलेखु हा कंदु रसरूपता हे मुळ स्वरूपा वरि उपलखे तें. रोपु. आद्युतरें या साखा. मग याचें विरोधीनिसांती. सबंधियांचे स्नेह तरि दोख सेऊनि तोडावें. जैसे भिक्षुचे अविद्याकहीं पर तोडु नये. कां? जे मागुते प्रीति वर्तण असे .।।. जीव आवघे अधम. परि मी अधम यैसे देखे तो उत्तम. श्री दत्तात्रये प्रभु यैसे न म्हणेति. आम्ही श्री दत्तात्रये प्रभु हो. आमचे गोसावी यैसें न म्हणेति हें ईश्वरू होये. श्री प्रभु ते निर्गुण ब्रह्म. तैसे आपण यातें ज्ञात विरक्त म्हणे तो नव्हे. आपुले सोच्यतां निऊनता बोले. तोचि होये उत्तम. ।।१७९।। भातु वेळने तेथ नसुधा नमस्कारू नव्हे. ते मान्यता महतत्व पैकीचि.





व्यव्हारीची तें द्रव्यें. आपण यातें मानविजे. मान्यतेचा स्वार्थ तो किमीपिही नाहीं .।।. माथया डोळे म्हणिजे तें अहंकारे न लेखणें ।।१८०।। बा मज तुम्हा वांचुनि कोन असे यैसें जरि म्हणितलें तरि बोलोचि आदरे. हां हो. कां. म्हणौन तो, सावयाचि वोखटा. सामग्री म्हणिजे गावो, पढो, बोलो जाणणे हे व्याप्ति. मग येथचि अक्षरे दोनि च्यारि जाणिजेति. सायासि कष्टी जोडिली वेळु न लगे या काकुतव, निरर्थके बोले. येथा देसांतरि द्रव्य जोडीले. तें जुं खेळोनि धाडिलें .।।. बाहिरि घाली अभिलाखे. क्येलि मान्यता विखों ।।१८१।। जीव उपाधि क्षोभें म्हणिजे जेंचि सांगितले जाळांधरी. तेंचि सांगितले कान्हे. कान्हाचेनि क्षोभला. समाने न क्षोभे. हें काई म्हणावे असे परि अधिकें न क्षोभे. निरुपाधि उधरण. माहा वाक्य निर्वचन सांगितले आणि उपाधि स्थळ युगधर्म सांघैल. तेणे थोर सुख होये. तेणे थोरचि क्षोभें निरपाधिं विसेंखाचा प्रसादु दिधला. फटा दुटी आरति पात्र यैसा प्रसाद दे आणि उपाधिस्थुळे बारवेचा, रुवाचा प्रसाद दिधला तयाचा थोरु क्षोभू होये. तेणे थोरचि क्षोभे. निरुपाधि सुश्रृषा केली उपाधि स्थळें


श्रम निवृत्ति केलीया त्याचा थोरुचि तोखु होये, तेणे थोरचि क्षोभे. निरुपाधि सर्वस्व वेची, आणि आंगें वेचलेपणे क्रिया करी. तयाचे कांहीचि सुख नाहीं आणि उपाधि स्थुळ अल्प क्रिया करी. तेणे थोरचि सुख होये .।।. येक अनुसरला परि निरुपाधि तो भेटला. काळीं तुप, तेल, दहिं, दूध घे. येरु उपधि स्थुळ इंद्रियार्थुचि मिठ भाजी घे. परि तयाचें थोरचि सुख होये .।।. म्हणौन धर्मे क्षोभावें. उपाधि न क्षोभावे .।।. जयाचि परि निरुपाधि निरुपाधि क्षोभेना मा निरुपाधिचेनि उपाधि क्षोभैल काई? तरि आपुला ठांई कवणा गुणाचा उपाधि असे. यैसें पाहावें. मग क्रिया करावी. तैचि फावे. मी निरपाधि हा उपाधि. माझीया क्रिया हा क्षोभे ना. तरि तयाचा उपाधि झाडावा. आपुले गुणे जैसा कान्हे झाडीला. राज्य सांडविले. माणिके मोती जाता दुखविलें. कां पां? ममता तोडविली. मागुती ममता उपजली परि सीधि न वचे. यैसे करविलें जैसे भटांते गोसावी भाकेचे पोफळ मागितले तेसे जीव क्रीया सांडी. पर सांडू न, लाहे ये. यैसा चौखरी जे उपनला उल्लेखु सीधी न वचे. यैसें निबाळता करविली. मुंगीचे नि वचनें आवघी चर्या यैसीचि वि-





हिली असे. मनोधर्मु उपपति कार्य भंगो न ल्हाये. ।। तैसेचि जवळिक जेणे दयावि तेणे चौखरावें. वागारा ढीला करावा. जेणे केली जवळीक तेणेहि यैसेचि करावे. तैसाचि संगु. तैसेचि सुश्रूषा. तैसाचि भेट काळ. तैसेचि घेणे देणे. आवघे क्रिया तैसीचि कीजे. आपुली वासना भये. परि क्रिया न ठके. यैसे आपुले मन बुधि जे. तैसेचि पुढिलाचें बांधिजे. जरि पुढिला स्वातंत्रे न संडे तो तरि क्रियाचि न कीजे .।।. जीव उपाधि क्षोभे. तरिं पुढिलातें क्षोभवावे. यैसे चाड जाली. तरि सास्त्र, वैराग्य, चातुर्य, वस्त्र कापड मनुसें इतुलया भितरि जेतुले उणे. तेतुले कार्य उणें. बोधु रसें आणिकें आश्चर्य क्षोभे. तो बोधुवंतचि नव्हे. कां पां? जें ज्ञाना परतें आणिक आश्चर्यचि नाहीं. बहु रत्ने वसुंधरा तरि या ज्ञानापरतें आणिक रत्ने नाही. जैसे जयातें कामधेनु, कल्पतरू, चिंतामणी तो आणिके भोगी न क्षोभे. आणिकी वृक्षी न क्षोभे. आणिकें रत्ने न क्षोभे तैसा बोधवंतु काईसेनिहिं न क्षोभे अबुधु तो भले, तेणेही क्षोभे. निरपा


धि उपाधि मंता न सांगावे. कां पां? गोविद चंदाचया परि मारिल यैसाही सांगणे पडिले. तरि तयाचि उपाधि सांडवावी. कान्हाचिया परि आणि आपण उपाधिमंता होआवें. तरि दोसहि गुण होये? ना, तरि दोसेहि मारिती दृष्टादृष्टी ।।१८२।। उपाधि म्हणिजे येक अंतर सामग्री. येक बाहे पदार्थ ते चेतन हींसा स्थाण. यापसि तामसेंसी प्रोष्ट अथवा वर्म बोलिजे. तो मनी तापु. वांचुनि सारीरचि उपेद्रो उपजे, येथा हरि बा तेणे पिंडस्था दुख विलीया उपाधि पासुनि निरपाधि तो पात्र .।।. उपाधि मानवीला हें आपुलयाचि कनव? ना, गोसावी मानविला. म्हणौनचि अनीष्ट लागताये. जैसे प्रमादु चकऊनि अनीष्ट कपाळीं घातालें. आबुली लेंकरवे जळतें असेति तयाचें काई अनीष्ट होत असे? तरि कां मानविला? ना, तयाचियाची कणवा थोरे पात्रि जळैल. थोर अनीष्ट निफजैल हे कणव .।।. उपाधि आरोपुं आला परि गोसावीयास थोर खंती. कां मानवितु असे भजवित असे यैश्वर्याचा अंसु. स्त्रीहीन पुरुषा पासोनि समाण गुणु असतांही रुकुमिणी, श्री कुंती, श्री बाईसे, श्री भक्तु न म्हणतेचि. कां पां? वे






व्हारीचा उपाधितो ईश्वरा हे मान्य. तेंचि केवि? वेवस्ता न मोडिति. म्हणौन आणि भक्ताचे नाव सांगितलें नाही. म्हणौन श्री नुचारितिचि श्री हंस अवतारे न म्हणतेचि. उपाधिविण श्री ईश्वरी सब्द नाही. मा, जीविं काई म्हणावे असे. म्हणौन उपाधि मान्य ।।१८३।। निमित्य बोधें मा उतम. पाढें मध्यम अर्थे कनियेस. आवघयाही मान्यते पासुनि उपयोगा गेले तें थोर मानावे .।।. मानणे त्रिविध. अंतरे उपयोग. पदार्थ संपादणे. क्रिया करणे मान्यता करणें देखीलिया उठीजे. मग निमित्याचे भेद .।।. जया पासुनि वेध मार्गाचा ते प्रथम निमित्य. बोधु निमित्यि ।। स्थान निमित्य. प्रसादु निमित्य पाठु निमित्य. अर्थ निमित्य. वित्पनेति निमित्य. लीळा स्मरणी निमित्य. अनिष्ट घडोंचि नेदि. घडले तें परिहरि तें निमित्य. इष्ट घडवि तें निमित्य अवीधि घडो नेदी. घडले परिहरी तें निमित्य. वीधि स्फुरवि, तें, निमित्य. अनाधिकार येवो नेदी. आला फेडी तें निमित्य. अधिकार आणिते निमित्य. अयोग्यता निफजो नेदी. निफजले नासें तें निमित्य. योग्यता घडवि तें निमित. अदक्षता निफजोनेदि. निफण


ली फेडि तें निमित्य. दक्षता करी ते निमित्य. दुख निवृति करी तें निमित्य सुख प्राप्ति करी ते निमित्य. त्याग, निमित्य. संगुं निमित्य. निर्वेदु अनुतापु अनुसोचु, आर्ति निमित्य. नित्य नरक मुक्षु सकळ नरकु चुकवावया निमित्य. देह विद्या मुक्ष सकळ विधा निमित्य. सकळ फळां निमित्य. पुनः संबंधा अपरोक्षा निमित्य. प्रेमासि निमित्य. येतुले उपकारू जया पासुनि वेधु जाला तयाचेनि प्रसादे. जैसें मुळाधिकारू कारण सांब्दासिं. साब्द कारण अपरोक्षासि. अपरोक्ष कारण सामान्यासि. सामान्य विसेखासि, विसेख प्राप्तिसि तेंसें उत्तरोत्तर निमित्य परंपरा असे. जैसे श्री दत्तात्रय प्रभु आदि कारण तैसे आवघया गोमटे या वेधु कारण. ये निमित्त इतुले उपकारू येकाचि पासुनि होति. यैसें आति. अथवा येकयेका पासुनि येक येक आति. यैसें आति. तरि जया पासुनि जेतुला उपयोग तो विसरावा नाही. तो अखंड आठवावा. त्यासि आपण या परि विपरित बुधि येवो नेदावी. आपणयांसि तयावरि येवो नेदावी. अनुकुळ बुधि येकामेकां वरिल न वचे. यैसे वर्तावें. निमित्याचेंनिमित्य ते मानावें






निमित्य मानिजे. अप्राप्ति नैमित्यकें, दुखें कर्माचीया रासि नासेति. देमती तुम्हा निमित्य लागते. यें निमित्य वीधिची साधकें निमित्यचें देंह गेलया झाडाबुडील. अनुसरला अव्हेरिला. रक्षण सरले म्हणौन रक्षण कुपकांटी. वैराग्य काई करावें म्हणिजे ज्ञानेविन ज्ञान असता काढीची ना. येणे न्यायें, देह जाये वेगांचि तरि स्वीकरीजैल. करणीये न करी तै उपेखावी कीं. देह नुरोऊनि करणीये. अज्ञानें ठाकावें हें आति ना, म्हणौन स्वीकरिती. निमित्य कां म्हणिजे तयाचया कडेनि कांहीचि नाहीं. ईश्वरेंचि केले. तेणे विकारु केला निरुपे विण ।।१८४।। परमेश्वर हे उचित नाव कां? तयाचा तोचि संनि तऱ्हे धानि तऱ्हें हेंचि. वचन रूप वांचुनि वेच नसुधि मुर्ति नव्हे. ईश्वर मग तेणें सांगितला आणिक तो भजन तें आगें, जीवें सेवा काहीं, सांगणे नाहीं. ते उचित सेवाचि करावी. ते न स्वीकरिती तरि सांडावी. सांघत याचा ठाई तैसें उचित करू नये. तेथ पुसौनिचि करावे. संबंध तो प्रसादु येर नव्हे. जीवा संबंधु जाला तो फळा नेला. प्रपंच असे तव देवता असे, अपरोक्ष ज्ञानिये देखेति, पदार्थाचि व्यक्ति न भंग, तव प्रसादु वस्त्र


जाळीनलें. व्यक्ति सरली, पदार्थ असोनि व्यक्ती असे. विवर्णता ये. यैसा प्रसादत्व वंद्य म्हणिजे जयाचियें ठाऊनि दंडवत पर्यन्त, वरौता तो भावो .।।. मनें वाचा हातें साष्टांग तें उत्तम ।।१८५।। संबंधु म्हणिजे संयोग लक्षण ओटे म्हणिजेति. उपयोगा गेले जेतुके अवस्थान. स्थाने सुयेन, आसन मग पांचा इंद्रियांची सेवा. गोटे म्हणिजेति. चालता श्री चरणे श्री करे स्पर्श मात्रे तेथही येकी परिचि सेवा .।।. संबंधें पवित्रता आली म्हणौन वंद्य. भक्तेचेनि अंसे. आणि मायां कृपा उभये सक्तीचा निक्षेपु. प्रसंनता तो प्रसादु, विसेख स्थाने माया प्रधान. अंगु कृपा. देमती कैसी डावलीली म्हणिजे थोरे सांगितले. जडा पसिचेतन थोर. ज्ञानहा अंसु ईश्वरीचा तो जेथ ते सावया थोर. भटीं पंचाळेस्वरू डावलणे, तो दोखु नाही. परि स्फुर्ति नाही तो दोखु. स्थाने देखत क्षेवो दंडवत घाली. तरि मान्यता होये. भावो होये. दुरुनि मानिलयां गहनता होये जवळीके गेलया अनुरागु उपजे. स्थाना दुरुनि दंडवत घालीजे. भावो आणि मान्यता णसतां अनुरागचि उपजे ।।छ।। भिक्षु मात्रा भेटावें. स्थान मात्रा पाहावें. येऱ्हवी योग्यता उणी. तिये तीये वारि





चि अवज्ञा येक देसी मानुसाचा ठाई अव्हेरण हे व्याप्ति. जडाचांही ठाई हें धर्म ये. मग याचां ठाई जो असे धर्म, तयाचे अव्हेरण. आता नसुधें धर्माचेंचि अव्हेरण. अर्थ आइकीला, अथवा स्थान भेटलें, तै तेथचीया गोष्टी किजेति. तैं तुष्टी पुष्टी होति आणि अव्हेरण चुके हें नीरर्थक. डोळयां अधिकारू अनधिकारू पाहाति. चरण न पांत देताति. चरणाचें दिधले रोकडें. नेत्रांचे दिधले अंतराओ होत असे .।।. निरुपण होत असे. आणि कार्या उचिते गेला तरि अव्हेरणाचा दोख न संडे. गोमटे न घडे. आपुलेया कार्या गेला तें अनुचित ।।१८६।। वासनिक हें परंपरा येत असे. मा, काई श्री मुखेचें की नव्हे ते, नेणिजे, अनीष्ट सेवा पोळे तो वासनिक येर ज्ञानिया, येक बोधुवंत, येक भक्त जैसा आऊसांचा हरि. जैसे म्हाळ उपसहाति. तया पसि नावे अधिक. तयाचें ग्राह्य. येकाचै घेतलया हे योग्यता. येकाचेनि अनीष्ट चुकलें, येकाचेनि अनीष्ट जाले परि उपसाहाति. येकाचेनि अनीष्टचि हें च्यारि भेद ।। मा. ।। वासनिक;

ज्ञानिया, बोधिवंत, भक्त हा येकु पक्ष. दुसरे घेतया सुख, नेसतलया दुख, तयाचेनि योग्यता. ने घटल्या दुख, तयाचेनि अनीष्ट चुकले. घेतलया सुख तयाचेनि उपसाहीति. दोन्हे नाही. तयाचेनि अनीष्ट ।।छ।। भटाचेनि भेटी पद्मनाभि देवाचें तेसने अनीष्ट चुकलें. तें भटांसि गोमटे जालें. म्हणौन नामधरकाचेया भेटी अनुसरलासि गोमटे होये. परि देखीजे ना. तैल्यकारू बाहिरि काढिला. तयांसि थोर गोमटें जालें. तयाचें अनुसरण भंगे यैसे अनीष्ट घडेचिना. येद्येपि घडले तरि परिहरे यैसा वीधि घडे. ना, प्रमाधदु घडला तरि देह विद्या होये. देह विद्या नव्हे तरि नित्य नरक चुकेति. सकळ विद्याचे अधिकारू निफजेति. चैतन्य विद्या आदि करूनि सकळ फळें लीळा दान ग्रहणा दाने देति. संबंधु दाने देति. मातृत्व पितृत्व स्वीकरीति. दर्सण बोलाऊ बोलाऊ गिंवसु गिंवसु देति. सनिधान देति. भजन स्वीकरीति. सेवा स्वीकरीति. निरुपण आइकों देति. मार्गु वेधु देति. तेणे चौकडी चुके कृत युगीं ज–






न्म होये. कर्म वसें मुस्य (मनुस्य) देह पातला. तया अनीष्ट घडावे यैसी क्रिया निफनलीचि चुकविति. जैसे पद्मनाभि देवाचें चुकविले. भटांचिया भेटी. नरक उपस्थीत जाले असेति. ते दर्सणें सनिधानें भजनें सेवा दास्यें निरुपणे नासीति. येणेचि अपुर्व निफजो नेदेति. मनुस्य देहीचें प्रेत देह आरोगण स्वीकरुनि चुकविति. जैसे तिकोपाध्याचे चुकविलें श्री प्रभु अवतार दवडुनि स्वीकरीति. तेणें अनता जन्मीचें ऊतटितां प्राणपदिचें दुख होये. तें चुकविति. आणि गोमटें देति. मासोपुवासिणीचिया परिचारिका भटा नाथोबाचें ऊसिटें वाणें खादलीं. तेणें महंत श्रेय जाले. यैसे गोंमटयाचि टेळी रुडविति आणि वोखटें चुकविति थोर साह्य करि. प्रमादु चुकविति. ते सृष्टी कपाळी न पडें यैसे करीति म्हणौन प्राणीयातें अपर धर्मा पासुनि काढिजे. परधर्मे लाविजे. जेतकी गोमटे क्रिया जीव करी तेतुकें थोरचि गोमटे होये. जेतुकी वोखटे क्रिया करी तेतुके थोरचि वोखटे होये.


यैसें सृष्टी करीति पुढिले सृष्टि अधिकारू अडरुनि ज्ञान देति दे ।।छ।। वासनिके म्हणितलया आपुली अपक्षे नीराकरावे. यैसे सब्दु निरा बोलावे, वांचुनि तयाचया सब्देच निराकरण होये, ऐसे न बोलावे ।।१८७।। प्रीति आपुलयासि प्रिये भाखाण (भाषण) आणिकासी वाट पुसणा, कवणी कडुनि येणे, नदी उतार पुसणे देंवा नैवेद पुजा बांधणे उपयोगा न वचावें. आणि प्रिये बोलावे. कां? आपुलयाचेनि निमिते पुढील न जळावा. जयाचि परि आपण वोखटे नेदेणे. तयाचि परि आपुले याचेनि निमितें वोखटे न घडावे .।।. प्रिय कां बोलावे? ना, उदास पडैल. अवज्ञा होईल. तयाचा गुण न ये. दोख येईल. ईश्वरीचा दोंख येईल जे साधन ईश्वर पर्यन्त तेथचि गोडी काढैल. अवज्ञा तोंड मुरडणें. म्हणिजे न करणे. उचित त्यागु, उचित भिक्षा, उचित क्रिया करितां सुख होआवे तें नव्हे तो ईश्वरोचिन मनिला होत असे. वरि दोंखुं घे. काईसा त्यागु, काईसे वैराग्य, काईसी चर्या मग ईश्वरीचा दोखु येईल. लखुबाईसें म्हणेति गोसावियाचे जाणितलें. नव्हे यैसे दोखु येवो लागेति म्हणौन येणे भलतेणेसी प्रियै बोलावे. आपुलेनिसी अथवा उदासेसीं पुढिला माने. आणि वासने अनुरूपु सु-






ख पडे, यैसे बोलीजे तें प्रिये. येथा पंच गंगा, गौरऊनि आवडे ये प्रिये. ।।१८८।। संबंधे क्रीया येथार्थे वर्तिजे तें सत्य. पदार्थु आपजवणें पुढीला, तरि लागे तो मागावा. आपणया लागि, अथवा बहुता लागी परि सत्यचि मागावा. म्हणिते ईश्वरू साह्य, इतरेंसी सत्य. मा, येथ काई म्हणावें असे. सत्य तेने निराभिळाखी यें. येथार्थे यैसेचि बोलावें. येरासीं लटिक बोलीजे तैंचि गुण. असक्त अप्रेत्नेया, वासनेचा तामसु तेणेसी लटिकें बोलीलया दोखु नाही. लटिके परि सत्य सारीखें बोलावे. उपलखे यैसे ना. येऱ्हवी अन्यथात्व येईल. आर्जव म्हणिजे अतरे भावो, आंगे अनुकरण, सब्दे गौरव. हे मा. ।। आर्जव येथा पुत्र ताते. गोसावी अर्जिलें सब्दें आणि कार्ये येणें दृष्टा दृष्टी दोख चुके ।।१८९।। येका प्रयोजना लागि लटिके बोलिजें. तरि तिये काळी साच माने. परि तयाचा प्रसऊ उतर काळीं दोनि च्यारि लटिकी कपाळी पडेति. येक बोलावे, जैसें येका दसी स्नानादिक. लटिके बोलीलया दृष्टा दृष्टी दोखु भक्ताचा ब्राह्मण. धांदुल मोक्षु कापूस चारनेरीं मार्कंडा खड -


कुलीये प्रमाण. येथा पडदनी प्रकास. डोबें ग्रामी मंडंकादि गोपनि निवा सा लाडु. उर्णपटान येनीं. काळ बोटा चुने पिटनी अनृत्य णिखेदु. मढ पिंपळगावीं आनो त्यागु प्रसंसा. प्रतारकु बासियेचा दृष्टांत, इसाळुवाचा दृष्टांतु बाई येथ लटिके बोलिलया जे वोखटें. येथ म्हणिजे ईश्वरी मग येथार्थे भिक्षु वासनिक हांसता म्हणिजे राभसेही ना. येणे ईश्वरा खंति, जया प्रति बोलेत्या खंती ।।१९०।। तुम्हा म्हणिजे अनुसरलया. माहारोगु येका दुख तरि बहुत नाही परि चिरकाळु. येथा क्षेवो, कुष्टु, पंडु, जाळोदर. येका काळ तोकडा, परि दुख बहुत. जैसा दाढ सांखळ. अनुसरलयाचें दुख वारिले तो जव जीयें तवं ईश्वरे हा दावो दिधला ।।१९१।। महात्मा म्हणिजे आया बापो न करी, दुःख साहाणें, नीमाणणे याचि नावे माहात्मा. अपराधें तरि लेप पुसणा ना. असिलयां काई करीत असे. सकळ म्हणिजे सारिर मानसीक. माहात्मा म्हणिजे थोर. सकळ म्हणिजे रज वासना, मानसिक सुखदुख भोगें जे पातलें तें साहावें. काकुळति आया बापू न करावें. निमांनावे म्हणिजे उपाओ न करीता सरो द्यावें. साहावें तरि तेतुले भोगु सरे.





अनुसरे ना तरि साहातां अदृष्टासि कनव उपजे. उणे होये अथवा तेनेचि निमित्ये गेलें तरि साहिले म्हणौन कनव उरे योग्यता होये तेणें अणिकी क्रिये दक्षु होये. माझेनि अपराधें आलें, मा दोखु कवणाचा घेओवो. यैसे म्हणौन साहोये. ना उपाओ करी. तरि अधिकचिं होये. वीचंबे. आलें तो अपराधु उपाओ करी तो दुसरा .।।. साह्याचि वाट न पाहे तो उत्तम. भीतरि माने तो माध्यम. पाहेतो कनियेस ।।१९२।। कव्हणी येकु म्हणिजे लोके पुसिलया सांगावे. येऱ्हवी आणिक आणिले. हिरडा म्हणिजे साने भिक्षान खाओ ये. यैसे, न साहावे काकुळति येईल. तरि अज्ञा दिधली. कोण जाणे अदृष्टें धाडिलें. की अनुकुळा धाडिलें. घे रोगु उणा होये अदृष्टाचे म्हणिजे केलयां योग्यता होये. कव्हणी दे तरि ना न म्हणीजे. आपण उदिमु विसेख न करावा. कांजे कोणी ओख (औषध) दें. कोण रोगु जाईल तें नेणिजे? ना अविभचार्ये सवेचें अनवत ते सेवावें. दैवं व मादिक तेंहि पर अविभचार्ये उचित नव्हे. येथा प्रश्रामबा.


लासु ने दितीचि. अपराधें असक्ति आपजविली ते सुश्रषा अथवा श्रम निवृत्ति. करवी. तया थोर दोख करि तया गुणे परि आपुला आणि पुडिलाहि होआवे. धातुगता रोगा औखद प्रमाणुं कवीश्वर पक्ष. औखद नेअटां (न घेतां) गुणु आति. घेतलयां दोख नाही. ।।१९३।। आपुला म्हणिजे गोत्रिय. पडिला म्हणिजे सारिरें मानसिकें अडिला. उत्तम, मध्यम, कनियेस. सुश्रृषा म्हणिजे परचर्या कीजे म्हणिजे प्रीति मनोधर्मे विहीत म्हणौन कां? दास्य कीं मी करेन, मातेनि होईल. यैसा अहंभावो ना. येथा चाटसी. याप्य (व्याप्य) दोंखीं सुश्रृषा न लभे. कांजें पडिलयाचा विसेखु. येर ते दिसाचें बोलणें. सुश्रृषे, श्रमनिवृति पवाड नाहीं. दुख करावें. थोर गोमटे .।।. हींसा करणे पडिली तरि कुसळता होआवी. च्यारि लाहाणे पाने तोडावी. तें, येक थोर पान तोडावें. हें उहीपुही जाणावे. दुसरे अनधि कार्या करवी, तोडवावें लेकरु अथवा वेडे पिसें. कां पां? लेपु न लगे. तिये आतिचे वोखटें उणे होये. अथवा कर्म भूमी बाहिरी हींसा करविजे. येथा कोंकण ।।१९४।। पचन म्हणिजे आपण कीजे. पाचन म्हणिजे आणिका करवी करविजे. येथा येजन, याजन भिक्षेचे मि–






ळे तवं आपण न कीजे. अथवा पुढिला करितें असे, तरि न कीजे अडणी तरि कीजे. दोखु नाही, गुणचि होये .।।. अणिकाचिया हेतु पचन केलें. तें आईतें अन ईश्वरें स्वीकरीलें परि हींसा जाली. आणि पऱ्हीवयाची नाही न स्वीकरीताही हेतु केले म्हणौन दुख दानि नव्हेति. आणि सुखा लागौनि चहु दानी कृपा मोकलुनि घातली तावणि केले. हेति व्याप्ति. संते आर्जित भिक्षा मागुविली. येणे करूनि पचन वारिले. लागे ते मागावे. उमुपवारिले .।।. भिक्षा मागविली तरि पचन कां करावें? ना, न करावें. यैसाचि वीधि पर कीजतायेते प्रीति तरि. आपणया लागि करीवितु असे. तेणे करावें. तरि किती दि सुवावें? जव घेत सुआवें. नेघे हा तयाचा कड. घेतव सुदुलयां गोमटेंचि होईल? ना, विधि सांडिलेनसीं कैसा विधि करावा? ना, टिळा जाणिवे हा काई वीधि. परि यैसे नसेचि विधान कीजत असिजे ।।९५।। आपणया पसि ज्ञात विरक्ताचा संगु कीजे. विरक्त म्हणितलेंया ज्ञात अर्थ सिधि होये. आपण या पसि म्हणिजे येका गुणा कारणे येकाचा संगु कीजे. मग दुसरया गुणा कारणे दुसरयाचा संगु कीजे.


येळापुरीं जैसे बाइसीं उपाध्यातें हाटा धाडिले. ते वेळी तेणे म्हणिये करविली तैसे येका गुणा लागि आवघयांचा संगु करावा. यैसे नव्हे. संपूर्ण ज्ञात आणि संपुर्ण विरक्त ज्ञानियाचा सांगात करविला. आपणया पसि येके गुणे आगळा तयाचेनि संगें असतां आपुले दोखु दृढ होति. जरठ होती. आणि जयाचेनि सांगाते असे. जे तेतलयाचिही निलळता उपजे आणि विपरित बुधिये. प्रीति धर्म काढे आणि पुण येता बहुतर काळ लागे. आणि संपूर्णाचेनि सांगाते असता येकु गुणु येतां जेतुका काळ लागे. तेतुकेनिचि काळे बहुत गुण येति आणि दोख झडेति. अधिक प्रीति धर्मु वाढें जैसे भटाचें देऊळ पाहाणें आवघा भक्त जनें बहुंतरें काळे येकचि म्हणीये केलें. पर संपूर्ण नव्हेचि. तें भटें तोकडे नि काळें बहुत म्हणी येकेले. आणि आपुलीया स्फुर्ती आणि गोसावीयाचिया विप्तति आणिकही स्फुरलें. तेही म्हणीये न संगता. तैसे संपूर्ण ज्ञाता विरक्ताचा सांगातु जैसा पाणिचोर याचा दृष्टांत वरील द्वार धरेलयां आवघे द्वारें धरिलें होति. तैसे संपूर्ण ज्ञाता, विरक्ताचेनि सांगातें असतां आवघे सांगातु केले होति.






अल्पे काळे आवघे गुण येति .।।. निर्वेधी ज्ञाता विरक्ताचा सांगात, तो जैसा चालतया बोलतया देवाचे सनिधान दुर्लभ. जैसे म्हाइंभटे श्री प्रभुचें सनिधान केले. पर आमुचा गोसावी चरितार्थ करू म्हणितले. येका गुणा कारणे येकाचा सांगात कीजे आपणया पसि विरक्ताचा. परि सांगात चरितार्थ तै होये. जे निरूपका विरक्ताचा सांगात कीजे. सोळा वरिखे भांडारेकारा सनिधान परि अपरोक्षासि योग्य नव्हतिचि. जैसें परि सहश्र वरिखांतु येक दोनिसें उणे. येतुलयां असतां येक दो अर्जुन देव अपरोक्षा योग्य नव्हतीचि अनेगें वेसने तेथें म्हणौन तरि येक अवतारीं अनेगें वेसने तया अवताराचेनि अपरोक्षा योग्य नव्हतीचि. तरि जया ज्ञात विरक्ता अनेगे वेसनें. तयाचेनि सांगाते, भेटी धर्म सिधी नव्हे. हे काई असे तयाचिया भेटी न मैळिजे हाचि लाभ. तरि मैळजे ना. हे काईसया तव. निर्वेद दुख असे तरि मैळिजे. नाही तरि मैळिजे उधरावयायेचि वेसन आमुचया गोसाविया परि भांडारेकार अपरोक्षासि योग्य नव्हतिचि. तै गोसावी उदास तान्हैलयां पा

णी पेवो न मगति. चालता बोलता देवो परि भांडारेकारा अवरदृष्या परदृष्या मुंका पिसा वेडा जाला. वैराग्याचि प्रवृत्ति म्हणौन आणि भट आठवु वरिखां अपरोक्षा योग्य जाले. तैं ईश्वरु चालता बोलता आणि उधरावयाचें वेसन प्रकटीलें. तैसे संपूर्ण ज्ञाता. विरक्ताचेनि सांगातें असतां तोकडेनिचि काळें योग्यता दक्षता होये. अनीष्ट सांडावया आणि इष्ट धरावया. जैसा अपरोक्ष ज्ञानिया संनिधानिं, अल्प काळें. तोकडेनि बहुत क्षाळी. तैसें पूर्ण ज्ञाता विरक्ताचेनि सांगाते असता तोकडेनिचि काळें आवघें दोख जाति. आणि आवघेचि गुण येति. तरि आपणया पसि कां? ना, असंभवीं जवं संपूर्ण ज्ञात आणि संपूर्ण विरक्त भेटे तवं. आणि आपणया पसि म्हणिजे हीनाचेनि सांगाते नसावे. हे काई म्हणावे असे परि समानाचेनि नसावे. कां पां? उपणली वासना अनुचीत ते सिधी जाये. परि प्रतिबंधे ना. वासना दाटे ना. मग प्रकृति काई दाटैल? म्हणौन हीनांचा सांगात करू नये. मैळीजैल देवोंये हीण म्हणौन करीतु असे आणि चाड असे. म्हणौन ।।छ।। अवस्ते अनुरूप धर्म अनुष्टी






काहींचि ठावो नेदी. पाये न पसरी. भिक्षु हो अथवा वासनिकु हो. यैसयाचा संगु जवळीक करावी. पाये पसरील तयाचा संगु जवळीक न कीजे. येकही वचन अनुस्टी ना. अथवा अनुसरलीचिना. नीर्वेधु अनुतापु, अनुसोच, आर्ति नाही तो भिक्षु नव्हे. तो वासनिक नव्हे. या बोधुवंतु नव्हे. तो डावलं नव्हे. येतुलेचि विधान जवळीके संगा योग्य नव्हति. ।।१९६।। परोवृतिये तें साहें. अपरोवर्तणीये ते धरू. जो जेतुलेनि विन ठेला, तया तेतुला आधार, सास्त्र, प्रसादु, चर्या, धरे दयावी. धर्मासि कीं? धर्म नाही तरि त्येजावा आणि गुणी तेजावा. कोणे स्वीकरावा? ना, आनिकाची झाडी पुसि करीत असे. ज्ञान करावें. येकु दोनि. तीनी वेळ म्हणिजे न करी मग तेजावा. दादयांचि धर्म रूपा बांई यांची झाडी पुसी करी. ममता सांडुनि तऱ्ही प्रीत रूप दिसे सुरजपण अन्य वार्ता करवे येकु उपसाहाण यात ईश्वरू उपसाहाति तेतुले आन ऊपसाहावे. स्त्रियांचि झाडी पुसि करी तरि तेजावा. तम गेला असे. तापोनि सांडी रजें गेला असे भलेतसने आंगवि. गोडि असे म्हणौन

तमें जळे तेहि सांडी ।।छ।। संगु देयावा तो गडबडीतु असे. तरि आणिक? या उपेक्षु नये. जेतुलेनि ईश्वरू उपेक्षेति, तेतुलेनि आपण उरखावा. देह सरजुं बाईयांचि झाडि पुसि करीतु असे. तो दोखु फेडावा ।।छ।। निमित्ये विद्यमान श्रेष्ठ असतां सानेयाचि जवळीक का करीति. सोहोपेपणे सवे तव सलगी. झाडीपुसी लागि, उआयें असावया. येतुला दोखु तरि अनीष्ट असे. सास्त्राचे अव्हेरण होये? ना, तेथ हींसा करणे पडें. कां विखा सेवणें पडे तरि तेथ नसिजे ।।छ।। बारा वरिखें परिक्षा सात्विकाची पाहावी. रजस्तमे न बधीतीचि. तरि आवुघया सास्त्राचा झाडा देयीजे. येऱ्हवी जेतुलेनि ईश्वरू होय तेतुले बोलावे. नव वरिखे तामसाचि परक्षा पाहावी. परीक्ष उतरला तया आवघेचि बोलावे. येरवि धर्म रूप तें बोलावें. सा, वरिखें तामसाचि परिक्षा पाहावी. अनुसरण न भंगें तरि सकळही बोलावे? ना, तरि निस्तरे तेतुलेचि बोलावे. बारा वरिखे परिक्षा पाहे तो उतमु. नव वरिखे परक्षा पाहेतो मध्यम. सा वरिखे पाहे तो कनियेस. तीनी वरुखें पाहे तो दर्या चौथा पक्षु. तीनी वरिखे परक्षा न पाहात सांगेणे




एच-५८३
९






तो अधमु. तेणें मोदळ याचा दृष्टांत साच केला, ईश्वरीचें भांडार फोडिलें. भेट काळीं बारा पानिवळी परक्षे उतरला. रज स्तमें न दिसति तया दीं विभाग करावा. बारा घडिया परक्षे उतरला तरि दुसरा दीं विभाग ण करावा. बारा पाहार परक्षे उतरला तरि पांचवां दीं भेटी घेयावे मग विभागु करावा. आग्रहो करूनि राहावी. तरि मागुति. बारा पाहार परक्षा पाहावी. रज स्तमें न बधति तरि आणिक पांच दीं भेटी घेयावे. मग विभागु करावा आग्रहो करी, तरि राहावे. पुडती परक्षे उतरला तरि आणिक पांच दीं भेटी घेआवें. कां? तैसेचि बारा दिं परक्षे उतरला. रज स्तमें न बधति. तरि दीड मासु सांगात घेआवा. मग विभागु करिता. काकुळति करीते. तरि पुडती बारा दीसु परिक्षा पाहुनि आणिक दीढ मासु घेआवा. तयाचि परि आणिक दीड मांस परक्षा पाहुनी, उत्तम, मध्यम, कनियेस दर्या यैसे सा, मास सांघात देआवा. बारा वरिखा बारा दिसां अधिकार्या बारा वरिखा प्रेम संचारासि अधिकार्या बारा वरिखा पुनः सं –


बंधासि अधिकार्या. बारा वरिखे परक्षे उतरला. रज स्तमे न बधिति तरि सास्त्राचे असेख विसेख सांघावे. परक्षे नुतरे आणि सास्त्र सांधितले तरि त्या करवि वीकवीले आंबटीये मीठा भाजीयासाठीं रांधवणीयेचिया परी. सास्त्र, धर्म, प्रसाद भाडें ठेविला. विखया कारणे बारा वरिखें संपूर्ण जवळीकेचि परक्षा. बारा मासा जवळीक द्यावयाचि परक्षा बारा दींसा संगाची परक्षा. बारा पाहारा सुश्रृषा करू देयाचयाचि परक्षा. आणिक करावयाची परक्षा. बारा घडिया भेटीचि परक्षा, घेयावया कां देयावयाचि परक्षा. बारा पाणी वळयां तो दिसु तयाचेनि समागमे. तेथ वस्ति घालावयाचि परक्षा. रज स्तमे न दिसति? आणि दोख न दीसे तरि वरिल संर्गु कीजे. येऱ्हवी विभागु कीजे ।।१९७।। आर्ति म्हणिजे चाड जया अर्थाचि जयासि, पर योग्य होआवा. तेव्हेळीसिचि करीतों योग्य चाड नाहीं तरि अनुसरलयाही न बोलावें. मग वासनिकाहिं बोधा न करी तरि कीती बोलावे पा? अनीष्ट जण करें न पुसतांही, इष्ट जन करें, पुसता. योग्यता जन करें पुसिलयांही न बोलावें. नीषेधे ठाऊनि कणु कणु भंगुनि काढावें.






तें इष्ट संपादकचि. तेतुले बोलावें ।।छ।। प्रकृति साद्रव, उदार, उमट पर, येसणें यैसे दीसे. तयासि धर्म बोलावा. ईश्वर आणिक अनधिकार नसावे आणि अधिकार होआवे .।।. अन्यथा ज्ञान पुसतां फेडावें. अज्ञान पुसिलयां फेडावें. संदेहो तो पुसिलयाहिं न संगावा. योग्यता जालयाविण तेचि योग्यता कवणी रजस्तमी विरहीत जाला ज्ञान जारठ्य जालें. चर्या दृढति जाली, तेव्हळी आवघेंचि बोलावें ।।छ।। पुढील आपणयांतें संदेहाचा निर्वचु पुसे, तरि थोरीया न बोलीजे. परि जें म्हणत असातें तवं नव्हेचि ईश्वर कैसें होये तें नेणिजे हेंही अर्ध सांघितलेचि. अन्यथा ज्ञान निवर्तोनि अज्ञान केला तो तवं नीका. दुसरे अनीष्टा पासुनि काढिला. तिसरें विख सांडीविलें. अन्यथा ज्ञान तें मारितें. येथा दादवत दोरावति जेणें सर्प बुधि उपजविली तेणें मारिल की? तें माहा पाप .।।. उत्कंठा रजस्तम पातळपण येकि सवे येक प्रेत्ने साहे. येकि प्रार्थना ।।१९४।। सकळ पदार्था आंतलें जियें उदके, तियें येक उपाये निगेति. दगडांचेही निगे पर लो


हाचे न निगे. पुसिलया नणे म्हणिजे जाणे यैसे संभावना तरि विसरलां मनण नाहीं. म्हणितले ।।१९९।। रज स्तमी अभिभुत तो तेंचि बोलेंल. तेथ तीन प्रकार. तेणे भलैतेंचि बोलिलें. पर तया येथार्थचिं फळी यावे. येक ईश्वरू उमटविति. येक तिये अवसरें तयाचिये मुखनि तैसेचि निगे .।।. दुसरा वचनार्थ जया जेथ भरू. येका येकांकी येका येंकुचि वेळ जेवण. येकां भावो आर्ति येवं मादिक. परि अन्यथार्थ न बोले. तेथ तीनी प्रकारू. येक ईश्वरू उमटविति, येक आचरतां विचारे, हे साने अर्थ भलेतया विचारेति आणि म्हणितलें विपरीत जालयां दोखु नाही. कां? तो निरुपिता काई उपेक्षिला. मग तया दोखु ।।२००।। कांटयाचया पेट्यावरि म्हणिजे जीव दुखी, सुख माने. थोर, लाभु सांडुनि मां सांनया टेंके. सनिधान वियोगु तें सुख माने, दुख नाही. परमेश्वरे विण कैसे जीणे हें न मनी. मा, स्थाना प्रसांदा टेंके. हे. मा. ।।छ।। आचारीं कैसे विखये व्येवस्ता करावी पां? जें पुढिलाचा दोखिं दोनि नीद्रा स्थाने भाजणें विजणे असातां येके उतम नव्हे. तेंण स्वीकरी यैसे ।।छ।। इतुकीयासि काई? आतांच्या वेळ ऐसे जालें यैसे न म्हणावें. यथा छ–






र्दीतान्नवत ।।छ।। पेटेया वरि विखये व्येवस्था करी तरि पुढिलाचे गुणु काढावे. मग यां दोखां पासौनि आपणेयांतें का सोडवावें. विखये व्येवस्था करावी. अविद्या पैकीचि विखये व्येवस्था करावी. तेथचे दोखु काढावे. ।।२०१।। ईश्वर बोधें बोधवंतु म्हणिजे ज्ञानेसिंवंतत्व पाटला हाचि तंवं विसेखु. ईश्वरे वियोगे विदेसिं जन्म क्षेपी हा दुसरा. मग भिक्षा करीतां अंतर पडैल म्हणौन कर्दीतान्न मिनलें तरि तेंचि भक्षण करी. येसना घृणा त्यागु हा तिसरा. यैसें जें होते ते सांगितलें. यवं पर्यन्त म्हणिजे सेवटु मळिनत्वाचा सांघितला ।।छ।। ईश्वर बोधें कां गोसावीयांची श्रधा भावो तैसेंचि येराचि दुख विपरीत देस, त्यागु केलेयां गोमटें पर सेवटीं निरोपे विण केलें गावांतु जाये. कोन्हा येका वमने आतां देसाचि सेवटीनि कृत निश्चये यो केला. मग गांवों माहात्मा गोसावीया पासि बैसावें. बाह्य देखौनि गोमटे उजळे तयातें पुरस्करीति. यैसा कीं हा अर्थ तुं जाणसी. मज से देहो आतां कोनातें तें सोधिन. काही बोलपां, जैसे आठवत असे तैसे बोल पां येक पाठु आधिला पसि .।।. छर्दितान्न दिधले यांतु नव्हे सुइनीसी पाटाऊ

नेसावया ।।२०२।। उजळलेयांचे भेदु आपणेया आपण तो उतम, निरुपणे तो मध्यम आणिकाते देखैनि तो कनियेस. निमित्या पगमु तो चौथा पक्ष. येक वीधि करीतां दुसरा ठाके. तेयाचि खिंति करी. घडलेया वीधिचा तोख वोखटें गोमटे. दोन्हीं देखे तो उजळला. येथा डोळेवत. उजळे जयाचेनि तो साद्रव होआवा. का जें द्रव्यें पदार्था वांचौनि चोखट नव्हे कीं ।।छ।। सत्वेहीं पुरुष मैळे. यांतु तयाचे मैळेपण साने नव्हे. तें, थोर पर, बहंतरें काळें प्रसौनि होये. तवं तो ऊरेना. आधिं उजळले. तैलकारा बोलों आदरिलें तेणे अंतःकरणी भरे, सात्विक प्रकटे. निर्वेदु दुखा उपजे तथा वीद बोलें. अद आणि रे बोले तैसेयां बालावें ।।छ।। आपणंयां पदार्थाचि चाड नाहीं. पुढीलासि नाही. भेटीकाळी, सर्वज्ञ म्हणितलें पुढिलाचि संपादिजे. पुढील आपणेया विण खाये. मग आपण खाईजे, तो उत्तमु गुणु होये. तेणेचि क्रमें पुढील आपणया संपादी तो आण मीळौनि खाईजे. हा मध्यमु पक्षु कां, पां? आपुले पर्यावसा नव्हेचि. म्हणौन पुढीलासि पदार्थ खावेचिं चढ उपणली पण भिक्षु विन न खायें. तरि आपण पदार्थ मेळऊनि तयासि संपादीजे.





आपण खाईजे हा कनियेस पक्ष. कां पां? पदार्थ परियावसान जाला परि भेटकाळ नव्हे. म्हणौन अनुसरलयासि पदार्थ सेवावा यैसी बुधि उपनली. तरि निमित्यापगमु पाडिजे. पदार्थ संपादिजे ना. कां, पां? मैळेल तरि जाईल तरि आपणे या निमित्य लागैल. म्हणौन निर्वेद उपजे यैसे कीजे दुखु आर्ति उपजे. यैसे कीजे. या परि उजळीजे. तेलीयाचेनि न्याये तेने दिसात पाचवा पदार्थ खावावा नाहीं. येसने पात्र हा इतुले दीस मी या खादला. आता या करवि खाववु. यैसें नुपजेचि म्हणौन ।।छ।। मैळला उजळलयातें मैळे. केवि? विखयाचें येकासन निराकरीलें. गोसावी जो जेतुला मैळला असे तो तेतुला उजळलयातें मैळे. हांसत या सरीसें हासावे यैसे उपजे. बोलते या सरिसें बोलावे, तैसे उपजे. खातेया सरिसे खावे यैसे उपजे. निजतेया सरिसे निजावे यैसे उपजे. म्हणौन येकलयां, न सववे तरि आपणयापसि विरक्ताचा संगु कीजे. तरि वासनिकाचेनि नी न मैळेजे? ना, तो अनीष्टे पोळत असे. तळमळीत असे. आर्ति असे आपुले अनुचित कोन देखे तो मैळेचि. हें काई म्हणावें असे. पर मा –

हादाईसे भट मैळेले. सेवटीचें भटाचि पहिली अस्ता कैसे ते माहा दाइसां भेटलया गेली. तीस वरिखे अंतर पडिले. अंतरावो चुकैल की न चुके ते नेणिजे. सुदेवे गुनु केला माडावरूनि घालितां वारिलें. तेणे जरि अंतर पडिले. तरि रज स्तमें ग्रासिला पुरुष मैळे हें काई म्हणावे असे. गोसावी मध्यमे मात्रेचा पुरुष जरि आपुलीया मात्रेचे दुख नाही. उनेपनाचें तरि तो पुरुशु उतम मात्रेचयातें मैळे ।।छ।। कनियेस मात्रेचा जरि मी उणा यैसें दुख न करी. तो मैळे. मध्यमे मात्रेचे यातें, उतमे मात्रेचे यातें मैळी ।।२।। दर्यासि आपुलीये मात्रेचे दुख नाहीं. तरि तो यातिही ते मैळी ।।३।। साधन चातुष्टयाचा आपुलेया अनधिकाराचें दुख नाहीं. तो या चौघांते मैळी ।।४।। संगे भेटी धर्म मिखें जळमांडवियैचा मागिलां पांचातेही मैळी भेटी ।।५।। कृपा मीखे तो याहातें ही मैळी भेटीतव, संगातव जरि दुख नाही. आपुले ।।६।। राभस्ये अवीधि कठियाचेनि दृष्टांते तो साना तेंही मिळी ।।७।। कांजी भाजी सेवि डिंगरयाचेनि दृष्टांते तो मागिला आठतिहीं मैळी ।।८।। कु योगिया नवातेहीं मैळी ।।९।। विखया कुयोगिया






तें मैळे मागिला नवाते मैली ।।१०।। कखाया मागिला दाहाते मैळी विषैयातें मैळी. जरि आपुलेया अनुचिताचें दुख नाही ।।११।। संग्रहे रूप, विकल्प क्रिया करी तो मागिलां अकरातें मैळी. कां. पां. ? आपुले अनुचित देखेना देखिले तरि दुख नुपुजे. तयाचा संगु ना. भेटी ना. तो मैळी ।।१२।। कान्हाचेनि न्याये अधिक वृतिचा तो येकांकि यातें मैळी. कां? आपुले उणे देखौनि दुख नाही मग मागिला, तेरातें मैळी ।।१३।। कथनाचा तो लोहें पाणि गिळीले यातें मैळी. कां. पा.? आपुलेया अनुचिताचा अनुताप नाही. म्हणौनि मागिला चौदातेंहीं मैळी ।।१४।। विपरित बुधिचा तो गुरु कुळा वरि श्रेष्ठ बुधि भावो श्रधा त्यातें मैळी. कां. पा.? आपुलेया अनुचिताचा अनुतापु नाही म्हणौन मागिला पंन्हरांतें मैळी ।।१५।। साभिमानिया पुरुष तों ठाई वोढविलेयातें मैळी. मारिता पुजिता समान तयातें आपुलीया भेटी मैळी. संगे मैळी. कां? प्रवृति अनीष्ट काढली असे म्हणौन मागिला सोळातेंहीं मैळी ।।१६।। कीर्ति पर अदृष्ट वासनेचे यातें मैळी ।।१७।। म्हणौनि आपुले अनुचित देखौनि दुख न करी तो भिक्षु. तो वासनिकु भेटीसि यो –


ग्य नव्हे. मां, संगासि काई होईल ।।२०३।। पोडु देखिले गा. म्हणितलेया ज्ञान कीजेते ठावोजें. येथ यैसेचि होआवे. हा ठावोवेन्ही म्हणिजे मनें दुसरे नाही. वेचु म्हणिजे पुडती पुडती तोचि आठविजे. येथा मेलेयातें पडिताळा जाईजे. कांही विचार बोलीजे. तवं उगें मग मागुतें तेंचि. यैसा होता, वो, गुनाचा. अव्यक्ता ईस्वराचियेचा उने. भिक्षु स्थाने पर्यंत देवतांचि अनुस्यूत स्फुरे तो वेचु. ।।२०४।। देवो माझा म्हणिजे तेयाचा कडु जाला. पुरे संबंधीयांचे वासना न, तुटे. तें मी देवाचा हो तुमचा नव्हे. यैसे सब्दें कार्य म्हणावें. यैसे या परि म्हणिजे बाहुल्ये नव्हवे. तेणें वासना अर्पावी, येथा कुष्टी. ।।. हें नाहीं तरि अनुसरण नाहीं. देह असौनि वंची तरि अपराधी ।।५।। येसना म्हणिजे ईश्वरा खालौति अव्यक्त देवता मग ब्रह्मांडिचि मग लीळा विग्रहो मग प्रतिमा तेथ अभिमानु मात्र, तेंहीं अंतराळा परौते नव्हे आणि जरि प्राग्न (प्राक्तन) तरि करी मगा परमेश्वर हें उचित नाव तरि यैसेना समुद्र उतरावा. मग रत्ने सांपडति. मीसोच्या जीवा कां उतरावे? आणि तो यैसा सोहो पों जे मी दास्य म्हणिजे ईश्वरा तुझे दास्य करीन या





वासना दोनिचि घडीया पुरती आणिकी देवतों पावावया नव्हानौ यागु न पुरति. तैसिया सकळ क्रिया, पर येका मुनुस्य देहा पुरतें नव्हवे ।।छ।। तो भक्त होये, देवो तो नव्हे. कां भक्ते आवडी पुर्वक आपनपे बळियेपें, दीधले. तैसेया सारिखे माहादेवा न देववेचि. तैसा ईश्वरू नव्हे सश्रार्जुन भक्ति केंस कळाप वाळति म्हणौन था पां इंगळ घेतले. इतुले सारिर दुख साहीले. साचोकार देवो प्रसन्न जाला. सहश्र भुजा दिधलीया. चक्रवर्ति पद दिधलें. लोकांचे जाणौनि मनोर्थ पुरवी येसनें सामर्थ्य दिधले. अज्ञानासि येतुले जरि दिधलें, तरि ज्ञानिया सारिर कष्ट, मानसिक दुख करील. तरि तयासि काई देति, तें नेणिजें. आमुचा गोसावी तो क्रियेसि जाण, मनोधर्मा जाण, तो अल्पेंचि तोखें. गौराईसा प्रति तेतुलेनचि तोखला म्हणौन तेयाचेया होआवा. ।।२०६।। दासु धर्म भले तेयातें व्यापिता बाईसें आवडी पुर्वक दास्य. नाथोबा अज्ञानपुर्वक दास्य. भट ज्ञान पुर्वक दास्य. देवतां जीवाचा दासु. दासोहं हे सर्वत्र. देवतांचा दासु तै तेथचें फळ पावे. बाह्मनु भोजने तै तयाचा दासु तै तेथचें दुख पावे. आबुली ले –

करुवाचा दासु. तै तेथचें फळ पावे. जीवाते वोळगे तै तेयाचा दासु. ते तेथचें सुख फावे. दास्यत्वे विन कोन्हे सुख जीवास नफवे. न पुरे नायेका म्हणिजे मी दासु ये या आतु आवघें आले. सारीरे मानसिके शक्ति देह नाही. तरि हें वासनाचि पुरे .।।. भजावेया संपति नाही. करावेया देह नाही. नसुधिया वासनाचि स्वीकरीला यैसे या होआवे. ।।२०७।। गोविंदी गति हें सनिधानी आऊसाते. म्हणिजे तरि आतां काई जो वचन रूप गोविंद तेया प्रति सेवटा जावे तै सुलभु. लोकु बांधौनि करविति. स्वातंत्रा नसुधंया बैसलयाचि नसावे ।।२०८।। मा .।।. हां, गा, काई रडिनलेयां परमेश्वर होईल म्हणितलेया. नसुधेनि दुखें परमेश्वर नव्हे. खडक म्हणिजे आपणपे नुरऊनि अटकही केलेया नव्हे. तो जया परि म्हणिजे तो होति परि ते आनिक तेणे जै येवेळीचें जे म्हणिजे तें करितां होये ।।छ।। परमेश्वर होवावेया च्यारि कारणे. ज्ञान, अनुसरण, सन्निधान, दास्य, वैराग्य साधनचि नव्हे. जीवाचा कड. म्हणौन ।।छ।। स्वीकरिला केवि? जाणावा? चर्या निर्वाहीले तेणे तो विषया योगे याचि नव्हे. तेया रितुनियेमो. येरा आहार सयेमे ज्ञानिया रसु विर–






हितु झडवारा साहे म्हणौन आणि न, बोलतां सास्त्र बोलतु असे. यातव ।।२०९।। माळीका. हें हीं वर होववैल म्हणिजे, जीव येकाधें दृघष्टही करेल. पर तै समयोचित जें करविले. तैसें न करवे. ते कां? ना, येथ निरोध. आपुले वासना नेमावी लागत असे आनि वासना वसें उबगलेपणें अटक करेल

वारे जायेतें निकें. ।।१०।। सोधीचें जोन्हळे स्थानि वैराग्य. अन्न स्थानि धर्मु. पेंव स्थानी विखो हृदये असे. अभेद्य म्हणिजे वीखो विकट तेणे विख म्हणिजे विकल्प तेणे ते व्हेळीसीचि मेला. दोन्हें न सेविजे तरि, पेंव काई रीतें असें तरि पाये न पसरावे. थोर अनीष्ट न करावें. सानें कीजे याचि नावें रीतें आणि येक आत्यंतिक रीतें. जें निकें असे. हेंचि करीतां होईल म्हणिजे थोडा बहत तरि धर्मचि करीतां निका. अंतर नाहीं. परवरबडे तऱ्हीं तोचि करावा देसाऊनि. अंतरासि आणिल. अंतरा आलें तरि थोरा वीधिसि आनेल. म्हणिजे कनव ऊरेल नसुधें असतां निकें पर अन्य धर्म विखो नाचि ।।११।। दसी म्हणिजे असतीपरीचा अर्थ. आचारू करीतो प्रिति सुश्रृषा निमित्य वेधी आर्तीचेपणें. हे विधी ठाकती दोणि च्यारि अडंज यैसा वेगां देह जा–

वें तरि जीवे दसे दर्यासि सिबीयेचाहि प्रथम अवस्थेचे यैसीयांसि जन्म वेऱ्ही न पळीती. जव चर्ये ये तवंचि ।।छ।। भैरवाते पावावेया सत कोडी सास्त्र. नौ कोडी सास्त्र. असी कोडी सास्त्र. सतरी कोडी सास्त्र मग विश्‍वतें तें पावावेया केले सास्त्र. आगळें होआवें आणि येतुलाचि आचार होआवा. तैं भैरवाचि प्राप्ते होये. तेया पसि विश्‍वाचिये प्राप्ती अधीक सास्त्र होआवे. अधिक आचारू होआवा. येयापसि विद्येचेया अधिकारासि बहुत कष्ट साहास लागते. के वि? अंतर्यागा पासोनि बहिर्यागु, हीण म्हणौनी. ईश्‍वरा देवतातें पावावेया लागौ केतुले सास्त्र होआवे? आनि आचार केसना करावा? पर कृपाळुपणे परमेश्‍वर पेंडिया भरू मुद्रीला. भटासि ज्ञान झिनी म्हणजे आणि डुळालेयाचेनि दृष्टांते वासणा, ऊरे. येतुले सास्त्र होआवेचि. आचाराचि पुरतें आणि कनियेसु–आचार होआवा. असतीपरीचि पांच वचने ये धरावी. पर पापीया जीवास इतुलेही न संडे ।।१२।। अधोमुख सकळही म्हणिजे पर ये वचने ज्ञानीयाचि. येरा काई वरौते पाहणे असे. देवता कपाळ दाटे ज्ञानियां, अमेध्या मध्यें जड खोवीं वरिपढौनि म्हणिजे मनोधर्मु अजीम –







जकडे सरैल. पाहे सरैल. यैसे वाट पाहाणें. वासनिकाही संपति संडितां वेळ न लगे. पर विदेसें आवद्ये बाहे असतां झाडातळीं तेणें नसुधी वासनाचि करावी. असे येकाधा येक म्हणिजे बहुता ज्ञानियां मध्ये येकाधा. आवघे पाहति. हें ना .।।. वासु म्हणिजे उलेखु अनुसरणाचा यैसाचि कहिजैल म्हणिजे झडती कर्म राहाटी पासौनि वेगळा करीति ।।१३।। पांडेया हे सारंग पंडिताचि कनव. येथ अनुसरा म्हणिजे आमचां ठाई. यैसेचि काढिजाल म्हणिजे झडती काळ न लगे. कर्मा दुखा वेगळे करनि असे. अनुसरनि दृष्योत्पादकत्वं नाहीं. तें पुरुषेचि करावें. मग जयाचि क्रीपा तयासि तेसें स्थळ पाडीति. येथा भट. येसानुग्रह मिच्छामी ।।१४।। येक हेतु वाचक; येकी खाअनि. येथा स्वदेसाचें भोग स्थान. येक अहेतु, हेत नाही. पर अर्था, तवं कवाडाचें देऊळ. येकी खावनेचि सन्निधानीं. असन्निधानी येक ब्राह्मणत्व उत्तमत्व. विद्या सुसामग्रीवंत मांइभटां प्रति जयाचेनि यैसे आनि साद्रव सात्वेकु प्रकटति. यैसें आणि मुळाधिकार म्हणौन ईश्वरू सचाडु. परि यैसें कष्टे देह देखौनि विखो व्यवहा–

र थुकी. पर ईश्वरा न देववे. तरि यैसे देह ईश्वरू कां मागति? कु टियाचे तें खावणी म्हणौन उपपति. अन्यते खावने ।।१५।। ईश्वरी सरण आलेया ससेयासि मरण नाहीं. यैसें सामर्थ्ये अनुसरणाचे तिर्यचसि नाहीं. तरि जो जाणोनि सरण रिगैल. त्या काई म्हणावें असे .।।. मरण नाहीं हे प्रतक्ष बाधी. तरि सन्निधानीचे ते येचि देहें अपरोक्ष होये यथा भट ईश्वर साह्य आऊस्य पुरलेयां नाहीं. तिसरें मरण ते दुखा वाचकी तेने द्राबळीयां आसंसी जे प्राणापदी नाही. चौथे कोंपडीही रिजे मग धुवळार दिजे. तैसा ये देही हुनि काढीजे. मग सुखीयां, श्रीमंतांचां घरें पांचवें तें संसया वाचक ।।छ।। मरण नाही. चौं परि वाखाने कव्हने देवता, नेवो, न, सके. येऱ्हवी उंचीचा निचे ने पवे. तरि कां? ना, देहा अंतेचि पिडा नाही. मरण तवं आति कीं? ना, अपरोक्ष जालेया मरण नाही, हें काई सांघावे असे आणि विद्या जालेया मारवैल तरि काई ना जिये देहें ज्ञान तेहे देह ईश्वरू नेति तेंचि जाये. नां, तरि तेथेचि देहें अपरोक्ष देति आणि कोंपटी सांडुविली. धवळार, दीधले आणि जे ससाचिं अविनासु. कव्हणे देवतेसी नेऊं नये ।।१६।। दर्सन म्हणिजेया नसधे दर्स



एच-५८३
१०






नहो. अथवा वेधु बोधु अनुसरण दर्शनांत आवघे लाभे. लाजु निंदा मरन विचारी ते चाडा मा, तियेहिं चाड केसनी परमेश्वर तें नेणौनि सुंदर्य देखौनि पुरुष म्हणौन आली. यैसा साह्य मांचोकारें जो जानौति जो परमेश्वराची चाड करेल. तेया काइ म्हणावें असे. नेणो कोन म्हणिजे आवघेयां सेवटील हीण जें सानेयाचेनि होववे. तेथ थोरें काइ करावे. म्हणौन ईश्वरा मायेसि करावें, न, लगेचि. हे माळीका ।।१७।। तथा आर्ति म्हणिजे कर्म राहाटीचा अधिकार्या गिवसीत म्हणिजे विखयाचेनि दृष्टांते तो पात्रातें गिवसे .।।. तैसे गिवसीति. कोनु कोने ठांईं यैसी चिंता. तें गिवसणे. आपण जाति कां देवता करवे. आणवीति ।।१८। सुनेयाचिया परि म्हणिजे जैसें तयासी कव्हने ठाइं सुख नाही. तैसे सकळ चर्ये; स्थाने, प्रसादे, भिक्षु, वासनिकाचि ये भेटी सुख न व्हावे असे. तरि सुनेंचि कां? ना, ये जाती आगीचें दुख असाह्य तैसें येरे नाहीं. ।।१९।। दांत म्हणिजे ज्ञान. चणे म्हणिजे वैराग्य. येक असे. तरि येक नाहीं. कर्मराहाटीचें वैराग्य आति पर ज्ञान नाहीं. येथ ज्ञान भेटे तरि वैराग्य नाही. दोन्हे तें दुर्लभ ।।२०।। ज्ञाने विण वैराग्य कैं? वीधी निसेध याचें ज्ञान नाही. तेने विन वैराग्य अ-प्रयोजक. हे


मा ।।छ।। ज्ञाने विण चर्या नाहीं. भाजेयेचिया सीया दुचिता जाला यैसा के. गोडी (नईवे) न फवे. तरि ब्रह्मं विद्य कैसे अन्मोदावी. कां पां? खेंवा लागी पाऊलें दोने तोंड पघळौनि जावे. तैं गुणु फवे. रमन ।।२१।। मरणातें आश्राये. कां चर्या आवघड गोसावी यैसें नाहीं. आपुलेया वासना अटक करे. काळाचेनि बाहुल्यें उबगलेंपने. येकु सत्याचेनि भरलेपने टांचें देखे जैसे स्त्रीयेक सत्वे आगी रीगे. येकी कीति गाडुये फोडावे .।।. मरणा सरण म्हणिजे सकळांचा निरोधु न साहावे. उठने या बैसनेयांचा दृष्टीचा वाचेया मनाचा उबगलेपनें प्रमाद क्षण चुकवे. येक जन्म कडै न पडे यैसे देखे ।।२२।। वोखटे नि गोमटें म्हणिजे पापे स्वर्ग, पुन्यें नकरक हे न बोलीजे. हें दृष्ट पर तरि येकाचें करण येकासी माने हें हों प्रतक्ष बाधिति. येथा सितकाळें चंदन. वरि वारा तरि ये काळे जें गोसावी चित जेयाचि जैसे वासनाते पाळीजे तैं गोमटें होये. वोखटें गोमटे यें वासनावसें ।।छ।। साधना पासौनि साध्य उत्तम. सकळ विद्याचां ठांइं क्रिये मात्रे मनसा वाचा कर्तव्यें. प्रतक्षु येकु संबंधु ये.





जयाचि प्रति अपकीर्ति ते पावला होता, तयाचि प्रति कीर्तिते पावे।। कैसी येकु बोले, तरि तो दाहा शब्द वोखटें बोलें. तेणें तैसासे एकु शब्द गोमटा. येकेंसि एकु बोले. तरि येरे येरीसीं दाहा शब्द गोमटे बोले म्हणौन साधना पासौनि साध्य उतम, हे व्याप्ती ।।२३।। कीर्तितें पावे कमळाइसांचि वासना. लोकांप्रति येसातें न पविजे. वासनिका प्रति न पविने. भिक्षुका प्रति न पविजे. ते क्रिया धर्म नव्हे, यैसे जाणावें. ते क्रिया सांडावी कां पां? करणीय करीतां येसातें पावे. करणीय करीतां कीर्ति तें पावें म्हणिजे आपुले करणेय म्हणतां आपुला स्वधर्मु आणि करणीय म्हणिजे वैराग्य, आचार, विदेशी निःस्पृर्ता. तो करीती लेंकुरवे सांडिलीं, स्त्री सांडिली माय बापुल सांडिलीं. यें आवघें सांडितां लोकु भकावा यातें तीयेचि वानिती ।।२४।। सत्य प्रकटे म्हणिजे येथार्थु तो उमटे. एकाधेन येका परि अन्यथा ज्ञान कल्पिलें. तरि तें तेधवाचा काळ. जीवास येथार्थुचि बैसे मग उठि बैसी अनुभवें. येथार्थ तो उमटे. हे. मा. ।।२५।। तेलियाते बोलावु आदरीलें. कां? जे बोलतां विक्षेपु. तैसा श्रोतयां नाही. दास्य करीतां जे दुख तें माहा प्रसादु म्हणौन घेयावें. प्रतिबंधु न करावा. अन्यायें विण कोपणें तो सासुरेवासु. आणि ते.


सकळ व्यापारीं वेचे. मग घडी येकी तेयाचि. धरणें म्हणिजे सकळ संपति त्येजोनि. आपुलेया स्वार्था, लाभा लागि तयाचें साहावें ।।२६।। यैसें न म्हणिजे गा भोजे या म्हणितलेया. जो शब्द पुढिला खुपे, तो न बोलावा. ते क्रिया न करावी. प्राणिया म्हणिजे इतर साधनीचा, अथवा मनुष्य मात्र. असुख म्हणिजे दुख. हे मा. ।।२७।। यैसें न म्हणिजे. डखलेया म्हणिजे विपलाणें शब्दु न बोलावा. पुरुष म्हणिजे अंतर्यागिये, बहिर्यागिये. क्षोभु म्हणिजे प्रस्तुतेचि वोखटें करी. हांसें उपजे यैसें कार्य केले यांहीं परि हांसावे ना. क्षोभु उपजैल म्हणौन परिपुर्णा सामर्थ्यवंता, जाणतेया जरि सोभु उपजेल. तरि येरा काई म्हणावे भीष्मदेव ज्ञापिले. जये विजय शापिले क्षोभातव म्हणौन क्षोभ कव्हणाचाहीं उपजों नेदावा. लीळा विग्रह देवता एकविरा. मार्तंडा स्त्री शौचा दर्शण पांचाळेस्वरों आलीया देव द्रोणीचिया हातिवेसिं पासि आलेया श्री प्रभुसिं विंझुगाचिया देवता, नवगावा पासि दोघ दोघें बाईलेचेनि वेखें ।।छ।। येतुले. कामाक्षा. बहुडी. आऊसें. संतोष. अवडळ, अवधूत, परस नायेक द्रावड देशीचा संन्यासी. कनैरी. नागार्जुण. जाळांधरी कान्ह.






लुई पाइशिक्ष दोघें सेंदुर्जनीची मासोपसीन. तथा ब्राह्मण, भोगरामीचा ब्राह्मण. असे नाना वेखें विद्यावंत असति. चार्मकार मातांगा स्तीति. यैसें म्हणोणी त्रिविध अनीष्ट मनसा, वाचा, कर्तव्यें चुकवावें, कवण काई यैसे गोसावी जी विध अनिष्ट मनसा, वाचा, कर्तव्यें चुकवावे कवण काई यैसे नेणिजे. आणि अव्यक्ता शारीर, वाचिक मानसिंक प्रतिकुळु मनुस्य मात्रासीं, देवतांचिं स्वरूपें म्हणौन तिर्यंच मात्रासिं न करावें. कवण मनुस्य केसने पात्र? कवणु तिर्येंच केसनें पात्र? हे नेणीजे ।।२८।। यैसे न म्हणिजे डखलेया म्हणिजे जेणें देवते निरोधु होये. तो सह न बोलावा ते क्रिया न करावी. हात न लावावा. जवळी न बैसावें. रंज जांवो नेदावें. नीरोधु म्हणिजे संकोच हे.मा. ।।२९।। पुढीलांचां मरणे प्रवेसे पात्र भेदे सत्य कैसे? या वाटा चोरू गेला. याकडे उदक असे. तैसेचि भय. आपुला पदार्थ राखता जें काहीं उपजत असे. सुने, मुंगी गोरुवें ये यवंमादिके तेथ दोषू नाही ।।३०।। जेणे सब्दे जेया क्रिया पुढीला भये जेणे ते न करावे. यैसे म्हणिजे क्रिया असंत ।।३१।। मनें वोखटे न उरे.

वाचा न बोले. क्रीया न करे. हींसा अर्थे जीव मात्राचां ठाई ईश्वर बुधि देखे जाणों काई तोचिं दुखवला. कां जे सर्वात्मकु म्हणौन चहुं भुत ग्रामां अभय दिले. म्हणिजे करी तयासि प्रस्तुतिचि वोखटे मांडे. यैसे ने कीजे. म्हणितलेया क्रिया असंत असे. यैसा म्हणिजे आत्यंतिक प्राणिया : म्हणिजे पात्र. धर्मु म्हणिजे वेधु त्यागु अनुसरण. चर्या, सास्त्र, प्रसाद, नित्य वीधी, निमित्य वीधी, भजन, सेवा, दास्य काढणे त्रिविध. आपण मोडे पुढीला करवि मोडवि. मोडेतो उपाओ करी. मोडेनें दोपरि अभिळाखें अभिमाने ।।३३।। प्राणीया म्हणिजे धर्मासि उदीत. इष्ट म्हणिजे इतरांचें इष्ट. दर्शन वेध वेधवंताचा बोधु बोधुवंताचे अनुसरण. अनुसरलाचि चर्यावंताचें स्मरण, आर्ति क्षेपनें सास्त्र प्रसाद, या आड न यावे. ये तो कानवाथर. प्रस्तुती वोखटे पावे. परत्रे नरक. ईश्वरी खंती. आपण न करी जयाहुनी पुढीलाचे याइष्टा आड येणे हे माहा पाप ।।३४।। दोख न संगावे अहिकता खंती थोर असे तियेतवं अनीष्ट थोर नेफजैल. आणि ते सन्निधानेचि क्रिया काईसेनिही न फीटे. जेयाची क्रिया तयाचि खंती. सांघतु असे, तयाचि खंती. म्हणौन दोषुक म्हणिजे काई ईश्वरू ईश्वर जाणतु जीवे मुर्तिवंतां न संगावा गोसावी






जाप्य करू नये. म्हणौन कव्हणाइ जीवासी गोमटें चिंतु नये. मा करूं काई येईल. तैसे वीरु चिंतु नये. मां करूं काइ येइल वोखटे ।। म्हणौन भुता अवेरोंधें वर्तावे ग़ुफा कीजे आश्रो धरीजें. तरि करीतांचि चतुर्वेधां भुत ग्रामासि तु तें खाति. तेहीं होये. म्हणौन आश्रयातव येतुले नरक निफजतीचि. चोरे या दुधीयाचिया बीयां जाळीजति. यातव असंत निफजति म्हणौन निराश्रया वर्तावें. आश्रयातव जीव धर्म उपजति विकारू उपजे. म्हणौन आश्रो झाडाचा, गावाचा, देसाचा, संगाचा, निमित्याचा, गुरू कुळाचा, वासनिकाचा न धरावा. आश्रया तव ईश्वरीचि आर्ति सरे म्हणौन ईश्वराश्रो धरीजे ची ।।४३।। करितां स्फुरें तरि अश्रृतासी स्वोक्ती ते कैसी. आणि जवळीक निसेधे ठाऊनि काढणें यें दोन्ही दुसने म्हणौन समग्र श्रृत होआवे. मग मैळलेपने कां राभस्यें असे. वाक्यविरोंधु काई ते कर्तवता उभी ठाके जैसे श्रमनिवृते तरि करावे. आनि हींसा चुकवावी ।।छ।। स्मराणा पासौनि निमित्य वीधी थोरु कांतेचि करीतां विघ्न आले तरि निमित्य वीधी हें आगरखे निमित्य विधी आंत अनुषंगीक स्मरण आति पर येरा आंत ना –


हीं आणि दास्य मोचक हे अति व्याप्ती सन्निधानी असन्निधानिं .।।. दास्य मोचक म्हाइंभंटां प्रति निरुपीले. तों दास्य रूप व्यापारू पाहारु पाहारु दीसू करविती खडकुले यें सांडोवा पाहार दिसा व्यापारू असे. हीवरळीये वृंदावन उदयांचा अवसर जालेया विहरणा बिजे करीति. पाहार दिसादास्य जुंझविति धावविती पव्हवीति पाखान फोडवीति अथवा निरुपण करति. येणें न्यायें पाहारू दीनी पहाराचें पाहारू चिदी आइकावे. पाहारूचि दी मनन करावे, करावे परि पाहारू येकु चर्या करावी. पाहारू येकु जिज्ञासा करावीं. तयाचि परि पाहारू येकु स्मरण करावें. इतुलेनि स्मरण संवंधा क्षेपुक होये. चौथेनि पक्षे आठ पाहारू स्मरण करीता. सा पाहारू लेखी लागति तो उत्तमु. च्यारी पाहार लेखी लागति तो मध्यमु. दोनी पाहारू लेखीं लागती तो कनियस. पाहारू लेखीं लागे तो चौथा पक्ष. तो करावाचि ।।४४।। अविधी परिहरे म्हणिजे नित्य वीधि नासिता नव्हे. जे आत्मनिष्ट वज्र कीटकीये सेकु. तैसे आनि उपायें आन न णसे, येथा आपण जेवीलेंया अंतराळु नवहे आणि तोचि करीता निफनलें की? तरि विद्येसी निमित्ये वीधी कैंचा? तेथ आर्ति, निर्वेध, अनुताप प्रसाद, सेवा हें सांघाते दिध, परि पाहारू येका पहारा दिठानी भारा किं ठारा म्हणिजे येकु





स्थाने उपजे हा स्थानाचा गुणु ।।छ।। येकु देसु राजसु येकु तामसु येकु सात्वेकु. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, चहूं देसाचे च्यारही गांवे अनुभवीजे. तिसरे सत्वा नये. रजकां तमचि उपजे. तरि तो देसु संडिजे. तैसाचि गावों. सात्वीक. राजस, तामसु पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण चहुं दिसाचिं विजने अनुभावेजति येकि दिसे च्यारी च्यारी विजनें अनुभावे जति. तरी सत्वा नये. तरि तो गांवो सांडावा. तैसेचि विजन, भोजन, स्थान नीद्रा स्थान. झाडातळीलिच्याऱ्ही दिसा अनभविजति सत्वा नये. रजो रपकांत मनोरथ उपजति. तरि तें झाड सांडीजे. तैसे नीद्रा स्थान देऊळाचिया च्याऱ्हे दिसा अनुभविजति सत्वा नये. मनोरथ उपजति. सत्वा येते. सेविजे. येरे दोन्ही त्यजी- जति. तैसेंचि भोजन स्थान. सत्वा येतिये देसेजे उंबैसीन्ते असे. जैसेचि मनुष्य उगलें मुगुलेचि असे. परि सत्वचि नये. उलेख उपजति अस्तीत्वेंचि. येकाचि अन्य वार्ता परि सत्वासी आले. येकाचा निर्वेद सत्वासी नाणे असे तैसाचि वासनिक तैसाचि अनुसरला. वंरवडे सात्वीक. परि भितरें रजें वेवष्टीला असे. का तमे तयाचेनि संबंधें सत्वा नये. वरवडें राजस कां तामसु भितरि सत्वे निर्वेदें


सींतला असे. तेयाचेनि सत्वा ये असे. जैसा वासनिक वरवडें तरि नाहीं परें भितरी उजळला असे. तैसेचि निरुपण अर्थ तरि उत्तम असे परि सत्यासि नये. निर्वेदा, अनुतापा नये. अनुसोच आर्ति नुपजे. स्मरणा दक्ष नव्हे. तरि अक्षरें निर्बीजे जाणावी. रजें कां तमें घोळले असति लीळा आईकेले यां स्मराणासी नये. तरि तेंही तैसेंचि. प्रसाद तैसाचि नमस्करीतां सत्वासि नये. अथवा नमस्करणें न घडे. तरि तोही धर्मे आला नाहीं असे विसेखा चेनि पदार्थे सत्वा नये आनि सामान्य पदार्थे सत्वा येत असे तरि तो धर्मे आला ऐसे जाणावे. विसेख स्थाने सत्वासी नये आनि सामान्य स्थाने सत्वासी ये तरि तें धर्मे दाखविले यैसे जाणावे. आनि धर्मेंचि देखीलें ।।४२।। सेवा म्हणिजे मुर्ते निष्ट व्यापार येथ वा विहीत तेतुलहि साचुक उनीकी जे तो अविरोधु ईश्वरे करविले याचा बाधु नाहीं. आपन सुख दाने कोन्हा इंभुता दुख नेदीति. म्हणौन दास्य करावे आनि हींसा चुकवावी ।।छ।। विखो सेवे वासनिक जयासी लेकरू होये तेयासी अनुसरना नये. कां, पां? तया जीवासी जें सुख दुख पावे पाप पुन्य निफजे. तया जीवासी जीणे मरणे तेतुले या त्यतो होये हें चेतन सत्व नसे. म्हणौन वेवहार काल गि सांतिकु पुष्टीकु नवसी. ये-





र असे जीवु मात्रे देखवे मनुस्याचां काईं पोळे साधना वंताचा ठांइ क्षोभे दैवराहाटी जळे ।।३९।। हिंसा वर्ते म्हणिजे प्रस्तुति वर्तत असे. कां? मां, पांव ति लिहोति. कां? पुढारे वर्तैल. तेथ नसावे. सानेयां घर त्याज्य. चतुर्वदै आळी वाळी जा गांव आळिवत. तो त्याज्य. भिक्षा करीतां देखीले तरि करू ने सांडावा आधिचि येत खेवि श्रुत. कां दृष्ट जालें तरि तेव्हेळीसीचि सांडावा मनुस्याच्या सर्वेचि सांडावा लब्ध्तें दृष्टे ।।४०।। सस्त्र जेणे निर्मिले तेंये हींसेचें जें उचित तेथ दोखु जैसे गळेनि मानुस मारीलें. तो दोषु मारी तया जाला. नि तेया नव्हे. मग अति व्याप्ती उत्तम मध्यम कनीयेस ईश्वर पर्येंत असे. जेने विन जो व्यापार निफजेचिना पुरुष सक्य नव्हे. तो अविरोधुचि असे मग प्रकृतेति स्थान काळ विसेखे ।।४०।। आपुला ठांइ सत्व निर्वेध अनु तापु चांग असे. आणि वासनिकें भिक्षुकें भेटति. भेटत क्षेवे दर्शन अस्पर्शण संभासण जालेया. आनि रजाचे उलेख उपति. कां? तमाचे उलेख उपजति तरि तया भक्षकातें वासनिकातें आणिका स्थाना नेईजे. तें हे उपजे तरि आणिका स्थाना नेईजे. तेथ हे उपजे तरि आणिका स्थाना नेईजेति. तिनि स्थानै पर्यन्त पालटीजति आणि नुपजति तरि स्था–


नचि राजस. कां तामस यैसे जाणावें तिनि स्थाने पालटीली. आनिर्वेदा अनुतापासि आर्तीसी नये सत्व नुपजें. तरि तो भिक्षु कां वासनिकु राजसु कां तामस यैसे जाणावे. रजों रूप मनारर्थ उपजे. तरि राजस स्थान जाणावें. तमो रूप तरि तामस जाणावें .।।. तैसाचि पुरुष जाणावा. तैसाचि काळ. तेसेचि क्रिया. पुरुष, स्थान, काळ, क्रिया. हे च्यान्ही राजसें कां तामसें. यैसा या गुजाला. तेथ सत्व कैचें उरैल असे. पुरुष राजस कां तामस तेयाचेन दर्शणों स्पर्शनें मग भासणे. रजोरूप तमोरूप मनोरथ उपजेति तयाचया भेटी मैळेजें. कां, पां? निर्वेद दुखे विन संपादितु असे. म्हणौन तयाचें राजस पणु कां तामस व्यपण आपलेंण दर्शने, स्पर्शने, संभासने, निरुपणे, फैडावें. दुख उपजवावें मग पदार्थ सेयावा जरि दुख नुपजे. तरि क्रिया न स्वैकरावी. सात्विका पुरुषाचेनि दर्शने, स्पर्सने, संभासनें निरुपणे देणेनि घेणे निगेलें सत्वते. अनीष्ट अवीधी नासे. निर्वेद दर्शन उपजे स्मरणासी ये. स्मरण दक्ष होये. चर्ये दक्ष होये. इंद्रियार्थ त्यागी दक्ष यैसे अनुभवे जाणावे .।।. स्थान तामस म्हणितलेया  तम उपजे. आळस्य जाडी. (जाड्या) तामस मनोर्थ अखंड उपजे. तरि मी तामसु यैसे जाणावे.





जीवो उडें गोमटें नाहीं. यैसे माणुसचि नाही. गणुतो वातिव्ये-्ही गिवसावां कव्हणाचाही न संघावो ।।३५।। तृष्टीला पुरुष यांचा अंतु पाहातां परत्र दोष हें काई म्हणावें असे. पर दृष्टेचि दोषु, येथा नाथोबा ज्वरू ।।३६।। गोमटें घेऊनि निगावे. तो आपण या देखिजे रितेया त-्ही नीघावें. पर येर ना हां गा जयाजेया ठाया जाइजे तयाचेया काइ आडलीया घेऊनी जाईजेति. म्हणौन पुढीलांचेया ठाया जाईजे. तरि तयाचा भले तो पदार्थु नभिळाखीतो उत्तमु. अभिळाखी तो अधमु परि पदार्थ पाठीं, लागतां मां चोरूनि घेइजे. चेतन तरि चाळविजे तो अधमांचा अधम. तयाचे न जळणेनि णरक होती. कां? ज्ञानियां थोर पात्र म्हणौनी .।।. पाहिजे म्हणिजे तयाचा आचार विचार संति निश्चळता. वर्तन मग चर्चा कीजे. जेतुका गुणु दिसैल स्वोक्ति, युक्ती त्रयेविन ।।३९।। माहात्मा हें उचित नांव भाटिचा वसो पक्षीये स्वतंत्र उपनलेया मनोधर्मा वेष ये व्येवस्था नव्हेवे. तो निरोध ।।५९।। विखये व्येवस्था न व्हौति ऊरै तो निरोधु. निरोधु म्हणिजे दुखरूप सारे रमा न सके. आता मानसिके तो ठैसा खंती आली असे. कां आवडि सरली असे. कां आणिकी ठाई चित वेंचलें असे. उपजावेयाचिं कारणे मुर्ति यासी चाकरवे म्हणे येंक रचेताति हाणे आपलेया सिष्याचा मोहो, नेणो कितका. अमु–

केया आमुकेया करीतां तोडसकताये माझी महिमा हाणताती मोझे बोलेचि नावडे. सरिर तें यैसे थोर वोझें. बहुत चालनेहि, न, म्हणे यें. बहुतचे शकता अशताची कणव नाहीं. करीता कां करी. अभिमानें माझें घेतलें ना. येका परत्रा बुधी तया उपजे. कां. जया देखतां अेऊं नये. तया देखतां आग्रही करी. येकां बहुत आग्रहो घेतां जाला. केवि जाणावा? तिये क्रितें आठवितु असे. तै न करावा. महात्मा सब्दे वेखासि वाचक मोकळेपने अभये दाने. माहात्मा सब्दे भितरा सांती वाचक ।।३८।। चैतन्य पोळने आला म्हणिजे येरें सकळ वाक्ये करेत असे. म्हणौन ये-्हवि गेला यैसें होआवें कीं? पद्मनाभें देवाचे चैतन्य पोळिले यां मुख न पाहाति तरि स्वतांचे चैतन्य, अनुसरलेयाचे चैतन्य पोळिजे. नव्हते दोषु घालिजति. कपाळी वर्मे उघडीजति, सभासाध्य येसने पात्रे पोंळीजति. तरि कैसे तयाचें मुख पाहाति ते नेणिजे. प्रकृते देवता संपादिले. तया मानसाचि खते केलेयां देवतीचि केले होये. तोचि केलेया तोही देवते ठाकला होये. भिक्षुचेया खंती चैतन्या क्षोभ होये. भिक्षुचा ठांई असंत, तेणे नित्य नरकांचें बी निफजे, हेमा ।।छ।। जीव मात्रे ममता साधनवंताचा अभिमान. दैव राहाटीचेयाचा अविःकार–






लें गेंले ।।छ।। विषय ग्रहस्ता पुरुषा, अथवां अवीधी खादलेयासि स्मरण क्रिया न व्हवे. तेणे जेतलाही प्रसादु, जेतुलें स्थानां जेतुले प्राप्त त्यागिये पुरुष, जेतुले हि वासनिक, सेवक भजक साद्रव भावाळु हे अवघे हि आठविजती. येतुलेनि स्मरणासि, येईल, केवि? माहादाईसे द्वारावतीये गेले. तेणें आत्मज्ञान जाले. म्हणौन आणि वोटे गोटे नमस्करणीये, म्हणौन आणि पंचाळेस्वरी दर्सनी, भेटा अदर्शनी सिक्षापण केले. म्हणौन यैसे स्थानु सामर्थ्यावंत. वोखटे चुकवावेया आनि गोमटे घडवावेया ।।छ।। सांडोवेनि उदास्य परिहंरेलें, येथा क्रिया करुं आदरावी. खंती जाये ।।४५।। ग्राम पसु म्हणिजेति तयाचेचि वेव्हार मरण भये न देखे. पाप पुण्याचे ज्ञान नाहे. तैसाचि मोहो. तथा विखये सेवा. पर चांगा विद्या साहें. मग येथचाहि जाणौनि तैसेचि करी ।।४६।। अमेद्य तुल्य विखो म्हणिजे तया समान जावे गोसावीया जे कृमि समान पुरुष हे ति तिया दुर्लभ. येथादुकळे भनंगा अन्न ।।४७।। कृमी तोचि पुरुषार्थ या बाहीरी पडैन. तरि मरैन कीं म्हणौन दुर्लभ ।।४८।। येकासि उपक्रमात नावडे. येकु आवडौनि अनीष्ट म्हणौन सांडे येकला भीया मोकलु न सके. मग निमित्या पगमे त्यागु वासने चा दुसरे अनि –


क उद्यमु न करी. आनि, तेहिं करिता न मिळे सेवट पर्यन्त, मग सांडी वासनाया चौथा ।।छ।। कानवाथराचेनि दृष्टांते जडा चेतणा पदार्थासि आनि पुरुषी अंतर पाडीति. तरि अपुर्व कैसा मेळों देति? सतेव जाये तेव्हेळी सांडि. तो निमित्या पगमु. ईश्वरु पाडीति. जयाचि कनव तयासि. येकु अनधिकारेंसिं अनुसरला. येकु अवघेन अधिकारे घेऊन सरला. अनधिकाराचा तो दोसु नासेत असे. आनि येरासि नासुं, सरलें. गोमटेलावितु असे. ते जाती आनिचि, ये रें आनिचि जैसे प्रेमाची आणि ज्ञानियाचि आनि ।।छ।। चर्मकारे स्त्री कुहिला विखो सांडिला गोसावीयाचिया चाडा. तया तव द्रृष्टी आनंदु लाधला. लोकीत्वें मान्य जाले. पुजा पुरसकारु होति. देहासि छेद भेद न प्रभवति. येसनें सामर्थ्य लाहे. मां बोधवंतु ईश्वरा कारने विखा सांडि तयासि काइ देती जे नेणिजे पर जीवासी कुहिला विखो न संडे ।।छ।। अनुकुळते तव वासनेकु अविद्या जेथ वेच तेथौनि ले सरे साहो ये. धर्म येळे मिळति कानेहिं पडति ।।४९।। अनीष्ट म्हणिजे इष्ट नव्हे तें. अनुसरण न भंगौनि येकां पुरुषा उपसाहाति. तेने आनिका अंतरावे. मग भये कां? ईश्वरीचेया खंती येका पदार्थाचिया थोरे या. येका पुरुषाचेनिका क्षेपने. मग उपसाहिलें हाहि अंतराओचि की आपुलेनि





अवसरेंनें भेटी देति. येर अंतरावो. त्या सा, सृट्यांतर ।।छ।। अंतरायोचेया विखो गोमटे हें वर प्रदान, येकेंचि वचने गोमटे मग घटिकां दोंचा स्वीकरणीये जीव मग वास पाहे याचा आपणपें देईल. तेया आपणपें देईजेल. म्हणिजे पाठि देइजैल तें सांधितलें आणि आतांचि दिधले सर्व सक्तेसीं हें येकु प्रमादेया. येका उपसाहिले. येका अंतरावो. येका फळाचे अंतर होये. असे सकळ अनीष्टा विखोचि कारण हींसा, कथन विपरित अंतरावो. जेतुलेया बोधु अथवा मार्ग वेधु, तेतुले लाभतें ।।५०।। योग भ्रांसला. पर पुसला नाहीं. येथा पोथी. आवघया वचनाचे कोर कोर रठेले. नित्य होये पर सास्वतां स्वीकार नव्हे षढ्विकार रहितु यैसा मोक्षचि होये. मग तया समान जेणें गुणें या अनुसरनें जो दुखाचा केरू फिटला. तो गेलाचि. येसनें ईश्वराखंती आली पर, तेणे तें, न, भंगे तंव कुमरत्व न वचे. जैसा रावो रुसलेया प्रधान सात सुर वाड करी. पर, दुख न संपादि असे. सास्वत म्हणिजे सुखासि केदवाहि उणेपण नाही. असास्वत म्हणिजे सुख उणे. केतुले येक सारेखे ।। सोधीचें लोकु म्हणिजे बहुता समावेसु लोकस्तु भुवने जने णा तर अनीष्टें न घलेती. पर नरकांचें साधनहि ने दिते दृष्ट वेवह–


रन तेने विन न घडे. ते अर्तिते ।।५१।। वागारा म्हणिजे अठव राघोडे याची जाति. जयाचिये आज्ञे आंतु जो असे, तेणें ढीला तयाचा न करावा आनि आपुला आपण न करावा. सरळे नेंदावी, न लोटे तरि मीठ घेईन दुसरा पदार्थ नेंघेंचि काढावी यैसे रेघा ठावे. येथा भंटांचि आज्ञा ले पुसिली. यैसे गा. जीव म्हणिजे सोडित खेवो आनिका आन करिति सोडा जवं वागारां आळेला असे तवं मार्गे चाले. ठेला होये. आणि वाट सांडी. वेगाचि कडां घालिजयासे अनुज्ञा. तेतुले नणऱ्हाये. वरणेपास्ते न गमें. मग वडे मांडे तया परतें पाहे ।।५२।। वारिले म्हणिजे नेषेधु अनीष्ट अवीधी हींसा अन्य धर्म. असे वारिले. केलेया दृष्टे दुख. परत्रे नरक तरि उपाचि असैल म्हणौन म्हणिजे करावे ।।छ।। सासार्जुन श्री दत्तात्रै प्रभु वरू दिधला. तो परसुरामें कैसा वधेला. देवती वरू दिधला तो गोसावी सिधी नेति तरि गोसावी वरू दिधला तो देवता कैसेया सिधि न नेती? कान्ह काई बहुडी ये तव जाये. तो गुरू असे अधिक वृति वर्तेनला तया अविधि तवं पेंडु गेला. तैसे सासार्जुन काई परसरामें वधिजे पर तेणे श्री दत्तात्रै प्रभुची आज्ञा भंगिले. म्हणौन प्रसरामा तव वध व–





ला, तैसे ईश्वरीचि आज्ञा भंगिलि, तरि दृष्टी देह घातु होये. जरि देह वांचले नरकचि निफजवेयाचिया, हेतु तरि तेन्हे ताप गावतीं अनि अदृष्टे ईश्वरीचि कनव तुटे, यैसे होये. वरातव येसनी हिंसा निफजली. तरि विज्ञान देते तरि काइ निफजविता ।।छ।। मत द्रव्ये न, सेवा गा. म्हणिजे पुढते पुढते वर्जिलें कार्म राहाटीचिया होंवा. बुध्योत्पादकत्व न करि तेचि ईश्वरीचे कुमर धायेरे. सोयरे जुंझौनि मेले आणि गोपी भिलिं नेलीया. येसने अपयेस स्वे-करीलें. विश्वा प्रति उदेवो जाले. मां ज्ञानियासि काई करीती म्हणौन ईश्वरा उतराइ हों नेदावें कुमरासी यादवासि दृष्टे आयुस्य भविस्य राज्य तुटलें. परत्रे गोत्र वधाचे नरक जाले. तरि आतां मत द्रव्या काई करेल, यैसे नेनिजे. म्हणौन ईश्वरें वारिलें तें न करीतां द्रृष्टे अपयेस दैन्य सारीर, मानसीक दुःख देहघांत. परत्रे नित्य नरकांचें बीं नघडे ।।छ।। मानसिक वाचीक सारिर अनुचित क्रिया करितां लाज थोरचि हुआवे आनि भये थोरचि होआवे. कां. पां? बहुते देखते अस ती म्हणौन अतित त्रिकाळ ज्ञान यैसे बहिर्यागीचें अनंत दूरादर्शीये दूरोश्रवनिये अैसे अनंत वि-


द्यावंत देवतांचे अनंता माहा सिधी जालेया असेत. यैसे येक्यांसी काडी येकु लक्ष, पंचविस सहश्र नव इतुलेयां देवता इतुलेचि फळीये आनि पाप फळेये ग्रेहो झोंटींग उभुते येही अनंते, सकळ ब्रह्मांड व्यापक चैतन्य आनि म्हणौन ये बहिर्यागेचे, दुरादर्सये, दुराश्रवनेये, विद्यावंत, देह विद्यावंत, अपरोक्ष ज्ञानिंये, सामान्य ज्ञानिये विसेख ज्ञानिये, प्रेमिये, अनंत येतुले आतां अवताराचे अनंत देखत असेति. आनि अनंत अवतार देखत असती. आनि व्यापक स्वरूप देखत असे. श्री चक्रधराचें विद्यमाने आमुचे गोसावी देखत असती श्री दत्तात्रैय प्रभु देखत असति. म्हणौन त्रिवीध अनुचित क्रिया करितां येतुले देखते असेति. माळेकाराचेनि दृष्टांते दुख भोगिता येतुले याहीं घृना नुपजे. ईश्वर अवतारा कनव नुपुजे आमुचेयाहीं गोसावीयां आधि करने म्हणौन त्रिविध अनीष्ट चुकवावे. चांगु प्रयेत्ने करावा. गोसावीया विन वाक्ये इतुलेनि न, निफजे ।।५३।। येथौनि म्हणिजे परमेश्वरे चेनि वचने म्हणितलें विधिनिसेधु चुकउनि, जिये समइचें जें करेणते करावे. म्हणिजे केलेयां दृष्टि येस, अदष्टी तोख. योग्यता, दक्षता, कणव उरे ।।छ।। परमेश्वरे म्हणिजे ते म्हणेतलेया आंतु वारिले तें अनिष्टा आंतु यावेग






ळे देंतें चातुष्टेया आंत आणिकाचे  येक घेंत असे. तरि निमित्याचीं दोन्ही घेयावी घेने, ने घेणे, करने तिनी प्रितीचि करणे विधाने उपसाहति. भी भडेगावे या वेगळें हिंसा चुकउने करवें. आनिका देत असे. आनि कां देत असे? तयाचेया हुनि देने अवस्थे अनरूप .।।. दासरुवे जेधवां जेधवां जें म्हणती तेचि करावे कीं .।।. गुसळन सांडावे, सेणुं फेडावे झाडाचा कांटिचा आश्रो न धरावा. अमुका काळु येथ यैसे तैसे न करावें .।।. ५४ । देंवें करावे. तें केलें म्हणिजे बोधु हा देवाचा कडु तरि अधिकार पांताति कीं? ना, जीव पात्र जालेया ईश्वरा कोनु उपयोगु? पुरुषें करावें ते ठेंलें म्हणिजे अनुसरण हा पुरुषाचा कडु ।।५५।। दाईंबातें दृष्टी सुनी कनव आली. परमेश्वरा सारीखें अनीष्ट गुण वेसेखे उपसाहिलें. अधोपरेचें याचे आंदोलनें तियेचि काळीचें मग रितुचें तोडने. अनंतु म्हणिजे असक्ता, चिरकाळ दुख होये. येर गुळ भेली इश्वरीचेया चाडा ननुसरति तरि भयाभेन तऱ्हे अनुसरतिये. हेतु दाविले. अनंत म्हणिजे यैसे दुखेही अनंते. आनि येकतें दुखे काळुही अनंत ।।५६।। अनुसरना सरीसे. अनारब्धाचे डोंगर गेंले. उरलें कवडेया भोगु देहीं, तादात्म्य न असौन मग वासनिक दास्य करी. भोगु उणा तैसेचि इतराही. येथचे –


या होईजे. म्हणिजे अनुसरलेंया सकळ दुखें चुके ते ।।५७।। मा राखुये असे. गा मंडळिका. म्हणिजे अन्यथा ज्ञान गेलेयाहिं परिहारू नेदावा. जीव जीवा म्हणिजे येर येर अज्ञान परिहार न वचे. तरि काई नेदावा? ना, जो जाये तो देयावा जे वद सांगेलेया जावे. तै जेसें अर्थ निजेतरी जाये. कां? जे सत्व प्रकटे म्हणितलें ।।५८।। जीव म्हणिजे स्वार्थपर दृष्टांर्थेये. झाडनें म्हणिजे शब्दे संजोगनी, सिनला भागला म्हणनें. पुसने म्हणिजे क्रिया पाप तवनें, सितु भागु हीरनें, पदार्थे कार्य. हे मा ।।५९।। आप्ताचें लागे म्हणिजे जेणेंसीं आपुलेपण हितक्ष बुधि तियाचा शब्दु घे. सिकवन आईके ।।६०।। बाईसे जें तम भोगीति. तयाचा दोषु तरि होये परि येरें गुणें जलौनि जाये. जैसी तनाचि वल्हे रूप किजेते येणेविन म्हणिजे मुर्ते विन ये देवता गती, म्हणिजे चालनें. कुंठलें वोखटा, शब्द अैईकीला. देह तेथची पडीले. आत्मा दूरे पातला मग बाईबाई गोसावी थोरें शब्द बोलाविले. यैसा गुणु असेला. तरिं मोटाळा काई करील ।।६१।। स्त्रियांचा ठाई प्रकृत्ति दोऊ (दोखु) जे अधर्माचें बाहुल्य अढाळ व्यापरू रात्रीं भटा बारा, वरीखें भक्ता जायेति या आज्ञायेरें जैसा तोख उपजविला. आपुलेया प्रवृत्ती देती तोहि अंताराओचि देहांतर ना सोधिचें म्हांतारी म्हणितलें निर्विकार अंतर बाह्य मोटळा. म्हणिजे तम बाहुल्य. येकनिकें म्हणिजे महंता गण





हीं येतुलेंचि ।।छ।। सुखीयै म्हणिजेति तिन्ही ताप नाहिं. श्रीमंत म्हणिजे कव्हणा पदार्था ऊणे नाहीं. तेथ जन्मविति. हें सांघेतलें .।।. संबंधु म्हणिजे योगु नेदेचि नये. म्हणिजे द्वादसां वरौति घडिचि जावो नेदिति. नें अगत्य ।।६२।। ज्ञानपुर्वक अनुसरेन तो प्रवर्तला. तयासिचि देवतांचि कर्माचि त्रिविधता प्रतिकुळा विघ्न करीति. आमुचां हातौनी गेला. आम्हा पसि आतांचि थोर जाला. म्हणौन उदासा दोन्ही न करी तेनेकेचेया वावुर, कांजें तेयंचेया विघ्नासि अर्ऱ्ह नव्हे. कां? त्यांचें विघ्न थोर हा साना. येथा धाकुटे. यातें वडिल दंडासि हा जानें. तरि देहांसिये. ब्रह्मादिकां, अरौतिया उदासा. ईद्रांदिकां पासौनि प्रतिकुळानुकुळा, स्त्रिया प्रतिकुळा पुरुष अनकुळ हां- सेलेचा, वाटा परमेश्वर दिधला कनवे करूनि. कां? जें दोषु परि बळु गुनु संकृत. आनि प्रतिकुळा समर्था, तरि जीवासि ऊरिचि नाहीं. हे मा ।।छ।। माळिका अनुकुळादिकांचें साह्य ते कार्य मनोधर्मे ये. देवता म्हणिते उचित प्रकासिले पुरुष म्हणिजे स्वतंत्र कर्म राहाटी देवतेसि क्रिया वाटलेया असेति. दैव राहाटी विघ्ना अर्ह जालेया प्रतिकुळाविघ्न करीति जेयेचि वरेपडा हो ये-

री येचि करी ।।६३।। देसु म्हणिजे विदेसादिक मग तेथचेचि प्रदेस विसेख काळुते, प्रातःकाळ, मध्यानकाळ, रितुकाळ, दुखःकाळ, सुकाळ. वर्तमानु म्हणिजे तुडकांचें मान. दंद व्याज. देहीचे रोगादीक. या जडाचे हे एक साह्य आति य ।।६४।। काजळि सास्त्र राखौनी आर्ति उपजें. काजळी पडिलेयां आर्ति जाये. ।।छ।। काजळी म्हणिजे दिवयाचि देवयाची उपपति तैसें उमुट प्रज्ञा, भेधा, जाये स्फुर्ति जाये. मनन जाये. सास्त्र विसरे हे माळीका ।।६५।। तथा माळीका. खरुज खाजविलया काई होये. देहाचि आस्था, निरोध आसा-हानेपणु अभलपन. वचन भंगु. सुख घेने थोडें, पर प्रसौनि थोरासि आनिल. यैसा सुख दुखें घे पवेना. तो विरमला ।।६४।। म्हांतुरियेसि घडलै म्हणिजे वचन पाळिलेयाचा तोख. अज्ञा पाळिजे. याची नावे अनुसरन हे मागुलेचा. का? अभोक्त म्हणिजे कारंवां ।। खारू वाचेया सारिखें वस्त्र देह ब्राह्मणाचेनि वेखे हीणासि बोलों नये. आनि ब्राह्मन कैवार घेते. आनि वेखाभेण कांही अन्यावो राहाटो नये. लोकाभेन ।।६८।। सवन म्हणिजे येकले भले तया टाके ते. हे.मा. ।।६९।। कपाड देऊळ म्हणिजे चौक जें उघडे येऱ्ह काजळीया प्रकासु मावळे





पन आपन आनिकातें देऊळाही आंतु नुं देखैजेल कीं .।।. तैसेंचि बाइयांसि झाड, कां वोवारी. कवाडाचे निराकरन पाऊसाळा दोघें बाईया वांचौनि सांघातची नाहीं ।।७०।। समो (समय) जेथ मिने तियेतें देखौनि वस्ति कारूवे, येति पासि बैसति. पर सरातवं म्हनो नये. कां जे समये म्हणौन ऐकुने सांधे म्हणितेति तमहि संते म्हणिजेती रजहीने वोसरेचि होआवे. आंतुल दोषु आंधर. अप्रसेन्न पुरुष भये. हात पावो लागे. सकळ पदार्थाचे सुचित्व जाये. फिटे तिये दिसि येकाधें मानुस चोरी काही घरेचि. वोसरे विहीत म्हणौन तेथ देह गेलेयां गोमटै. विजना न वचवे. तेधवा न वचावें आनि राहिल म्हणौन ।।७२।। च्यारे हातु तो सुडा. या वरौता खांडोवा. सुडे आपत्रविजेति. आंग म्हणिजे जयाचें जेवढे. कीजे म्हणिजे अर्थातव सेवने. तें निफजे. तव संग्रोंहो अंचळे अन्य माहात्मे भितरी मुक्त हा थोरु दोषु कटी प्रदेसावरि नितळ स्वक्रयत्व ।।७३।। पृथ्वी म्हणिजे उमप आवसे न बोलेजे कर्म भुमी त्यांतु माहाराष्ट्र लाभे. तरि आवसे कां? ना नित्याटनें उमप, येथा तेलियाचा बैल. येवढे म्हणिजे बहुवस म्हणौन रवन म्हणिजे अवकास रूप. देवता म्हणिजे साह्य करी –

ति आवधिष्टांतरी. सकळाचेया सुखायोग्य होये. यैसे चैतन्या चैतन्य दिधले. केवि? मायाकृत जीव म्हणौन चैतन्य देवता तैसेंचि परमेश्वर केले. नाना योनीचिं दुःखे अनंत नरक भोगावेयासि योग्य जाला असे. तो जीवु मोक्षासि योग्य होये. यैसे दिधले जो जीवु नित्य नरक भोगावेया अधिकार्या जाला असे. तो जीवु अनुभुतिसि योग्य होये. यैसे केले. यैसे दिधले, म्हणौनी परमेश्वराते देवता म्हणितलें परमेश्वरा येवढे म्हणिजे तया आवघेयासि पर. आनि समर्थ. देवतेचि आंगी आनि दात्रुत्व आति. म्हणौन देवता भितरि परमेश्वरे म्हणौन परमेश्वर देह मायेचें. म्हणौन देवता चिधी म्हणिजे चौ हाता पासौनि बारा चौदा हात वेन्हें सोळांचां निसेधु. चिरकुटी म्हणिजे साने. बारा हाताचिंधि. दाहा हाता चिरूटी. च्यारि हात चिंधी. दोनि हात चिरटी. नेणो कैंचि म्हणिजे लोकु आपनचि दे. न मगतां. हे जयासी आस्ता नाहीं. येरासी मागितलेयां देति तवं पृथ्वी थोर. वरी देवताही थोरी तेथु काई सेयाचे उनीव नाहीं. सांघितली. पडेलां अर्थे ग्रंथवी. मागितला अर्थे देवता असे ।।७४।। मांडी म्हणिजे जेतुले आछादनीय परम स्वरूपच

* * *



## लेखकाचा परिचय आणि ग्रंथसंपदा

नाव : विनायक त्र्यंबक पाटील

जन्म दिनांक : २८ एप्रिल १९४१

शिक्षण : एम.ई. (स्थापत्य)

नोकरी : कनिष्ठ अभियंता म्हणून सुरुवात आणि प्रभारी प्राचार्य व विभाग प्रमुख, शासकीय तंत्र निकेतन, जालना येथून शासकीय सेवेतून निवृत्त, एप्रिल १९९९.

व्यवसाय : शेती आणि मराठीत लिखाण.

संपर्क : ९४२२ ७७५ ४५४

### ग्रंथसंपदा

काव्यसंग्रह :
(१) निरिच्छ नभ, शब्दालय प्रकाशन, २००६
(२) उत्तरार्ध, चिन्मय प्रकाशन, २०१६

समाज उपयोगी :
(१) आपल्या समस्या, उपाय आणि मनःशांती, चिन्मय, २०१७
(२) आपल्या जगण्याचे अंतरंग-शांतीवन प्रकल्प, शिरुर-कासार, बीड (स्वीकृत).

महानुभाव ग्रंथ :
(१) महंत दत्तराज मराठे यांचा राजभद्र, २०१२
(२) महानुभाव सांकेतिक सुंदरा लिपीचा अभ्यास, २०१६
(३) महानुभाव सांकेतिक पार-मांडल्य लिपी पोथीसह लिप्यंतर वरील तीन ग्रंथांचे प्रकाशन - राऊळ प्रकाशन, २०१७
(४) महानुभाव सांकेतिक तळेगांवकर लिपी- मराठी संशोधन पत्रिका, मुंबई. २०१८.
(५) महानुभाव सांकेतिक लिप्यांचा अभ्यास विशेष प्रकल्पामध्ये-
(अ) शिर लिपी
(ब) कवीश्वरी लिपी
(क) वज्र लिपी
} महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२१

भाषा संशोधन : माहेश्वरी सूत्र, वज्र लिपी आणि सांकेतिक वज्र लिपी यांचा परस्पर संबंध शोध चालू आहे.

आगामी कादंबरी : निवृत्तीनंतरची निवृत्ती

भाषांतर :
(१) सर्वसामान्यांसाठी वेदांताचे अमृत स्वामी पूर्णानंदतीर्थ यांच्या 'ज्ञान-सुधा चे' भाषांतर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २ डिसेंबर २०२१
(२) महाराजा सयाजीरावांचा जगप्रवास - खंड १५, भाग १ आठवा प्रवास (मे १९०५) ते चौदावा प्रवास (मार्च १९२१) सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०२०
(३) महाराजा सयाजीरावांचा जगप्रवास - खंड १५, भाग २ पंधरावा प्रवास : इ.स. १९२२ सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद, २०२०

तौलनिक अभ्यास : महानुभावांचा आचार आणि जैनांचा श्रावकाचार. (पद्मगंधा प्रकाशन, पुणे यांनी स्वीकृत केलेला ग्रंथ.)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई